सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, १४ ऑगस्ट २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २७६ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


# गणेश नगर, यश नगरला पाण्याचा वेढा

**प्रभावित क्षेत्रातील रहिवाशांना स्थलांतराच्या नोटीसा** | **नाल्यातील पाण्याचा फ्लो वाढल्याने धोकादायक परिस्थिती** | **शहरातील पाच नगरे रस्ते झाले जलमय** | **पालिकेची यंत्रणा तैनात**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

एकरूख तलावातील सांडवा ओव्हरफुल झाल्याने तसेच पावसाचा जोर वाढल्याने नाल्यातील पाण्याचा प्रवाह वाढल्याने जुना पुना नाका येथील दगडी पूल पाण्याखाली गेला. गणेश नगर, मडकी वस्ती यासह वसंत विहार परिसरातील काही नगरांना पाण्याने वेडा घातला. येथील रस्ते जलमय झाले असल्याचे चित्र पाहायला मिळाले. दरम्यान, महापालिका प्रशासनाने आवश्यक ती यंत्रणा सज्ज ठेवली आहे त्याचबरोबर या परिसरातील प्रभावित क्षेत्रातील नागरिकांना स्थलांतरित होण्याची संदर्भात महापालिकेने नोटीसा बजावल्या आहेत.

तळे हिप्परगा एकरूख तलावातील सांडवा ओव्हरफुल झाल्याने तसेच पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला असून पावसाचा जोर वाढला यामुळे शहरातील शेळगी नाला, रूपा भवानी येथील नाला येथील पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमाणात वाढला. यामुळे जुना पुना नाका येथील पूलही दुपारपासून पाण्याखाली गेला असल्याचे चित्र पाहायला मिळाले. या परिसरातील मडकी वस्ती, गणेश नगर, वसंत विहार येथील परिसरातील आळळे नगर, आर्यनंदी नगर, बनशेट्टी नगर , यश नगर भाग २, संकेत थोबडे नगर यासह काही नगरात पाण्याने वेढा घातल्या. या परिसरातील रस्ते जलमय झाले. यामुळे येथील जनजीवन विस्कळीत झाले. अवंती नगर नाला येथील पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमाणात सायंकाळपर्यंत वाढला होता. दरम्यानच्या काळात मात्र सायंकाळी ७.३० सुमारास अवंती नगर नाल्या येथील पाण्याची पातळी कमी झाल्याचे दिसून आले. अवंती नगर येथील नाला पूल आणि जुना पुना नाका पूल परिसरात पाण्याचा प्रवाह पाहण्यासाठी लोकांनी मोठी गर्दी केली होती.

(उर्वरित वृत्त पान २ वर)

### आपत्कालीन यंत्रणा सज्ज

जुना पुना नाका पूल आणि अवंती नगर पुलावर अग्निशामक दल तसेच आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली होती. जीव रक्षक आवश्यक सामग्री सह तैनात करण्यात आले आहेत. अग्निशामक दलाची गाडीही तयार ठेवण्यात आली होती. महापालिकेचे संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारीही या ठिकाणी तळ ठोकून उपस्थित होते. महापालिका झोन क्रमांक एकचे अधिकारी शाम कन्ना, सहाय्यक अभियंता प्रकाश सावंत यांच्यासह कर्मचाऱ्यांचा कर्मचाऱ्यांचे पथक अवंती नगर पुलावर तैनात होते.



## विचारपुष्प



भारतीय संस्कृती ही आपल्या जीवनाची आधारशिला आहे. तीच आपल्याला संघर्षातही टिकवून ठेवते. संस्कृतीचा अर्थ फक्त परंपरा नाही, तर ती जीवनदर्शन आणि मूल्यांचा संच आहे.

**- कुप्प्. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

## महत्त्वाचे

### केवळ कबुतरांच्या खाण्याचा नव्हे तर सार्वजनिक आरोग्याचा विचार करा

**मुंबई** : दादरमधील कबुतरखान्याच्या बंदीला जैन समाजाकडून होत असलेला विरोध आणि प्रशासनाची सौम्य भूमिकेबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी राज्य सरकारचे पुन्हा कान उपटले. केवळ कबुतरांच्या खाण्याचा प्रश्न नाही तर सार्वजनिक आरोग्याची काय व्यवस्था केली आहे?,असा सवाल उपस्थित करीत याबाबत केवळ महापालिका निर्णय घेऊ शकत नाही तर तज्ञाच्या समितीचा अहवाल सादर करा, असे निर्देश देत तूर्तास बंदी कायम ठेवली. न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या.आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत महाअधिवक्ते बिरेंद्र सराफ यांनी सरकारची, मुंबई महापालिका आणि याचिकाकर्त्यांनी देखील बाजू मांडली. त्यानंतर, उच्च न्यायालयाने काही महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले असून कंट्रोल फिडींगला परवानगी देण्यापूर्वी सार्वजनिक आरोग्याचा विचार करावा, नागरिकांच्या हरकती मागवाव्यात. तसेच, महापालिका यासंदर्भात थेट निर्णय घेऊ शकत नाही, असे स्पष्ट केले आहे. सरकारच्यावतीने मुंबईतील तज्ज्ञ समिती आणि त्यातील संभाव्य सदस्यांची यादी आज उच्च न्यायालयात सादर करण्यात आली.

### भीषण अपघातात ११ भाविकांचा मृत्यू

**जयपूर** : १३ ऑगस्ट देवदर्शनानंतर गावी परतणाऱ्या उत्तर प्रदेशातील ११ भाविकांचा बुधवारी पहाटे झालेल्या भीषण अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. २० भाविकांना घेऊन जाणारे वाहन मालवाहू वाहनाला धडकल्याने ही घटना घडली. आठ जणांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर जयपूर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सालासार बालाजी मंदिर आणि खाटूश्याम मंदिराला भेट दिल्यानंतर उत्तर प्रदेशातील इटाह जिल्ह्यातील असरौली गावातील २० भाविक गावी परतत होते. बुधवारी पहाटे ४-५ वाजताच्या सुमारास मनोहरपूर महामार्गाजवळ भाविकांच्या वाहनाने मालवाहू ट्रकला धडक दिली. यामध्ये मिष्टी, बाबू, पूर्वी, लक्ष, वैष्णवी, महक, सलोनी या १ ते ७ वर्षे वयोगटातील मुलांचा आणि शीला, प्रियांका, सीमा व सोनम या चार महिलांचा मृत्यू झाला. जखमींपैकी आठ जणांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर जयपूर येथील एसएमएस रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तीन जणांना डोक्याला मार लागला असून तीन मुलांची प्रकृती चिंताजनक आहे.

# पुनरीक्षण प्रक्रिया मतदारांच्या हिताची

**• सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा • याचिकाकर्त्यांचे आरोप फेटाळले**

**नवी दिल्ली, १३ ऑगस्ट**

मतदार पुनरीक्षण प्रक्रिया मतदारांच्या हिताची आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी स्पष्ट केले. या प्रक्रियेत ओळख सिद्ध करण्यासाठी मान्य दस्तावेजांची संख्या सातवरून ११ करण्यात आली. यामुळे मतदारांना आणखी पर्याय उपलब्ध झाले आहेत, असे न्यायालयाने स्पष्ट केले. दस्तावेजांची संख्या वाढल्याने कुणालाही बाहेर ठेवण्याऐवजी ही प्रक्रिया अधिक समावेशी होते, असे न्यायालयाने आधारच्या मुद्यावरील आक्षेप फेटाळताना सांगितले.



जर गणना अर्जात कायदेशीर अर्ज समायोजित केल्यास, ते नियमांचे उल्लंघन राहील किंवा व्यापक अनुपालन मानले जाईल, असा प्रश्न न्यायालयाने सुनावणीदरम्यान उपस्थित केला. नागरिकत्वाच्या पुराव्याबाबत निवडणूक आयोगाने भूमिका बदलली असल्याचा आरोप याचिकाकर्त्यांच्या वतीने युक्तिवाद करताना वरिष्ठ विधिज्ञ अभिषेक मनू सिंघवी यांनी केला. नागरिकत्वाच्या पुराव्याच्या मुद्यावर आयोग पूर्णतः पलटले. एखादी व्यक्ती नागरिक नाही, असे वाटल्यास कोणतीही व्यक्ती आक्षेप घेऊ शकते. त्यानंतर ईआरओ नोटीस जारी केली जाईल. अशा परिस्थितीत दोन महिन्यांत सर्वच मोठे निर्णय कसे घेतले जातील, असा प्रश्न उपस्थित करताना डिसेंबरपासून पुनरीक्षण सुरू करावे आणि वर्षभरात पूर्ण केल्यास कोणताही आक्षेप राहणार नसल्याचे सिंघवी म्हणाले.

मतदार यादीत नावाचा समावेश करण्यासाठी फॉर्म-६ अंतर्गत आधार कार्ड अजूनही मान्य असलेले दस्तावेज आहे. आपला अधिकार सोडेपर्यंत सगळ्यांनाच बाहेर ठेवले जाईल, असे मानले जायचे. मात्र, आता हा विचार बदलला आहे, असे सिंघवी म्हणाले. २००३ ते २०२५ या कालावधीत ज्यांच्या नावाचा समावेश झाला, पुरावा न दिल्यास त्यांचे नावही मतदार यादीतून निघू शकते, असा इशारा त्यांनी दिला.

(वृत्तसंस्था)

### सिंघवींनी उपस्थित केले प्रश्न




सिंघवी यांनी पुनरीक्षणाच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. यापूर्वी २००३ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी ही प्रक्रिया पार पाडण्यात आली होती. बिहारमध्ये ही पुन्हा का सुरू केली जात आहे? ही अरुणाचल प्रदेशातून का सुरू केली नाही, या राज्यात २०२६ मध्ये निवडणुका आहेत किंवा २०२८ मध्ये लक्षद्वीपमध्ये निवडणुका आहेत, तिथे सुरू करायला पाहिजे होती, असे सिंघवी म्हणाले.

### पुनरीक्षणामागील उद्देश काय?

बिहारमध्ये ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये विधानसभा निवडणुका होत आहेत. त्यापूर्वी मतदारयादी तयार करण्याचा उद्देश पुनरीक्षणाचा आहे. निवडणूक आयोगाने नागरिक नसलेले तसेच अपात्र मतदारांना यादीतून हटवण्यास सुरुवात केली आहे. २००३ मधील प्रक्रियेत सहभागी न झालेल्या मतदारांना आपल्या जन्मस्थानाचा पुरावा आणि नागरिकत्वाचे स्व-घोषणापत्र जमा करावे लागले. फॉर्म-६ मध्ये नागरिकत्वाचा पुरावा आवश्यक नाही. त्यामुळे घुसखोरही यात सहभागी होऊ शकतात, अशी टीका केली जात आहे.



**सोलापूर : स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला सोलापुरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक दरम्यान रस्त्यावरील हायमास्टवर बुधवारी तिरंगा विद्युत रोषणाई केल्याचे नयनरम्ब दृश्य टिपले आहे.**

छाया : केवल तिवारी

# जमिनीच्या वादातून पती-पत्नीचा निघृण खून

**• धाराशिव तालुक्यात करजखेडा येथील खळबळजनक घटना**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि. १३ ऑगस्ट-**

तालुक्यातील करजखेडा येथे जमिनीच्या वादातून पती-पत्नीची निघृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना आज, बुधवार, १३ ऑगस्ट रोजी दुपारी दोनच्या सुमारास घडली. मृतांमध्ये सहदेव पवार आणि त्यांची पत्नी प्रियंका पवार यांचा समावेश असून, या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मयत सहदेव पवार आणि आरोपी जीवन हरिबा चव्हाण यांची करजखेडा येथे शेजारील शेती आहे. पवार यांच्या नावे ३६ एकर तर चव्हाण यांच्या नावे २ एकर जमीन आहे.



गेल्या काही काळापासून या दोघांमध्ये जमिनीवरून तीव्र वाद सुरू होता. काही वर्षांपूर्वी सहदेव पवार यांनी जीवन चव्हाण याला मारहाण केली होती. या प्रकरणी जिल्हा न्यायालयाने पवार यांना तीन वर्षांची शिक्षा सुनावली होती. मात्र, उच्च न्यायालयातून ते जामिनावर मुक्त झाले होते. या घटनेपासूनच चव्हाण यांच्या मनात पवारांविषयी संताप होता.आज दुपारी याच रागातून जीवन चव्हाण यांनी करंजखेडा-पाटोदा रस्त्यावर सहदेव पवार व त्यांची पत्नी प्रियंका यांच्या अंगावर गाडी चढवली.

त्यानंतर कोयत्याने वार करून दोघांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच बेंबळी पोलीस ठाण्याचे पथक आणि स्थानिक गुन्हे शाखा घटनास्थळी दाखल झाली. मात्र, त्यापूर्वीच आरोपी फरार झाला होता. पोलिसांनी आरोपीचा शोध घेण्यासाठी चोख जाळे उभारले असून पुढील तपास सुरू आहे. या दुहेरी हत्याकांडामुळे करजखेडा गावावर शोककळा पसरली आहे.

## नक्षलग्रस्त भागात अतुलनीय कामगिरी

# ६१६ पोलिसांचा सन्मान

**• विशेष सेवा पदक जाहीर • गडचिरोली-गोंदियातील खडतर सेवेचा गौरव**

| नीलोत्पल | यतिश देशमुख | सुहास शिंदे | अजयकुमार लांडगे | मयूर भुजबळ |
|---|---|---|---|---|
| (पोलीस अधीक्षक, गडचिरोली) | (अपर पोलीस अधीक्षक, गडचिरोली) | (उपविभागीय पोलिस अधीक्षक, ठाणे) | (सहायक पोलिस आयुक्त, नवी मुंबई) | (सहायक पोलिस आयुक्त, नवी मुंबई) |

**मुंबई, १३ ऑगस्ट**

गडचिरोली आणि गोंदियासारख्या नक्षलवादग्रस्त जिल्ह्यांमध्ये बेकायदेशीर आणि हिंसक कारवायांना आळा घालण्यासाठी केलेल्या अतुलनीय कामगिरीबद्दल राज्यातील ६१६ पोलिसांना पोलिस महासंचालक कार्यालयाकडून विशेष सेवा पदक जाहीर करण्यात आले आहे. मंगळवारी ही घोषणा करण्यात आली, ज्यामध्ये अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांचा आणि जवानांचा समावेश आहे.

या विशेष सेवा पदकाने सन्मानित झालेल्यांमध्ये गडचिरोलीचे पोलिस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलिस अधीक्षक यतिश देशमुख आणि ठाण्याचे उपविभागीय पोलिस अधीक्षक सुहास शिंदे यांसारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. याशिवाय, नवी मुंबई पोलिस दलातील अधिकाऱ्यांनीही या खडतर भागात केलेल्या सेवेची दखल घेण्यात आली आहे.



नीलोत्पल | यतिश देशमुख

यामध्ये नवी मुंबईतील सहायक पोलिस आयुक्त अजयकुमार लांडगे आणि मयूर भुजबळ यांच्यासह पोलिस आयुक्तालयातील तीन पोलीस उपनिरीक्षकांचा समावेश आहे.

(वृत्तसंस्था)

### एसआरपीएफ जवानांचाही समावेश

एकूण ६१६ पोलीस कर्मचाऱ्यांना जाहीर झालेल्या या पदकांमध्ये राज्य राखीव पोलिस दलाच्या (एसआरपीएफ) जवानांचाही समावेश आहे. नक्षलग्रस्त भागातील अत्यंत तणावपूर्ण आणि धोकादायक परिस्थितीत जीवाची पर्वा न करता कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांच्या शौर्याचा आणि सेवेचा हा गौरव मानला जात आहे.




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्त्वाचे...

### दुचाकीचा कट लागल्याने तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

दुचाकीचा कट लागल्याच्या कारणातून तरुणाला लोखंडी रॉड तसेच सळई आणि लाकडाने बेदम मारहाण करण्यात आली. हा प्रकार मंगळवारी दुपारी ४.३० वाजता मंगळवेढा येथील मित्र नगरात घडला. आशिष अशोक हरवळे (वय २८, रा. मित्र नगर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. मंगळवारी दुपारी साडेचारच्या सुमारास आशिष हा त्याच्या राहत्या घरी होता. त्यावेळी कट लागल्याच्या कारणातून निलेश बजरंत ताडव निरज बजरंग ताड तसेच इतर पाच लोकांनी लोखंडी रॉड, सळई तसेच लाकडाने मारहाण केली. यात आशिषच्या उजव्या डोळ्याला जखम झाली आहे. तसेच मुकामार लागल्याने मंगळवेढा येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून भाऊ अतुल सातपुते याने बुधवारी रात्री १२.५० वाजता शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

### दारुची मागणी करून एकास मारहाण

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

बिअर बार बंद केला असल्याचे सांगूनही दारुची मागणी करून एकास भंडारकवठेत बेदम मारहाण करण्यात आली. हा प्रकार बुधवारी रात्री १२.१५ वाजता घडला. मल्लिकार्जुन गुरुनाथ सगरे (वय ४८, रा. माळकवठे) असे मारहाण झालेल्याचे नाव आहे. बुधवारी रात्रीच्या सुमारास मल्लिकार्जुन याने भंडारकवठे येथील बिअर बार बंद केला होता. साधारण रात्रीचे १२.१५ वाजता नंदकुमार वाघमारे हा तिथे आला. त्याने मल्लिकार्जुनकडे दारुची मागणी केली, परंतु बिअर बार बंद केल्याने दारु देण्यास त्याने नकार दिला. त्यावेळी दारु का देत नाही असे म्हणून नंदकुमार याने अज्ञात वस्तुने मारहाण केल्याने मल्लिकार्जुनच्या डोक्यात जखम झाली. मंद्रुप येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून मल्लिकार्जुन स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## पान १ वरुन...



### ....पाण्याचा वेढा

**महापालिका आयुक्तांनी दोन वेळा केली प्रभावित परिसराची पाहणी**

नाल्यातील पाण्याचा प्रवाह वाढल्याने जुना पुना नाका, अवंती नगर पूल या परिसरातील नगरांना पाण्याने वेढा घातला असल्याचे चित्र आहे. दरम्यान, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज बुधवारी सकाळी ११ वाजता आणि सायंकाळी साडे सातच्या सुमारास दोन वेळा जुना पुना नाका आणि अवंती नगर पूल परिसरातील प्रभावित क्षेत्रातील विविध नगरांची प्रत्यक्ष पाहणी केली. नागरिकांना पाणी साचणे, घरात पाणी शिरणे यामुळे होणारा त्रास सहन करावा लागू नये यासाठी त्वरित कार्यवाही करावी. त्यांनी संबंधित अभियंते व विभाग प्रमुखांना आपण आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्याबाबत सूचना दिल्या आणि पावसाळ्यातील कोणतीही आपत्तीजन्य परिस्थिती टाळण्यासाठी दक्षता घेण्याचे आदेश दिले. महापालिकेच्या झोन अधिकाऱ्यांनी तत्काळ आवश्यक ती यंत्रणा तैनात करून योग्य त्या उपाययोजना करण्याचे आदेश दिले. यावेळी त्यांच्या समवेत अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता सारिका आकूलवार, प्रकाश दिवाणजी , विभागीय अधिकारी शाम कन्ना, सहायक अभियंता प्रकाश सावंत, नॅशनल हायवेचे अधिकारी व संबंधित विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

**प्रभावित क्षेत्रातील रहिवाशांना स्थलांतरासाठी नोटीसा**

जुना पुना नाका नाला आणि अवंती नगर नाला परिसरातील प्रभावित असलेल्या क्षेत्रातील नगरा मधील रहिवाशांना स्थलांतरित करण्यासंदर्भात महापालिका प्रशासनाकडून नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. सुमारे १५ ते २० रहिवाशांना या नोटिस बजावल्या आहेत, अशी माहिती झोन अधिकारी शाम कन्ना यांनी दिली.

**बॅरिगेट्स लावून रस्ता बंद**

जुना पुणे नका स्मशानभूमी भूमी येथील नाला पाण्याची पातळी वाढल्यामुळे तेथील दगडी पूल पाण्याखाली गेले आहे. त्या ठिकाणी बॅरिगेट्स लावून रस्ता बंद करण्यात आलेला आहे. अवंती नगर पुला नजीकच्या गणेश नगर, मडकी वस्तीला जाणारा रस्ताही बॅरिकेट्स लावून बंद करण्यात आला.

**आदिला नदी बाळे, पद्मावती नगर भागामध्ये नैसर्गिक पाण्याचा प्रवाह बदल्यामुळे फटका**

आदिला नदी बाळे परिसर तसेच पूना रोडवरील पद्मावती नगर भागामध्ये ले-आउट धारकांनी नैसर्गिक पाण्याचा प्रवाह बदल्यामुळे नागरिकांच्या घरात पाणी शिरत असल्याची तक्रार स्थानिकांकडून करण्यात आली होती.वसंत विहार येथील यश नगर, सहा कमान येथे पाणी पातळी वाढली आहे. त्याची सुद्धा त्या ठिकाणी स्वत: भेट देऊन आयुक्तांनी परिस्थितीच पाहणी केली. संबंधित ले-आउटची धारकांच्या प्लॉटच्या नकाशे व मोजणीसह सखोल चौकशी करून, नियमबाह्य बांधकामांवर आवश्यक ती कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

**या भागातील काही घरात शिरले पाणी**

५४ मीटर रस्ता परिसरातील रेल्वे ब्रिजखालील पाणी साचण्याची समस्या, गणेश नगर, अभिमानश्री नगर, यश नगर भाग २ बनशेट्टी नगर तसेच वसंत विहार येथील नाल्याची स्थिती याची पाहणी केली. याठिकाणी काही घरात पाणी शिरले. महापालिकेच्या वतीने त्या ठिकाणी आपत्कालीन यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. त्या ठिकाणी पाण्याची पातळी वाढल्यास ज्या घरात पाणी शिरण्याची स्थिती आहे अशा घरातील नागरिकांना स्थलांतरित करण्याबाबत सूचना पत्र देण्यात आल्या आहेत.

**सुंदराबाई डागा, शाळा क्रमांक २७ मध्ये राहण्यासाठी पर्यायी व्यवस्था**

आवश्यकतेनुसार पर्याय व्यवस्था म्हणून महापालिका शाळा क्रमांक २७ या ठिकाणी तसेच मनपा सुंदराबाई डागा प्रशाला मध्ये व्यवस्था करण्यात आली आहे. त्या परिसरामध्ये सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने अग्निशामक विभाग, जेसीबी तसेच २४ तास आपत्कालीन यंत्रणा ठेवण्यात आली आहे. त्या परिसरातील नागरिकांच्या घरात पाणी शिरल्यास त्यांनी त्वरित आपत्कालीन विभागाशी संपर्क संपर्क साधावे, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त डॉ.ओम्बासे यांनी केले आहे.

# पंढरपूर कॉरिडोर होणारच : जिल्हाधिकारी

**● आता मोबदला आणि सूचना यावरच चर्चा होईल**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ ऑगस्ट-**

कॉरिडोरहोणार की नाही या बाबतची चर्चा आता बस्स झाली. कारण कोणत्याही परिस्थितीत कॉरिडोरहा होणारच आहे. त्यामुळे यापुढे चर्चा होणार ती केवळ मोबदला किती मिळावा आणि कॉरिडोरबद्दलच्या सुचना या वरच होणार असल्याची ठाम भूमिका जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पहिल्यांदाच माध्यमांच्या प्रतिनिधीशी चर्चा करताना मांडली.



येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात मंगळवारी शहरातील मठाधिपती, महाराज मंडळीं यांच्याशी जिल्हाधिकाऱ्यांनी खास बैठक घेऊन कॉरिडोरबाबत चर्चा केली. त्यानंतर पत्रकारांना बैठकी संदर्भात माहिती देताना जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख, भूसंपादन अधिकारी सीमा होळकर, सुशांत बनसोडे,प्रांताधिकारी सचिन इथापे, येथील उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे, तहसिलदार सचिन लंगोटे, मुख्याधिकारी महेश रोकडे आदी अधिकारी उपस्थित होते. यावेळी माहिती देताना जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले, शहरातील शिंदे वाडा आणि होळकर वाडा हे हेरिटेज स्ट्रँक्चर आहेत. त्यांचे पारंपारिक आणि ऐतिहासीक महत्वपण आहे.त्यामुळे या दोन हेरिटेज स्ट्रँक्चरना कॉरिडोरमध्ये बाधित करण्याचा आमचा कोणताही मानस नाही आहे. या बरोबरच बाकी जेवढे हेरिटेज स्ट्रँक्चर आहेत आणि जे कॉरिडोरमध्ये येता आहेत त्याबद्दल अजून आमची चर्चा चालू आहे. या बरोबरच कॉरिडोरमध्ये जेवढे मंदिर आणि समाध्या येता आहेत त्या तशाच राहणार आहेत.

या बरोबरच या प्रकल्पा अंतर्गत बाधित होणारे किती मठ आहेत याची देखील आम्ही चाचपणी केली आहे. या पैकी किती मठांचे आपण संवर्धन करु शकतो तसेच किती मठ बाधित होतील याबद्दल येथील मठाधिपती आणि महाराज मंडळींशी आजच्या बैठकीत पहिल्यांदाच या बद्दलची आमची चर्चा झालेली आहे. त्यामुळे या पुढे देखील या मंडळींशी चर्चा करण्याची आमची तयारी आहे अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. दरम्यान तीर्थक्षेत्र बचाव समितीच्या सदस्यांची राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या बरोबर चर्चा करण्याची मागणी आहे या विषयी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, जर तीर्थक्षेत्र बचाव समितीची तशी इच्छा असेल तर ते मुख्यमंत्री साहेबांची वेळ घेऊन त्यांच्याशी चर्चा करु शकतात. पण आपल्या सोबत ज्यांना चर्चा करावयाची आहे त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी आपण केव्हाही तयार आहोत. पण चर्चेचा एकच विषय असू शकतो की मोबदला जास्तीत जास्त आम्हाला कसा मिळेल आणि तो आम्ही कसा देवू शकणार या बद्दलची होवू शकते असेही त्यांनी सांगितले. दरम्यान कॉरिडोरबाबतची चर्चा संतमंडळींशी किंवा महाराज मंडळींशी या अगोदरच आमची झालेली आहे. या मध्ये त्यांच्या काही सूचना असतील तर त्या आम्हाला ते जरुर सांगू शकतात. पण आमच्या बरोबर चर्चा करताना फक्त मोबदला किंवा मिळणारा लाभ या बद्दलच आम्ही चर्चा करणार आहोत. कारण कॉरिडोर करायचे किंवा नाही करावयाचे या बद्दल आता कोणतीही चर्चा केली जाणार नाही. कारण कोणत्याही परिस्थितीत आता कॉरिडोरहा होणारच आहे अशी ठाम भूमिका पहिल्यांदाच जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पत्रकारांसमोर बोलताना मांडली. ही भूमिका मांडत असताना जिल्हाधिकारी म्हणाले, की मोबदल्या संदर्भात आपण देखील यापूर्वी तीन दिवस येथे येवून या मधील संभाव्य बाधितांशी गटागटाने चर्चा केलेली आहे. त्या नंतर आमच्या कडून तीन उपजिल्हाधिकाऱ्यांची खास संभाव्य बाधित मंडळींशी चर्चा करण्यासाठी नियुक्ती केलेली होती. त्यांनी देखील २५ जुलै ते ५ ऑगस्ट या काळात थोड्या थोड्या संख्येने असलेल्या गटांशी चर्चा केलेली आहे. मध्ये त्यांनी देखील संभाव्य कॉरिडोर बाधितांकडून मोबदल्या विषयीच्या अपेक्षा जाणून घेतलेल्या आहेत.आमच्याशी कोणत्याही कॉरिडोरबाधित गटाला चर्चा करावयाची असेल तर त्यांच्याशी चर्चेसाठी आमची सदैव तयारी आहे. मात्र तिर्थक्षेत्र बचाव कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांशी अजून आमची चर्चा झालेली नाही. कारण आम्ही संभाव्य कॉरिडोरबाधितांशीच थेट चर्चा केलेली आहे. त्यांच्या अपेक्षा जाणून घेतलेल्या आहेत असे देखील जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

> **चौफाळ्यातूनच होणार**
> कॉरिडोरचा आराखडा हा छत्रपती शिवाजी चौकातून असावा अशी मागणी अनेकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेली होती. मात्र या संदर्भात माहिती देताना जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, कॉरिडोरचा आराखडा हा चौफाळ्यापासूनच आहे त्यामुळे तेथूनच कॉरिडोर होणार आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज चौकातून कॉरिडोर होणार नाही किंवा घेतला जाणार नाही असे त्यांनी यावेळी स्पष्टपणे सांगितल्यामुळे या विषयाला आता पुर्णविराम मिळाला आहे.

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मदतीने विसर्जन कुंडामधील गाळ काढणार

**● मनपा आयुक्त व मंडळ पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत निर्णय**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**



महापालिकेच्या वतीने सार्वजनिक गणेशोत्सव २०२५ च्या निमित्ताने सार्वजनिक मंडळाचे पदाधिकारी आणि महापालिका अधिकाऱ्यांची बैठक आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. गणेशोत्सवाच्या तयारीसंदर्भात विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली. यामध्ये प्रामुख्याने गणेश मूर्ती विसर्जन, मिरवणूक व्यवस्था आणि नागरिकांच्या सोयी-सुविधांशी संबंधित उपाययोजनांवर भर देण्यात आला.

गणेशमूर्ती विसर्जन झाल्यानंतर विसर्जन कुंडामधील गाळ काढण्याचे काम सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मदतीने करण्यात येईल. तसेच विडी घरकुल येथील माढा विहिरीतील गाळ गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वी काढला जाईल आणि ती विहीर पूर्णपणे बंदिस्त करण्यात येईल. मिरवणुकीच्या मार्गावरील अतिक्रमणे काढणे, रस्त्यांवरील खड्डे बुजवणे आणि धोकादायक झाडांच्या फांद्या तोडण्याचे काम तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. गणेशमूर्ती संकलन केंद्रांची पाहणी करून, आवश्यकतेनुसार त्यांची संख्या वाढवणे किंवा कमी करणे, तसेच कृत्रिम विसर्जन कुंडांची उंची वाढवून काही ठिकाणी त्यांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. गणेशमूर्ती संकलन आणि विसर्जनाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येतील. तसेच, वाहनांवर आच्छादन घालणे आणि नागरिकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी घेण्याचे ठरले.

मिरवणुकीच्या मार्गावरील मोकाट जनावरांना पकडणे, पुरेसा प्रकाश आणि विद्युत व्यवस्था करणे, तसेच मिरवणुकीच्या मार्गात अडथळा ठरणाऱ्या केबल्स आणि वायर्स काढून घेण्याचे काम ही त्वरित हाती घेण्यात येईल.या बैठकीस अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे , उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त तैमूर मुलाणी, मुख्यालेखा अधिकारी डॉ.रत्नराज जवळगेकर, किशोर सातपुते, तपन डंके, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, दिलीप कोल्हे, श्रीशैल बनशेट्टी, विजय पुकाळे, श्रीकांत घाडगे, देवीदास घुले, शिंदे,पवन देसाई, सचिन स्वामी, संजय शिंदे, गाजरे, श्रीनिवास पुकाळे, आशिष जाधव, आनंद मुसळे, सुभाष चव्हाण, अण्णाप्पा सुतकर, संजय साळुंखेसह अधिकारी याप्रसंगी उपस्थित होते.

**सर्व विभागीय कार्यालय येथे एक खिडकी योजना**

महापालिकेचे वतीने गणेशोत्सव काळात गणपती मूर्ती स्टॉलसाठी १८ व १९ तारखेला विशेष शिबीर ठेवण्यात आले आहे.त्याच बरोबर सर्व विभागीय कार्यालय येथे एक खिडकी योजना राबविण्यात येणार आहे



## शासन नियमांनुसार मूर्तिकारांनी गणेश मूर्ती तयार कराव्यात : आयुक्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

शासनाने घालून दिलेल्या नियमावलीनुसारच सर्व मूर्तिकारांनी गणेशमूर्ती तयार कराव्यात. विशेषतः प्लॅस्टर ऑफ पॅरिस (पीओपी) व रासायनिक रंगांचा वापर टाळून पर्यावरणपूरक मातीच्या मूर्ती तयार करण्यावर भर देण्यात आला. मूर्तींच्या उंची, रचना आणि सुरक्षित वाहतूक यासंदर्भातही नियमांचे पालन करण्याच्या सूचना महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केल्या आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने प्लास्टर ऑफ पॅरीस (पीओपी) मूर्तींच्या विसर्जनासाठी सुधारित आणि एकत्रित मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या सूचना उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तयार करण्यात आल्या असून, पर्यावरणपूरक सण साजरे करण्याचा उद्देश आहे. त्या अनुषंगाने आज सोलापूर महापालिकेच्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील सर्व मूर्तिकारांची विशेष बैठक घेण्यात आली. आगामी गणेशोत्सव २०२५ च्या निमित्ताने ही बैठक आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी या सूचना दिल्या.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त तैमूर मुलाणी, मुख्यालेखा अधिकारी डॉ.रत्नराज जवळगेकर, नगर अभियंता सारिका आकूलवार किशोर सातपुते, तपन डंके, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, मूर्तिकार नवीन मीठ्ठा, बाळकृष्ण बुटा, श्रीकांत दासरी, लोकेश बिल्ली, देविदास भैरी, किरण मड्डी, नरेंद्र बुधराम, प्रसाद कल्याणम, रमेश रायचूरकर, विठ्ठल वग्गा यांच्यासह महापालिकेचे सर्व विभागीय अधिकारी व शहरातील मूर्तिकार उपस्थित होते.

सर्वांनी उत्सव शांततेत, सुरक्षिततेत आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासाठी सहकार्याचे आश्वासन दिले. गणेशोत्सव हा सांस्कृतिक आणि धार्मिक उत्साहाचा सोहळा असून त्याचबरोबर पर्यावरण संरक्षणाची जबाबदारीही सर्वांनी पाळणे आवश्यक आहे. विसर्जनावेळी पाण्याचे प्रदूषण टाळण्यासाठी महापालिकेकडून शहरातील विविध ठिकाणी कृत्रिम तलाव उभारण्यात येतील, असे महापालिका आयुक्त यांनी स्पष्ट केले आहे.

## तोल जाऊन पडल्याने तरुणाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

होटगी रस्त्यावरील मुलतानी बेकरीजवळ तोल जाऊन पडल्याने तरुणाचा मृत्यू झाला. प्रकाश किसन जाधव (वय ३०, रा. टिकेकर वाडी, ता. उत्तर सोलापूर) असे मरण पावलेल्या तरुणांचे नाव आहे. सोमवारी दुपारी साडेचारच्या सुमारास मुलतानी बेकरी जवळ पत्र्याच्या छताचे काम करत असताना खाली उतरत असताना तोल जाऊन तो खाली पडला. त्यात डोक्यात दुखापत झाल्याने त्याला उपचारास अनिल नावडे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते, परंतु उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची प्राथमिक नोंदी पोलीस चौकीत झाली आहे.

**जखमी अवस्थेत आढळलेल्या वृद्धाचा मृत्यू**

**सोलापूर :** अक्कलकोट रस्त्यावरील मनिधारी हेरिटेज समोर रस्त्याच्या कडेला जखमी अवस्थेत सापडलेल्या वृद्धाचा मृत्यू झाला. याहोद्दीन अमिरोद्दीन पिरजादे (वय ८४, रा. बुह्णानपुर, ता. अक्कलकोट) असे मरण पावलेल्या वृद्धाचे नाव आहे.९ ऑगस्ट रोजी सायंकाळी पावणे सहाच्या सुमारास मनीधारी हेरिटेज समोर रस्त्यावर पिरजादे हे जखमी अवस्थेत आढळून आले होते. त्यांना उपचारासाठी दीपक संगा यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले, परंतु उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद सिव्हिल चौकीत झाली आहे.

**चेष्टामस्करी केल्याने तरुणाला मारहाण**

**सोलापूर :** येथील मोदी चौकी समोरील रेल्वे कॉलनीजवळ मित्रांसोबत चेष्टामस्करी करत असताना मित्राने मारहाण केली. यात डोळ्याला जखम झाल्याने तरुण शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. शाहिद फिरोज पठाण (वय २१, रा. फॉरेस्ट सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. मंगळवारी सकाळी ८.१५ च्या सुमारास शाहिद हा मोदी परिसरातील रेल्वे कॉलनी येथे मित्रांसोबत गप्पा मारत थांबला होता. त्यावेळी त्यांच्यामध्ये चेष्टामस्करी सुरु होती. त्यावेळी मोनू पवार याने मारहाण केली. यात शाहिदच्या डोळ्याला जखम झाल्याने तो १२ रोजी उपचारास दाखल झाला होता. त्यास उपचार करून घरी सोडण्यात आले होते. परंतु दुपारी त्रास होऊ लागल्याने तो पुन्हा शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

**चारचाकी वाहनाची रिक्षाला धडक, दोघे जखमी**

**सोलापूर :** गांधी नगर येथून आसरा चौकाच्या दिशेने जाताना महावीर चौकात चारचाकी वाहनाची रिक्षाला धडक बसली. यात दोघे जखमी झाले. हा अपघात बुधवारी सकाळी ७.३० च्या सुमारास घडला. श्वेता विजयकुमार भांगे (वय २०) व अमित निर अलकार सिंह (वय ३०, दोघे रा. लक्ष्मी पेठ, सोलापूर) अशी जखमीची नावे आहेत. बुधवारी सकाळी ७.३० च्या सुमारास श्वेता आणि अमित हे दोघे गांधी नगर येथून रिक्षात बसून आसरा चौकाकडे जात होते. रिक्षा महावीर चौकातून जात असताना, गुरुनानक चौकाकडून पत्रकार भवनच्या दिशेने जाणा-या चार चाकी वाहनाच्या चालकाने रिक्षाला धडक दिली. यात रिक्षातून बाहेर पडून श्वेता आणि अमित हे दोघे जखमी झाले. सर्वांगास मुकामार लागल्याने मदतनीस दिनेश गवळी याने सकाळी ८. १० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

**अंबिका नगर येथून दुचाकी पळवली**

**सोलापूर :** अंबिका नगर येथे हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.बीसी.७२०२ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १९ जुलै रोजी घडली. याप्रकरणी जमीर चाँदसाह शेख (मुक्काम पोस्ट गुळवंची) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस नाईक भिमदे हे करीत आहेत.


## कटारे स्पिनिंग मिल्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय: 14/30 ग्राउंड फ्लोअर, बी विंग, कटारे कॉम्प्लेक्स, गांधीनगर, बीएल. क्रमांक 10 सोलापूर एमएच- 413006.**
**सीआयएन: L17119PNI1980PNC022962**
**ईमेल: katarespinningmills@gmail.com**

**30 जून 2025 रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अप्रमाणित आर्थिक निकालांचे विवरण**

| अ. क्र. | तपशील | तिमाही अखेर/चालू वर्ष संपत आहे 30 जून 2025 (अलेखापरीक्षण केलेले) | वर्ष ते आजपर्यंतचे आकडे/मागील वर्ष संपले 31 मार्च 2025 (ऑडिट केलेले) | मागील वर्षी संपलेल्या संबंधित 3 महिन्यांचा कालावधी 30 जून 2024 (अलेखापरीक्षण केलेले) |
|---|---|---|---|---|
| 1 | ऑपरेशन्समधून एकूण उत्पन्न | 67.85 | 511.98 | 78.00 |
| 2 | कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (करपूर्व, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण वस्तू) | (26.34) | (201.55) | (41.90) |
| 3 | करपूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण वस्तूंनंतर) | (26.34) | (201.55) | (41.90) |
| 4 | कर नंतरच्या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण वस्तूंनंतर) | (26.34) | (173.04) | (41.90) |
| 5 | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न या कालावधीसाठी नफा / (तोटा) (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर) समाविष्ट आहे | (26.34) | (173.04) | (41.90) |
| 6 | इक्विटी शेअर कॅपिटल | 285.00 | 285.00 | 285.00 |
| 7 | मागील वर्षाच्या ऑडिट केलेल्या ताळेबंदात दाखवल्याप्रमाणे राखीव निधी (पुनर्मूल्यांकन राखीव निधी वगळून) | -- | -- | -- |
| 8 | प्रति शेअर कमाई (प्रत्येकी रु. 10/- दर्शनी मूल्य) (चालू आणि बंद केलेल्या ऑपरेशन्ससाठी) 1. मूलभूत: 2. सौम्य: | (0.92) (0.92) | (6.07) (6.07) | (1.47) (1.47) |
| | कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (करपूर्व, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण वस्तू) | (26.34) | (201.55) | (41.90) |
| | करपूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण वस्तूंनंतर) | (26.34) | (201.55) | (41.90) |

**टीप : अ)** वरील माहिती सेबी (लिस्टिंग ऑब्जेक्शन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, 2015 च्या रेग्युलेशन 33 अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या 30 जून 2025 रोजी संपलेल्या तिमाहीच्या आर्थिक निकालांच्या तपशीलवार स्वरूपाचा उतारा आहे. 30 जून 2025 रोजी संपलेल्या तिमाहीच्या आर्थिक निकालांचे संपूर्ण स्वरूप स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइट www.bseindia.com आणि कंपनीच्या वेबसाइट www.katarespinningmillslimited.com. वर उपलब्ध आहे. **ब)** वरील आर्थिक निकालांचे पुनरावलोकन लेखापरीक्षण समितीने केले आहे आणि सोमवार 11 ऑगस्ट 2025 रोजी झालेल्या कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत त्यांना मान्यता दिली आहे.

**ठिकाण : सोलापूर**
**तारीख : 12/08/2025**

**कटारे स्पिनिंग मिल्स् लिमिटेड, करिता**
**सही /- किशोर ति. कटारे**
**डिन क्रमांक - 00645013**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# हजारो महिला, बालकांचे सैन्यांकडून लैंगिक शोषण

## संयुक्त राष्ट्र संघाचा रशिया, इस्रायलला इशारा | आरोप सिद्ध झाल्यास शिक्षा भोगण्यास तयार राहा




**न्यूयॉर्क, १३ ऑगस्ट**

रशिया आणि इस्रायली सशस्त्र दल आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांकडून हजारो महिला आणि बालकांचे लैंगिक शोषण केले जात असल्याचा अहवाल मानवाधिकार संघटनांकडून मिळाला आहे. सैन्यावरील आरोप सिद्ध झाल्यास गंभीर परिणाम भोगावे लागेल, असा इशारा संयुक्त राष्ट्र संघाचे महासचिव अँटोनियो गुटेरेस यांनी दिला. इस्रायलला युद्धात लैंगिक हिंसाचार करणाऱ्या देशांच्या यादीत समाविष्ट करण्यात येणार असल्याचे त्यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे.

युद्धक्षेत्रातील लैंगिक हिंसाचारावरील संयुक्त राष्ट्रसंघ सुरक्षा परिषदेला दिलेल्या वार्षिक अहवालात, गुटेरेस म्हणाले की, मानवाधिकार संघटना आणि संयुक्त राष्ट्रांचे प्रतिनिधी गाझा पट्टीत आणि युक्रेनच्या युद्ध सुरू असलेल्या भागात काम करीत आहेत. त्यांनी दिलेल्या अहवालात दोन्ही देशांच्या सैन्यांकडून महिला आणि बालकांच लैंगिक शोषण केले जात असल्याचा अहवाल पुराव्यासोबत प्राप्त झाला आहे. इस्रायली सशस्त्र आणि सुरक्षा दलांनी अटक केंद्रात आणि लष्करी तळावर पॅलेस्टिनी महिला आणि बालकांना बळजबरीने डांबले. तेथे त्यांचे अनेक दिवस लैंगिक शोषण करण्यात आले. नोंदवलेल्या प्रकरणांमध्ये पीडितांना गुप्तांगांना दुखापत, दीर्घकाळ जबरदस्तीने कपडयाविना डांबून ठेवणे आणि वारंवार त्यांच्यावर अत्याचार करण्याचा प्रकार समोर आला. सैन्याकडून लैंगिक हिंसाचाराचा प्रकार गंभीर आणि निषेधार्थ आहे. यासंदर्भात चौकशी केली जाईल आणि आरोप सिद्ध झाल्यास दोन्ही देशांना लैंगिक हिंसाचार करणाऱ्या देशांच्या यादीत समाविष्ट केले जाणार आहे.

### हिंसाचार थांबविण्यासाठी आचारसंहिता हवी



गाझा पट्टीतील युद्ध प्रभावित क्षेत्रात चौकशीसाठी आलेल्या संयुक्त राष्ट्र संघाच्या निरीक्षकांना इस्रायलने प्रवेश देण्यास नकार दिला. ही गंभीर बाब आहे. यामुळे सैन्याकडून होणाऱ्या लैंगिक हिंसाचाराच्या प्रकरणाची चौकशी करणे आमच्यासाठी आव्हान आहे. आरोपांची चौकशी, लष्करी आणि सुरक्षा दलांसाठी लैंगिक हिंसाचार प्रतिबंधित करणारे स्पष्ट आदेश आणि आचारसंहिता लागू करण्याची आवश्यकता असल्याचे गुटेरेस यांनी म्हटले आहे.

### रशियन सैन्याकडून नियमांचे उल्लंघन

गुटेरेस यांनी म्हटले की, रशियन सशस्त्र आणि सुरक्षा दल आणि सहयोगी सशस्त्र गटांकडून युक्रेन आणि रशियामधील ५० अधिकृत आणि २२ अनधिकृत अटक केंद्रांमध्ये युक्रेनियन युद्धकैद्यांवर अनन्वित अत्याचार केला जात आहे. यात विद्युत शॉक, गुप्तांगांवर हल्ला, शरीराला चटके देणे, जबरदस्तीने कपडे काढणे आणि दीर्घकाळ नग्न ठेवणे आदींचा समावेश आहे. रशियाकडून नियमांचे उल्लंघन केले जात असून त्यांच्यावर कठोर कारवाईची आवश्यकता आहे.

**महिला, पुरुष कैद्यांवर अत्याचार**

संयुक्त राष्ट्रांच्या सूचनेवरून मानवाधिकार आयोगाच्या सदस्यांनी गाझा पट्टीत जावून पीडितांची भेट घेतली असता, त्यांनी सैन्यांकडून महिला आणि पुरुषांवरदेखील अत्याचार झाल्याची पुष्टी केली. पॅलेस्टिनी महिला, पुरुष, मुली आणि मुलांवर केलेल्या लैंगिक अत्याचाराचे असंख्य पुरावे सदस्यांनी संयुक्त राष्ट्राला सोपविले आहे. (वृत्तसंस्था)

## उत्तराखंडमधील ११ जिल्ह्यांना पुराचा धोका

**डेहराडून/जम्मू, १३ ऑगस्ट**

उत्तराखंडमध्ये मुसळधार पाऊस सुरूच आहे. येथील ११ जिल्ह्यांमध्ये पूर आणि भूस्खलनाचा धोका आहे. ग्राउंड पेनिट्रेटिंग रडारच्या मदतीने, ५ ऑगस्ट रोजी पुरात बुडालेल्या धरालीमध्ये सुमारे तीन मीटर खोलीच्या २० ठिकाणी मानवी उपस्थिती शोधली जात आहे. ५ ऑगस्ट रोजी धरालीमध्ये ढगफुटी झाली होती, येथे ६६ लोक बेपत्ता आहेत.

हिमाचलप्रदेशात या पावसाळ्यात पावसाशी संबंधित घटनांमध्ये आतापर्यंत २२९ जणांचा मृत्यू झाला आहे. येथे ३९५ रस्ते बंद आहेत. केदारनाथ, बद्रीनाथ आणि हेमकुंड साहिबची यात्रा १४ ऑगस्टपर्यंत स्थगित करण्यात आली आहे.

### हिमाचलमध्ये आतापर्यंत २२९ जणांचा मृत्यू

जम्मू आणि काश्मीरमधील राजौरी, रियासी आणि पूंछ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसामुळे सर्व शाळा बंद आहेत. रियासीमध्ये सर्वाधिक २८४ मिमी पाऊस पडला. मध्य प्रदेशात या मान्सून हंगामात आतापर्यंत २९.७ इंच पाऊस पडला आहे, जो एकूण कोट्याच्या ७९ टक्के आहे. हवामान खात्याने जम्मू-काश्मीर, लडाख आणि तेलंगणामध्ये पावसासाठी रेड अलर्ट जारी केला आहे. उत्तरप्रदेश, बिहारसह ८ राज्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे तर मध्यप्रदेश आणि पंजाबसह १६ राज्यांमध्ये पावसासाठी पिवळा अलर्ट जारी करण्यात आला आहे. काही भागात वीज आणि जोरदार वारे देखील येऊ शकतात. (वृत्तसंस्था)



ढगफुटीनंतर आलेल्या प्रलयाला एका आठवड्यापेक्षा जास्त कालावधी होऊनही धराली येथे शोधकार्य सुरू आहे. कित्येक फूट जमा झालेला मलबा हटविण्यासाठी दररोज शेकडो जवान राबत आहेत

## पुरीमधील जगन्नाथ मंदिर उद्ध्वस्त करण्याची धमकी

### दोन भित्तिचित्रे आढळली

**पुरी, १३ ऑगस्ट**

ओडिशातील पुरीमधील १२ व्या शतकातील मंदिराजवळील एका लहान मंदिराच्या भिंतीवर बुधवारी 'दहशतवादी जगन्नाथ मंदिर पाडतील' अशी धमकी देणारी दोन भित्तिचित्रे आढळून आली, असे पोलिसांनी सांगितले.

बाली साही येथील माँ बुधी ठाकुरानी यांच्या मंदिराच्या भिंतीवर ओडिया भाषेत लिहिलेली धमकी सापडली. दहशतवादी श्रीमंदिर पाडतील. मला फोन करा, नाहीतर विनाश होईल, अशी धमकी एका भित्तिचित्रात लिहिलेली होती.

मंदिराच्या भिंतीवर अनेक फोन नंबर लिहिलेले आहेत. पीएम मोदी, दिल्ली असे शब्दही लिहिलेले आहेत, असे पुरी येथील एका रहिवाशाने सांगितले. त्यामुळे भाविकांमध्ये संताप निर्माण झाला. आम्ही या प्रकरणाची दखल घेतली आहे. आम्हाला काही माहिती मिळाल्याचे पोलिस म्हणाले. (वृत्तसंस्था)

## नागरिकत्व घेण्यापूर्वीच सोनिया गांधी यांचे नाव मतदारयादीत समाविष्ट

भारतीय जनता पक्षाचा आरोप

**नवी दिल्ली, १३ ऑगस्ट**



काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांना भारतीय नागरिकत्व मिळण्यापूर्वी त्यांच्या नावाचा समावेश मतदारयादीत करण्यात आला होता, असा मोठा आरोप भाजपने बुधवारी केला. हा प्रकार जवळपास ४५ वर्षांपूर्वीचा आहे.

सोनिया गांधी यांचा जन्म इटलीमध्ये १९४६ मध्ये झाला होता. त्यांचे नाव १९८० ते १९८२ च्या मतदारयादीत टाकण्यात आले होते. त्यानंतर वर्षभराने त्यांना भारतीय नागरिकत्व मिळाले, असा दावा भाजपाचे नेते अनुराग ठाकूर यांनी केला आहे. अशाच प्रकारचा आरोप भाजपाचे नेते अमित मालवीय यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये यापूर्वी केला होता.

१९८० मधील मतदार याद्यांची ही फोटोकॉपी असल्याचे मालवीय यांनी पोस्टमध्ये नमूद केले आहे. भारताचे नागरिकत्व घेतलेले नसताना सोनिया गांधी यांचे नाव मतदार यादीत आहे. हा उघडपणे केलेला निवडणूक गैरव्यवहार नाही का, असा प्रश्न त्यांनी या पोस्टमध्ये उपस्थित केला.

राजीव गांधी यांच्यासोबत १९६८ मध्ये विवाह करणाऱ्या सोनिया गांधी यांच्या नावाचा समावेश त्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या अधिकृत निवासस्थानात वास्तव्यास असताना मतदार यादीत करण्यात आला. (वृत्तसंस्था)

### ...ही तर फसवणूक

मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला भारतीय नागरिक असणे आवश्यक आहे. १९८२ मध्ये झालेल्या विरोधानंतर त्यांचे नाव यादीतून वगळण्यात आले. १९८३ मध्ये नागरिकत्व घेतल्यानंतर त्यांच्या नावाचा केलेला समावेशही फसवणूकच होती. मतदार यादीसाठी कट ऑफ तारीख १ जानेवारी होती. मात्र सोनिया गांधी यांनी एप्रिल महिन्यापासून नागरिकत्व घेतले होते, असे मालवीय म्हणाले.

## ...म्हणून सोडला नाही बंगला : मुंढे

**मुंबई** : ज्या भागात माझे घर आहे त्यामध्ये सध्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. तसेच नवे घर एवढ्या लवकर मिळणे शक्य नसल्याने मी शासकीय बंगला सोडला नसल्याचे माजी मंत्री धनंजय मुंढे यांनी सांगितले. मंत्रिपदाचा राजीनामा देऊन चार महिने झाले तरी बंगला न सोडल्याच्या बातम्या येत असल्याने मुंढे यांनी खुलासा केला. लवकरच बंगला खाली करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## एससी, एसटी आरक्षणासाठी क्रिमीलेयर लागू करायचे का?

- सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला मागितले उत्तर
- १० ऑक्टोबर रोजी पुढील सुनावणी

**नवी दिल्ली, १३ ऑगस्ट**

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अर्थात् एससी आणि एसटींच्या आरक्षणासाठी क्रिमीलेयर लागू करावे, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. ही याचिका सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारली असून याचिकाकर्त्याची बाजू ऐकल्यानंतर न्यायासनाने एससी, एसटी आरक्षणासाठी क्रिमीलेयर लागू करायचे का, असा सवाल करीत केंद्र सरकारला महिनाभरात उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले आहे.

१० ऑक्टोबर रोजी यावर पुढील सुनावणी होणार आहे. रमाशंकर प्रजापती यांनी वकिलामार्फत दाखल केलेल्या याचिका न्या. सूर्यकांत आणि न्या. जयमाल्या बागची यांच्या न्यायासनाने स्वीकारली. याचिकाकर्त्याच्या वकिलाने बाजू मांडताना सांगितले की, एससी, एसटी आरक्षणाचा फायदा बहुतांश श्रीमंत आणि आर्थिकदृष्टया सक्षम असणारा वर्गच घेत आहे. या आरक्षणासाठी पात्र असलेले गरीब लोक अजूनही मागास आहे. एससी, एसटींसाठीच्या आरक्षणात दोन स्तर असावेत, प्रथम आर्थिकदृष्ट्या कमकुवत लोकांना, नंतर इतरांना संधी मिळावी. याचिकाकर्त्याने २०२४ च्या देविंदर सिंग खटल्याचा उल्लेख करीत सांगितले की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींमध्येही क्रिमीलेयर म्हणजेच श्रीमंत वर्ग ओळखला जाऊ शकतो आणि आरक्षणातून त्यांना वगळले जाऊ शकते, असे केल्यानेच खरी समानता प्राप्त होईल असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला होता.

न्यायासनाने याचिकाकर्त्याची बाजू ऐकून घेतल्यानंतर केंद्र सरकारला नोटीस बजावत यावर महिनाभरात भूमिका सादर करण्याचे आदेश दिले. सरकार संविधानाला बांधील केंद्र सरकारने ९ ऑगस्ट २०२४ रोजी घोषणा केली होती की अनुसूचित जाती आणि जमातींच्या आरक्षणात क्रिमीलेयर लागू होणार नाही. रालोआ सरकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बनवलेल्या संविधानाला बांधील आहे, असे मंत्रिमंडळ बैठकीनंतर केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत सांगितले होते.

**अनुसूचित जातींचे विभाजन करण्यास मान्यता** : १ ऑगस्ट २०२४ रोजी, सर्वोच्च न्यायालयाने स्वतःचा २० वर्षे जुना निर्णय रद्द केला आणि म्हटले की राज्य सरकारे अनुसूचित जातींचे विभाजन करून त्यांना आरक्षणाचा कोटा लागू करू शकतील आणि असे करणे संविधानाच्या कलम ३४१च्या विरुद्ध नाही.



स्वातंत्र्यदिनी होणाऱ्या परेडसाठी निमलष्करी दलातील महिला बटालियनच्या जवानांची जोरदार तयारी सुरू आहे. छत्तीसगडमधील जगदलपूर येथे सराव करताना जवान

## 'निवडणुका एकत्रितपणे लढवण्याबाबत निर्णय नाही'

**पुणे, १३ ऑगस्ट**

राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाविकास आघाडीमधील घटक पक्ष एकत्रितपणे लढवतील की नाही यावर अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही, असे महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी सांगितले. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांसाठी येथे आयोजित केलेल्या दोन दिवसांच्या कार्यशाळेच्या वेळी ते पत्रकारांशी बोलत होते. महाविकास आघाडीचे भागीदार या निवडणुका एकत्र लढवतील का असे विचारले असता त्यांनी ही माहिती दिली. काँग्रेस या मुद्द्यावर विचार करेल व युती 'होऊ शकते किंवा नाही' याबाबत ठरवेल, असे चेन्नीथला यांनी सांगितले. शिवसेना (उबाठा) प्रमुख उद्धव ठाकरे व त्यांचे चुलत भाऊ व मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्याशी हातमिळवणी करण्याबाबत काँग्रेसला कोणतेही आक्षेप नाहीत, असेही ते म्हणाले. बृहन्मुंबई महानगरपालिकेसह राज्यातील विविध स्थानिक आणि नागरी संस्थांच्या निवडणुका या वर्षाच्या अखेरीस होण्याची शक्यता आहे. काँग्रेस, शिवसेना (उबाठा) व शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने गत वर्षी लोकसभा व विधानसभा निवडणुका महाविकास आघाडीचा भाग म्हणून एकत्र लढवल्या.

**मनसे आघाडीचा भाग नाही**

आम्ही अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही. आमची राजकीय बैठक नियोजित आहे, यात युतीच्या मुद्द्यावर सविस्तर चर्चा केली जाईल. मनसे युतीचा भाग नाही. दोन्ही चुलत भाऊ हातमिळवणी करतात तर आम्हाला काही हरकत नाही, असे चेन्नीथला म्हणाले. (वृत्तसंस्था)

## झारखंडमध्ये माओवाद्याचा खात्मा

**चायबासा** : झारखंडमधील पश्चिम सिंघभूम जिल्ह्यात बुधवारी झालेल्या चकमकीत सुरक्षा दलाने एका माओवाद्याचा खात्मा केला, अशी माहिती पोलिसांनी दिली. आज सकाळी सुरक्षा दलाचे जवान शोधमोहीम राबवत असताना गोलिकेरा पोलिस ठाणे हद्दीतील सौता परिसरात ही चकमक झडली, असे वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. माओवादी आणि सुरक्षा दलाच्या जवानांनी परस्परांवर जोरदार गोळीबार केला. यात एक माओवादी ठार झाला, असे कोल्हनचे पोलिस महानिरीक्षक मनोज कौशिक यांनी सांगितले. परिसरात सध्या शोधमोहीम सुरू आहे.

## हरयाणाच्या दोन जिल्ह्यांत देशातील पहिली हायड्रोजन ट्रेन

- भारत जगातील पाचवा देश बनणार
- पूर्णपणे प्रदूषणमुक्त तंत्रज्ञान

**नवी दिल्ली, १३ ऑगस्ट**

देशातील पहिली हायड्रोजन ट्रेन जिंद-गोहाना-सोनीपत ट्रॅकवर धावण्यासाठी सज्ज आहे. जर्मनी, फ्रान्स, स्वीडन आणि चीननंतर ही तंत्रज्ञान स्वीकारणारा भारत जगातील पाचवा देश बनेल. यासाठी जिंदमध्ये एक आधुनिक हायड्रोजन प्लांट बांधला जात आहे आणि इंजिन देखील तयार करण्यात आले आहे.

ही ट्रेन जगातील सर्वात लांब आणि सर्वात शक्तिशाली हायड्रोजन ट्रेन असेल, जी २,६३८ प्रवासी वाहून नेण्यास सक्षम असेल आणि ताशी ११० ते १४० किलोमीटर वेगाने धावेल.



हायड्रोजन फ्युएल सेल तंत्रज्ञानावर आधारित, ही ट्रेन फक्त पाणी आणि वाफ उत्सर्जित करेल, ज्यामुळे कोणतेही प्रदूषण होणार नाही.

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी त्यांच्या एक्स हँडलवर देशातील पहिल्या हायड्रोजन ट्रेनचा व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये तिची रचना आणि वैशिष्ट्ये दर्शविली आहेत. त्यांनी सांगितले की रेल्वे लवकरच ही ट्रेन रुळांवर सुरू करण्याची योजना आखत आहे. पर्यावरणपूरक आणि शाश्वत वाहतुकीच्या क्षेत्रात हा प्रकल्प भारतासाठी एक ऐतिहासिक कामगिरी असेल. (वृत्तसंस्था)

### जगातील सर्वांत लांब व शक्तिशाली

भारतीय रेल्वेच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ही ट्रेन जगातील सर्वात लांब आणि सर्वात शक्तिशाली हायड्रोजनवर चालणारी ट्रेन असेल. चेन्नईतील इंटिग्रल कोच फॅक्टरीमध्ये त्याचा कोच तयार करण्यात आला आहे आणि त्याची चाचणी नुकतीच यशस्वीरित्या पूर्ण झाली आहे. १२०० हॉर्सपॉवरची ही ट्रेन भारताला हायड्रोजन ट्रेन तंत्रज्ञानात अग्रणी बनवेल. हायड्रोजन ट्रेन फॉर हेरिटेज उपक्रमांतर्गत, रेल्वेने ३५ हायड्रोजन ट्रेन चालवण्याची योजना आखली आहे.

## न्यूयॉर्कमधील परेडसाठी रश्मिका, विजयची निवड




**न्यूयॉर्क** : यंदा न्यूयॉर्कमध्ये होणाऱ्या इंडिया डे परेडसाठी प्रसिद्ध दाक्षिणात्य चित्रपट कलाकार रश्मिका मंधाना आणि विजय देवरकोंडा यांना सह ग्रॅण्ड मार्शल म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे. १७ ऑगस्ट रोजी मॅडिसन अव्हेन्यूवर होणारा हा उत्सव सर्वे भवन्तु सुखिन: या संस्कृत वाक्याच्या मध्यवर्ती कल्पनेसह आयोजित करण्यात येणार आहे, याचा अर्थ 'सर्वजण आनंदी, सुखी राहोत' असा होतो. या वाक्याचा उद्देश जागतिक अशांततेच्या काळात शांततेचा संदेश देणे आहे, असे आयोजकांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# संख्यावाढीसोबत प्रतिमाही उजळावी..!

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवार, १२ ऑगस्ट २०२५ च्या बैठकीत राज्य पोलिस दलात शिपायांची १५,६३१ पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या भरतीमध्ये २०२२ व २०२३ या वर्षात संबंधित पदांची वयोमर्यादा ओलांडली असेल, तरीही त्यांना एकावेळची विशेष बाब म्हणून या भरतीसाठी अर्ज करता येणार आहे. या भरतीत पोलिस शिपाई १२,३९९, पोलिस चालक २३४, बँड्समन २५, सशस्त्र पोलिस शिपाई २,३९३, कारागृह शिपाई ५८० अशा एकूण १५,६३१ पदांची भरती केली जाणार आहे. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रात ५० हजार पोलिसांची भरती करण्यात आल्याची माहिती आहे. तरीसुद्धा १२ कोटी ८३ लाख लोकसंख्येच्या महाराष्ट्रात सध्या १ लाख ९८ हजार ७७० पोलिस आहेत. या आकडेवारीनुसार १ लाख लोकसंख्येमागे केवळ १६९ पोलिस आहेत, जे १८८ असायला हवे आहेत. संयुक्त राष्ट्र मानकानुसार ४५० लोकांमागे १ पोलिस असायला हवा आहे, भारतात हे प्रमाण फार कमी आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर पाहिले तर, भारतातील पोलिस-लोकसंख्या गुणोत्तर कमी आहे. अमेरिकेत १ लाख लोकसंख्येमागे १९६ पोलिस, तर रशियात ५२२ पोलिस आहेत. भारतात हे प्रमाण सरासरी १४० आहे आणि महाराष्ट्रात ते त्यापेक्षा अधिक म्हणजे १६९. म्हणजेच राष्ट्रीय सरासरीपेक्षा किंचित जास्त आहे. मात्र, वाढत्या गुन्हेगारी आणि सामाजिक आव्हानांच्या पृष्ठभूमीवर हे प्रमाण अपुरे आहे. महाराष्ट्रातील सर्वसामान्य लोकांचा पोलिसांप्रति दृष्टिकोन संमिश्र आहे. एकीकडे, पोलिस हे कायदा आणि सुव्यवस्थेचे रक्षक मानले जातात, तर दुसरीकडे, अनेकदा त्यांच्यावर भ्रष्टाचार, गैरव्यवहार आणि असंवेदनशीलतेचे आरोप होतात. सायबर गुन्ह्यांच्या तक्रारी नोंदविताना तक्रारदारांना लागू होणारी कायद्याची कलमे सुचवावी लागतात, असे आपण अनेकदा पाहतो किंवा ऐकतो. तसेच, बलात्कार आणि महिलांवरील अत्याचार प्रकरणांमध्ये पोलिसांची उदासीनता आणि कायद्याविषयी अज्ञान यामुळे तक्रारी नोंदविण्यात विलंब होतो, ज्यामुळे सर्वसामान्यांचा विश्वास कमी होतो. महाराष्ट्रातील सामाजिक आणि आर्थिक वैविध्यामुळे पोलिसांप्रति लोकांचा दृष्टिकोन वेगवेगळा आहे. शहरी भागांमध्ये, विशेषतः मुंबई आणि पुण्यासारख्या शहरांमध्येसुद्धा शिक्षित आणि मध्यमवर्गीय लोक पोलिसांशी संपर्क साधण्यास कचरतात. कारण त्यांना पोलिसांशी संबंधित प्रक्रिया त्रासदायक आणि वेळखाऊ वाटते. ग्रामीण भागात पोलिसांशी संपर्क हा बहुतांशी स्थानिक पोलिस ठाण्यांपुरता मर्यादित असतो, जिथे स्थानिक प्रभाव आणि राजकीय हस्तक्षेप यामुळे पोलिसांची कार्यक्षमता कमी होते. एकदा इंग्लंडमध्ये गेलेल्या एका भारतीयाने परतल्यानंतर एक किस्सा सांगितला होता. इंग्लंडमध्ये फिरत असताना एका निर्जन रस्त्यावर त्यांची कार बंद पडली. कारवाला मित्र आता काय करता येईल, याचा विचार करीत असतानाच एक पोलिस वाहन येताना दिसले. कारवाल्या मित्राला आनंद होऊन तो सुटकेचा निःश्वास सोडतो. पोलिस आल्यामुळे आता काही चिंता नाही, असेही म्हणतो. हा भारतीय नागरिक म्हणतो, भारतात असे नाही होणार. संकटात असलेल्यांना पोलिस येताना पाहून धडकीच भरेल. आता पोलिस काय विचारतील, कसे विचारतील, कसे वागतील, अशा शंका भारतीयांच्या मनात येतील. पोलिस म्हणजे 'आ बैल मुझे मार..' असेच होते, ही आपल्या देशातील आणि राज्यातील पोलिसांची प्रतिमा बदलण्याची गरज आहे. ही प्रतिमा बदलण्याची जबाबदारी आज आणि उद्याही प्रामुख्याने पोलिसांचीच आहे. पोलिस म्हटले की भारतीय माणसाच्या मनात कशी धडकी भरते, कशी धडधड वाढते, पोलिसांची भानगड नको आणि कधी कधी तर पोलिसांची मदतही नको, असे वाटते. सर्वसामान्यांना असे का वाटते, याचा विचार पोलिसांनीच करण्याची गरज आहे. यवतमाळातील एकाची स्कूटर चोरीला गेली. त्याने रितसर रिपोर्ट दिला. त्या दिवशीपासून दोन-तीन दिवस रोज, काय झाले, कसे झाले, केव्हा झाले, तुम्ही काय करत होता, अशा पोलिस चौकशांमुळे तो बेजार झाला. चौथ्या दिवशी तो पुन्हा पोलिस ठाण्यात गेला. त्याने ठाणेदारांना विनंती केली, 'तुम्ही माझी स्कूटर शोधू नका. हवे तर मी तसे लिहून देतो. माझ्या स्कूटरचा विमा आहे. नियमाप्रमाणे मला पैसे मिळतीलच, पण माझ्या स्कूटरचा 'असा' तापदायक शोध थांबवा.' काही वेळा पोलिसी कार्यवाहीचा भाग म्हणून असे प्रकार होतही असतील, पण अशी प्रतिमा निर्माण होणे योग्य नाहीच. पोलिसांना त्यांच्या कामाच्या तुलनेत पैसे कमी मिळतात हे खरे असले, तरी अनेकांना तर काहीच मिळत नाही. तिथे त्यांचे तर याहीपेक्षा कमी पगारात भागते. आपण पोलिस म्हणून काम करू लागलो आहोत तर ते स्वीकारायलाच हवे आहे. पूर्वी कसे असायचे म्हणतात की, एखाद्या प्रकरणी मला सवलत द्या, चौकशी मंदगतीने करा, त्रास देऊ नका, केस जमेल तेवढी ढिली करून ठेवा, अशा 'फेवर'साठी पोलिस पैसे मागायचे आणि संबंधित नागरिक त्यासाठी तयारही असायचा. पण गेल्या काही वर्षांत तर, तुमच्या तक्रारीवर चौकशी करायची असेल, तपास करायचा असेल, आरोपी शोधायचा असेल, जप्त केलेला माल परत हवा असेल, तर अशा पीडितालाच म्हणे पोलिसांना पैसे द्यावे लागतात. अर्थातच हे प्रमाण १० टक्केच आहे, असे गृहीत धरले तरी १० टक्केसुद्धा का, हा प्रश्न चुकीचा ठरत नाही. यातही सन्माननीय अपवाद असतीलच, हे मान्य.

'दहा अपराधी सुटले तर चालतील, पण एक निरपराध अडकायला नको' अशी पोलिसांची कार्यपद्धती असावी असे मानतात. पण यात अपराधी सुटण्याचे प्रमाणसुद्धा वाढायला नको, याचे भान पोलिसांनाच ठेवायचे आहे. चोर, लुटेरे, भामटे, जुगारी, चिडीमार, बलात्कारी, भाईगिरी अशांना दिल्यास सर्वसामान्यांना फारशी हरकत नसते. पण कधी कधी पोलिसी खाक्या दाखवण्यात सर्वसामान्य माणूस भरडला जात असेल तर त्याचा नकारात्मक संदेश समाजात जातो, यासाठीही पोलिसांनाच सतर्क राहावे लागणार आहे. पोलिसांची नेमकी कामे कोणती, हा प्रश्न जागरूक नागरिक आणि पोलिसांकडूनही विचारला जातो. चोऱ्या, दरोडे, भांडण, मारामारी, खूनखराबा, हल्ले, दंगली, अपघात, आगी, आपत्ती अशा प्रसंगी पोलिस हवेच असतात, नव्हे ती पोलिसांचीच जबाबदारी असते. आता यात सायबर गुन्हेगारीची भर पडली आहे. सुदैवाने सायबर विभाग पोलिसांनी वेगळा सुरू केला आहे. तसेच आर्थिक गुन्हेगारी संदर्भातही आहे. सायबर बाबतीत एकवेळ समजू शकतो. पण आर्थिक गुन्हेगारी, त्याचे प्रकार, त्यातील बारकावे, आम्ही कसे काय समजू शकतो किंवा याचाही आम्हाला नेमका अभ्यास कसा असू शकतो, असे प्रश्न पोलिसांतर्फे विचारले जातात. गावात होणाऱ्या अवैध बांधकामांच्या तक्रारीसुद्धा नगर पालिकांसारख्या संस्था पोलिसांकडे करून हात मोकळे करतात. अनेकदा तर पोलिसांकडे गुन्हा दाखल झाला असल्यामुळे आता आम्ही काय करू शकतो, असे सांगून आधी धुवून घेतलेले हात वर करण्याचा उद्योगही स्थानिक स्वराज्य संस्थांचे पाईक नेहमीच करत असतात. आता अवैध बांधकाम, नगररचना कायदा यांचाही अभ्यास आम्ही कसा आणि किती करावा, असे प्रश्न पोलिसवाले प्रश्नकर्त्यांना नेहमी विचारत असतात. व्हीआयपी सुरक्षा हा तर नेहमीच पोलिसांसाठी संवेदनक्षम विषय असतो. कोणाची, कशासाठी, किती वेळ, कोणत्या पद्धतीने सुरक्षा आम्ही पाहात राहायची, त्यात किती पोलिस किती दीर्घकाळ गुंतवून ठेवायचे, असेही पोलिसवाले नेहमीच विचारत असतात. मुंबईसारख्या महानगरातील ३२,१२१ पैकी ७,१२५ पोलिसांना निवासस्थान नाही. यामुळे पोलिसांवर मानसिक आणि शारीरिक ताण वाढतो, ज्याचा परिणाम त्यांच्या कार्यक्षमतेवर होतो. तसेच, रिक्त पदांमुळे विशेषतः गुन्हे शाखा, वाहतूक विभाग आणि दहशतवादविरोधी तुकडी यांसारख्या महत्त्वाच्या विभागांमध्ये मनुष्यबळाची कमतरता जाणवते. तरीही, महाराष्ट्र पोलिसांनी अनेकदा आपली कार्यक्षमता आणि कर्तव्यनिष्ठा दाखवली आहे. कोविड-१९ दरम्यान कायदा आणि सुव्यवस्थेसाठी आणि सार्वजनिक सुरक्षेसाठी उत्तम योगदान दिले. दहशतवादी हल्ले आणि मोठ्या गुन्ह्यांचा तपास करण्यात पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. वाढीव पदांच्या भरतीने पोलिस आणि लोकांमधील विश्वास व सुसंवाद वाढेल आणि कायदा व सुव्यवस्था हे नुसते धोरण राहणार नाही, तर ते अनुभवाला येईल, असे व्हावे, इतकेच.

## तंत्रवेध

# अडचणीचा ठरतोय अमेरिकन व्हिसा

डॉ. दीपक शिकारपूर

अमेरिका म्हणजे संधीचे महाद्वार हा समज भारतीय युवा पिढीत १९८० नंतर प्रचलित झाला. उच्च शिक्षण आणि नंतर नोकरी-व्यवसाय अशा पद्धतीने हजारोंच्या संख्येने भारतीय तिथे रहिवास करू लागले. काही लोक त्याला 'ब्रेन ड्रेन' असेही म्हणतात. त्यासाठी लागणारे अत्यावश्यक घटक म्हणजे पासपोर्ट आणि व्हिसा. अमेरिकन एच-१बी व्हिसा हा कुशल देशी कामगारांना (विशेषतः तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, विज्ञान आणि वैद्यकीय क्षेत्रातील) अमेरिकेत तात्पुरत्या स्वरूपात काम करण्याची परवानगी देणारा एक नॉन-इमिग्रंट व्हिसा आहे. एच-१बी व्हिसाची मुळे १९५२ च्या इमिग्रेशन आणि नॅशनॅलिटी ॲक्टमध्ये आहेत. सुरुवातीला याला एच-१ व्हिसा असे म्हटले जात असे आणि तो असामान्य स्वरूपाच्या सेवा प्रदान करू शकणाऱ्या परदेशी व्यक्तींसाठी होता. १९८० च्या दशकात अनेक संगणक व्यावसायिक बी-१ (बिझनेस व्हिसा) वर काही कालावधीसाठी अमेरिकेत जाऊन काम करत. हजारोंच्या संख्येने भारतीय संगणक तज्ज्ञ तिथे पाठवले (याला बॉडी शॉपिंग असेही म्हटले जायचे). स्थानिक संगणक व्यावसायिकांपेक्षा भारतीयांचा पगार आणि इतर खर्च कमी असल्याने याचे प्रमाण वाढत गेले. १९९० मध्ये राष्ट्राध्यक्ष जॉर्ज एच. डब्ल्यू. बुश यांनी इमिग्रेशन ॲक्ट ऑफ १९९० वर स्वाक्षरी केली, ज्याने एच-१ व्हिसाचे विभाजन एच-१ए (नर्सेससाठी, जो आता अस्तित्वात नाही) आणि एच-१बी (विशेष व्यवसायांसाठी) मध्ये केले. याच कायद्याने एच-१बी व्हिसासाठी वार्षिक ६५,००० इतकी मर्यादा (कॅप) निश्चित केली. तसेच, नियोक्त्यांना कर्मचाऱ्याला किमान प्रचलित मजुरी देणे बंधनकारक केले.

१९९० च्या दशकात तंत्रज्ञान क्षेत्राच्या वाढीमुळे कुशल कामगारांची मागणी वाढली. यामुळे १९९९-२००० मध्ये एच-१बी व्हिसाची मर्यादा १,१५,००० पर्यंत वाढवण्यात आली. नंतर ती १,९५,००० पर्यंत पोहोचली (जी २००३ पर्यंत लागू होती). २००० नंतर डॉट कॉम उद्योगाचा फुगा फुटल्याने तंत्रज्ञान क्षेत्रातील मागणी कमी झाली. त्यामुळे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांच्या दुसऱ्या कार्यकाळात (२००४-२००८) एच-१बी व्हिसाची मर्यादा पुन्हा ६५,००० पर्यंत आणली गेली, पण अमेरिकेतून मास्टर्स डिग्री घेतलेल्यांसाठी अतिरिक्त २०,००० जणांच्या व्हिसाचा कोटा ठेवण्यात आला. २००७ मध्ये अमेरिकेत आर्थिक मंदी सुरू झाली. यामुळे बराक ओबामा प्रशासनाने २००९ मध्ये एम्प्लॉय अमेरिकन वर्कर्स कायदा संमत केला. यामुळे सरकारने निधी दिलेल्या



कंपन्यांना एच-१बी व्हिसावर विदेशी कामगार भरती करण्यावर निर्बंध आले. डोनाल्ड ट्रम्प राष्ट्राध्यक्ष असताना अमेरिका फर्स्ट धोरणामुळे एच-१बी व्हिसावर अनेक निर्बंध आले. २०२० मध्ये कोविड महामारीच्या काळात तर एच-१बी व्हिसा देण्यावर तात्पुरती बंदी घालण्यात आली होती. जो बायडन सत्तेवर आल्यानंतर एच-१बी व्हिसावरील बंदी हटवण्यात आली.

राष्ट्राध्यक्ष झाल्यावर डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक धोरणात्मक बदल केले. त्यात प्रामुख्याने आयात शुल्क तसेच स्थानिक अमेरिकन व्यक्तींना प्राधान्य देण्याच्या धोरणाचा समावेश होता. त्यामुळे ते स्थलांतराच्या विरोधी आहेत. मेक्सिको सीमेवर कुंपण घालण्याची घोषणा याच प्रक्रियेचा भाग आहे. अमेरिकन व्हिसा प्रक्रियेत सध्या होणाऱ्या बदलांमुळे भारतीय नागरिकांवर मोठा परिणाम होत आहे. विशेषतः एच-१बी तांत्रिक कामगार व्हिसा, जन्मजात नागरिकत्व, व्हिसा मुलाखतीची अट आणि नूतनीकरणाच्या प्रक्रियेमध्ये झालेल्या बदलांमुळे अनेक प्रवासी, विद्यार्थी आणि उद्योजक गोंधळात सापडले आहेत. एच-१बी व्हिसाची मागणी उपलब्ध व्हिसापेक्षा जास्त असल्याने दरवर्षी लॉटरी पद्धतीने अर्जदारांची निवड केली जाते. तथापि, सध्या अमेरिकेचे डिपार्टमेंट ऑफ होमलँड सिक्युरिटी लॉटरी प्रणालीऐवजी वेतनआधारित निवड प्रक्रिया लागू करण्याचा विचार करत आहे. नवीन प्रस्तावानुसार, एच-१बी व्हिसा वाटप करताना ऑक्युपेशनल एम्प्लॉयमेंट स्टॅटिस्टिक्सच्या वेतन स्तरांना प्राधान्य दिले जाईल. याचा अर्थ, ज्या पदांसाठी अधिक वेतन दिले जाते (लेव्हल ४) त्यांना प्राधान्य मिळेल, त्यानंतर लेव्हल ३, लेव्हल २ आणि शेवटी लेव्हल १ यांना. एच-१बी व्हिसाचे सर्वाधिक लाभार्थी असल्याने, या बदलांचा भारतीयांवर मोठा परिणाम होईल. सध्या लॉटरी पद्धतीने व्हिसा मिळत असल्याने करीअरची निवड व्हिसा मिळण्याच्या शक्यतांवर आधारित होती. नवीन प्रणालीमुळे उच्च वेतन असलेल्या पदांना प्राधान्य मिळेल.

अमेरिकेत जन्म झाल्यावर नागरिकत्व मिळविण्याच्या परंपरेत आता बदल प्रस्तावित आहेत. नव्या अटींनुसार जन्म घेणाऱ्या पालकांपैकी एक जण अमेरिकन नागरिक, ग्रीन कार्डधारक किंवा सैन्य सदस्य असणे आवश्यक आहे. त्यामुळे एच-१बी किंवा ग्रीन कार्डवर असलेल्या भारतीय दाम्पत्यांच्या मुलांना नागरिकत्व मिळविण्यासाठी अधिक कष्ट करावे लागतील. व्हिसा अर्जात गेल्या पाच वर्षांमध्ये वापरलेल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सची माहिती देणे अनिवार्य झाले आहे. अर्ज मिळाल्यानंतरही दूतावास नियमित तपासणी करत आहे. गोपनीयतेबाबत चिंतेचा विषय निर्माण झाला असून चुकीच्या माहितीमुळे व्हिसा नाकारले जाण्याची शक्यता आहे. ड्रॉपबॉक्स पात्रता १२ महिन्यांपर्यंत कमी करण्यात आली आहे. दिल्ली, मुंबई, चेन्नईसह मोठ्या शहरांमध्ये व्हिसासाठी प्रतीक्षा काळ ४२० दिवसांहून अधिक असून व्यावसायिक, शैक्षणिक आणि पर्यटन उद्दिष्टांसाठी प्रवास करणाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. सद्यस्थितीत अमेरिकेत शिक्षणासाठी जाणे आणि शिक्षणानंतर तिथेच करीअर करणे, पूर्वीपेक्षा अधिक आव्हानात्मक झाले आहे, असे म्हणता येईल. केवळ एच-१बीच नाही, तर विद्यार्थी व्हिसा (एच-१बी व्हिसा) मिळविण्यातही काही अडचणी येत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या नियोजित शैक्षणिक वर्षासाठी वेळेत अमेरिकेत पोहोचण्यात अडचण येते.

२१४(बी) कलमानुसार व्हिसा नाकारण्याचे प्रमाण काही प्रमाणात वाढले आहे. या कलमानुसार, तुम्ही तुमच्या मूळ देशाशी पुरेसे संबंध सिद्ध न करू शकल्यास व्हिसा नाकारला जाऊ शकतो. अनेकदा चांगले प्रोफाईल असलेल्या विद्यार्थ्यांनाही या कारणास्तव नकार मिळाल्याचे दिसून आले आहे. एच-१बी व्हिसा हा अनेकदा ग्रीन कार्ड मिळविण्याच्या दिशेने पहिले पाऊल मानले जाते. एच-१बी व्हिसा मिळविणेच कठीण झाले, तर भारतीय विद्यार्थ्यांसाठी अमेरिकेत कायमस्वरूपी स्थायिक होण्याचा मार्ग अधिक लांबचा आणि अवघड होऊ शकतो. या आव्हानांमुळे अनेक भारतीय विद्यार्थी आता इतर देशांकडे वळताना दिसत आहेत. कॅनडा, ऑस्ट्रेलिया, जर्मनी आणि युनायटेड किंग्डमसारख्या देशांमध्ये शिक्षणानंतर नोकरीच्या अधिक सोप्या संधी उपलब्ध असल्याने भारतीय विद्यार्थ्यांसाठी आकर्षक पर्याय ठरत आहेत. काहींनी जपान हा पर्याय निवडला आहे. दुसऱ्या बाजूने विचार करता भारतातही आता उच्च शिक्षणाचे उत्तम पर्याय उपलब्ध असून अनेक क्षेत्रांमध्ये जागतिक दर्जाचे शिक्षण दिले जाते. त्यामुळे शिक्षणासाठी परदेशीच जायला पाहिजे, असे काही बंधन नाही. अनेक परदेशी विद्यापीठे आता आपल्या देशात त्यांची ऑफशोर केंद्रे उभारत आहेत. नुकतेच नवी मुंबईमध्ये अशाच एका केंद्राचे उद्घाटन झाले. आज अनेक जागतिक उद्योग भारतात जीसीसी (ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स) निर्माण करीत आहेत. फक्त महाराष्ट्रातच अशी ७०० हून अधिक केंद्रे विकसित झाली आहेत.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## दिल्ली वार्तापत्र

# राहुल गांधींना झालंय तरी काय?

श्यामकांत जहागीरदार

बिहारमधील मतदार यादी पुनरीक्षण अभियान आणि कथित मतचोरीच्या मुद्द्यावरून काँग्रेसच्या नेतृत्वातील विरोधी पक्षांनी संसदेपासून सडकेपर्यंत संघर्ष सुरू केला आहे. काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतचोरीच्या मुद्द्यावरून आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी या मुद्द्यावरून निवडणूक आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न केला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यापासून गांधी तसेही निवडणूक आयोगावर हल्ला चढवत आहेत. आपल्या पराभवाचे खापर आयोगावर फोडण्याचा प्रयत्न करीत आहेत. यासाठी मतदार यादीतील कथित गैरप्रकार जबाबदार असल्याचा त्यांचा आरोप आहे.

राहुल गांधींचा हा प्रयत्न म्हणजे शाळेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याने आपल्या अपयशासाठी शाळेच्या मुख्याध्यापकाला जबाबदार धरण्यासारखे आहे. मुख्याध्यापकाला जबाबदार धरताना तो विद्यार्थी आपण शाळेत नियमित आलो नाही, शिक्षक वर्गात जे शिकवत होते, त्याकडे आपण लक्ष दिले नाही तसेच घरी अभ्यास केला नाही, याचे भान ठेवत नाही; तशीच स्थिती राहुल गांधींची झाली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत झालेला पराभव हा काही काँग्रेस पक्षाचा पहिला पराभव नाही, तर सलग तिसरा पराभव आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीपासून काँग्रेस पक्षाच्या पराभवाची मालिका सुरू झाली. विशेष म्हणजे या तिन्ही निवडणुकांत काँग्रेसचे नेतृत्व राहुल गांधीकडे होते आणि अजूनही आहे. मागील ११ वर्षांतील आपल्या पराभवाचे खापर निवडणूक आयोगावर फोडण्यापेक्षा त्यांनी काँग्रेस पक्षाच्या पराभवाचे आत्मपरीक्षण केले असते, त्यानंतर पक्षसंघटनेत सुधारणा करीत ती मजबूत केली असती, तर त्यांच्यावर आज ही वेळ आली नसती.

निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर आणि निर्णय प्रक्रियेवर राहुल गांधींचे काही आक्षेप असू शकतात. मात्र, ऊठसूट निवडणूक आयोगावर आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा त्यांनी या मुद्द्यावर निवडणूक आयोगाशी समोरासमोर चर्चा करीत त्याचा एकदाचा सोक्षमोक्ष लावायला पाहिजे होता. निवडणूक आयोगाने याआधी एकदा राहुल गांधींना पत्र पाठवत चर्चेसाठी आमंत्रित केले होते, पण



आयोगाचे चर्चेचे निमंत्रण राहुल गांधींनी स्वीकारले नाही. आपण करीत असलेले आरोप खरे आहेत, त्याचे कागदोपत्री पुरावे आपल्याजवळ आहेत, याची खात्री होती, तर राहुल गांधी हिंमत दाखवून आयोगाकडे चर्चेसाठी का गेले नाही, याचे उत्तर त्यांनी देशवासीयांना देण्याची वेळ आली आहे.

मतचोरीच्या मुद्द्यावर निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर इंडिया आघाडीने राहुल गांधी आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांच्या नेतृत्वात मोर्चा काढला. आयोगाने ३० नेत्यांच्या प्रतिनिधी मंडळाला चर्चेसाठी बोलावले होते. गांधींनी इंडिया आघाडीच्या ३० नेत्यांच्या प्रतिनिधी मंडळासोबत निवडणूक आयोगाशी कथित मतचोरीच्या मुद्द्यावर चर्चा करायला हवी होती, पण तसे काही त्यांनी केले नाही. कारण निवडणूक आयोगासमोरच्या चर्चेत आपला युक्तिवाद आणि भुसभुशीत पुरावे टिकणार नाहीत, याची राहुल गांधींना खात्री असावी. त्यामुळेच त्यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यालयात जाणे टाळले.

राहुल गांधींनी सरकारवर आणि निवडणूक आयोगावरही आरोप करायला हरकत नाही; मात्र हे आरोप करताना त्यांनी ठोस पुरावे द्यायला पाहिजे. मतचोरीच्या आरोपावर निवडणूक आयोगाने त्यांना शपथपत्रावर आरोप करायला सांगताच राहुल गांधी रणछोडदासच्या भूमिकेत का जातात, हा सर्वांना पडलेला प्रश्न आहे. मतचोरीबाबत राहुल गांधींनी काँग्रेसची सत्ता असलेल्या कर्नाटकातील बंगळुरू लोकसभा मतदारसंघातील महादेवपुरा विधानसभा मतदारसंघाचे उदाहरण दिले आहे. विशेष म्हणजे या मुद्द्यावरून कर्नाटकचे बडतर्फ सहकार मंत्री के. एन. राजन्ना यांनी आपल्याच पक्षाच्या सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. मतपत्रिकेचा हा घोटाळा काँग्रेस सरकारच्या उपस्थितीत आणि देखरेखीत झाल्याचा घरचा अहेर राजन्ना यांनी केला. यामुळे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी त्यांची आपल्या मंत्रिमंडळातून हकालपट्टीही केली.

राहुल गांधी आणि विरोधी पक्षनेते या पदाबद्दल पूर्ण आदर बाळगून असे म्हणावेसे वाटते की, राहुल गांधींना विरोधी पक्षनेते म्हणून आपला पाहिजे तसा प्रभाव पाडता आलेला नाही. विरोधी पक्षनेता सभागृहात बोलायला उभा झाल्यावर सत्तारूढ पक्षाच्या मंत्र्यांना घाम फुटतो. याचा अनुभव भाजपाच्या राजवटीत काँग्रेसच्या अनेक मंत्र्यांनी घेतला आहे. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, अरुण जेटली आणि सुषमा स्वराज यासारख्या भाजपाच्या अनेक दिग्गज नेत्यांनी विरोधी पक्षनेतेपद सांभाळले आहे. त्या पदाचा आब आणि प्रतिष्ठा जपली आहे. मात्र, लोकसभेत विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी बोलायला उभे राहतात, तेव्हा कोणीच गंभीर नसतो. सभागृहातील राहुल गांधींची वागणूक ही अनेक वेळा बालिशपणाची असते. आपल्या विदुषकी चाळ्याने ते सदस्यांचे मनोरंजन करतात, असे म्हटले तर ते चूक ठरू नये.

स्वातंत्र्य आंदोलनात लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी इंग्रजाविरुद्ध, 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का' असा जहाल अग्रलेख लिहिला होता. किमान असा प्रश्न विचारताना सरकारला डोके आहे, पण ते ठिकाणावर नाही, असे त्यांनी गृहीत धरले होते. पण राहुल गांधींच्या बाबतीत तर असा प्रश्नही विचारता येत नाही. कारण असा प्रश्न विचारण्यासाठीही आधी किमान डोके असावे लागते. डोके असेल तर ते ठिकाणावर आहे का, असा दुसरा प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे आपण राहुल गांधींच्या मागे फरफटत का जात आहोत, याचा विचार इंडिया आघाडीतील पक्षांनी करण्याची वेळ आली आहे.

मोदीद्वेषातून राहुल गांधी आंधळे झाले आहेत, असे नाईलाजाने म्हणावेसे वाटते. दुसऱ्याची रेघ छोटी करून आपण मोठे होऊ शकत नाही तर दुसऱ्याची रेघ छोटी करण्यापेक्षा आपली रेघ ही मोठी करायची असते.

निवडणूक आयोग चुकीचे वागत असेल तर आवाज उठवला पाहिजे, आयोगाच्या चुकीच्या वागणुकीबाबत काही ठोस पुरावे असतील तर 'हा सूर्य हा जयद्रथ' केला पाहिजे. पण निवडणूक आयोगासारख्या संवैधानिक संस्थेवर खोटे आणि दिशाभूल करणारे आरोप करत जनमानसात त्यांच्याबद्दल संशयाचे वातावरण निर्माण करणे राहुल गांधींना शोभत नाही. आयोगाची विश्वसनीयता संकटात आणण्याच्या प्रयत्नात राहुल गांधी जनमानसातील स्वत:चीच विश्वनीयता कमी करून घेत आहेत, असे म्हणावेसे वाटते. त्यामुळे राहुल गांधींना झालंय तरी काय, असा प्रश्न सगळ्यांनाच पडला आहे.

९८८१७१७८१७

## वेध

# प्लॅस्टिकचं राज्य; दंड फक्त गरिबांना

नंदकिशोर काथवटे

प्लॅस्टिकवर बंदी असल्याचे सरकार रोज सांगते, तशा बातम्या झळकतात, मोहिमा राबविल्या जातात. पण या सगळ्याचं टोक जातं कुठं? रस्त्यावर बसलेल्या पानटपरीवाल्याकडे, फळ विक्रेत्याकडे, भाजी विकणाऱ्या हातगाडीवाल्याकडे. त्याच्या दुकानात प्लॅस्टिकची पिशवी सापडली की अधिकारी जमतात, फोटो काढतात, पिशव्या जप्त होतात आणि दंड वसूल होतो. पण त्या पिशव्या त्याच्याकडे आल्या कुठून? त्या कुठे बनतात? याचा विचार कोणी करतं का? खऱ्या प्रश्नांना भिडण्याऐवजी बळी दिला जातो तो नेहमीच गरिबाचा. आजही शहरात शेकडो प्लॅस्टिक उत्पादक कारखाने बिनधास्त सुरू आहेत. सरकारकडून परवानग्या दिल्या जात आहेत, उत्पादनं वाढवली जात आहेत. पिशव्या, डबे, बाटल्या, पॅकिंग मटेरिअल सगळं प्लॅस्टिकचं; आणि हे सगळं शहरातल्या झोपडपट्टीत तयार होतं का? नाही. हे सगळं तयार होतं श्रीमंतांचे कारखाने, मोठे यंत्रसामग्रीचे सेटअप, मोठे ब्रँड्स जिथे ना कुठला दंड पोहोचतो, ना कोणी धाड टाकतो. दुकानात मॅगी, बिस्किटं, तेल, मसाले, साखर हे सगळं प्लॅस्टिकमध्येच मिळतं. चिप्सपासून ते बर्फाच्या गोळ्यांपर्यंत, सगळं आजही प्लॅस्टिकमध्येच विकलं जातं. तरीही प्रशासनाला फक्त भाजीवाल्याच्या पिशवीचं 'प्रदूषण' दिसतं. ही सरकारची दृष्टी आहे की सोयीस्कर अंधत्व? नियम बनवतात सर्वसामान्यांसाठी, पण सूट देतात ते मोठ्या उद्योगांना. कारण गरीब कारवाईला सामोरा जातो, पण श्रीमंत कायद्याच्या पायऱ्यांवर पाय ठेऊन वर चढतो. हेच चित्र पावसाळ्यात दिसतं. रस्ते पाण्यात बुडतात. नाले तुंबतात. प्रशासन म्हणतं- नाल्यात प्लॅस्टिक गेलंय. पण विचार करा, ते प्लॅस्टिक आलं कुठून? रस्त्यावर पडलेली पिशवी त्या गरिबाने बनवली होती का? ती फेकली गेली, कारण ग्राहकाने वापरली आणि कुठेही टाकून दिली. ना त्याने पिशवी आणली, ना जबाबदारी घेतली.

आज लाखो जनावरे रस्त्यावर प्लॅस्टिक खाऊन आजारी पडतात. शेतकऱ्यांच्या जनावरांचे पोट प्लॅस्टिकने भरलेलं असतं. पण त्यांचं दुःख कोणी समजून घेतं? एकीकडे स्वच्छ भारताचा नारा, दुसरीकडे पोटात प्लॅस्टिक भरलेल्या गायी हे चित्र नुसतं विरोधाभासी नाही, तर लाजिरवाणं आहे. शहरात चहा प्लॅस्टिकच्या ग्लासमध्ये मिळतो, दूध प्लॅस्टिकच्या पिशवीत, औषधं प्लॅस्टिकच्या बाटल्यांमध्ये. प्लॅस्टिकचा शिरकाव आपल्या रोजच्या आयुष्यात खोलवर झालेला आहे; तरीही सरकार फक्त गरिबाच्या टपरीवर जाऊन सांगतं प्लॅस्टिक वापरू नका. हे खूप सोपं आहे. कारण त्याच्याकडे पर्याय नाही, वकील नाहीत आणि पाठीवर कोणाचं बळही नाही. जर खरंच सरकारला पर्यावरणाचं भान असेल, तर त्यांनी प्लॅस्टिकचं मूळ बंद करावं. उत्पादन थांबवलं की वापर थांबेल. पण इथे उलटच चित्र आहे. उत्पादन सुरूच आणि विक्रीवर दंड. हे धोरण ढोंगच आहे. लोकांना दोषी ठरवून मूळ प्रश्नावरून लक्ष हटवण्याचा सोपा मार्ग. नागरिक म्हणून आपल्यालाही विचार करावा लागेल. प्रत्येक वेळेस आपण दुकानात गेल्यावर पिशवी द्या म्हणतो, स्वतःकडून काही आणत नाही आणि नंतर त्या पिशव्या कुठेही फेकतो. त्या नाल्यात जातात, प्राण्यांच्या पोटात जातात; शेवटी आपल्या शहराच्या, पर्यावरणाच्या मरणात हातभार लावतात. आपण पिशवी वापरणं थांबवलं, पर्याय स्वीकारले, तर विक्रेताही पिशवी देणं थांबवेल. पण आपण विक्रेत्याला दोष देतो, सरकार त्याच्यावर दंड टाकतं आणि प्लॅस्टिक बनवणाऱ्या कंपन्या लाखोंचा नफा मिळवत मोकळ्या होतात. हे थांबवायचं असेल, तर सरकारने गंभीरपणे पहिलं पाऊल उचलावं लागेल ते म्हणजे कारखान्यांवर बंदी, उत्पादन थांबवणं आणि गरीब विक्रेत्याला स्वस्त दरात, सहज उपलब्ध होणारे पर्याय उपलब्ध करून देणं. पर्यावरणाच्या नावाखाली दंड वसुलीचं राजकारण थांबवायला हवं. स्वच्छतेचा नारा तेव्हाच खरा ठरेल, जेव्हा न्याय सर्वांसाठी सारखाच असेल. आपण प्रत्येक वेळी सोयीचा विचार करतो, पर्यावरणाचा नाही. सरकारचे दुटप्पी धोरण अधिक त्रासदायक आहे. कारण ते नियम बनवतं, मोहिमा चालवतं; तरीही मूळ प्रश्नावर कारवाई करत नाही. आज एखाद्या गुटख्याच्या पुडीत तंबाखू कुठून येतो? कोण बनवतो तो सुगंधी पदार्थ? कधी त्यावर कारवाई होते? गुटखा विकणारा तर सापडतो, पण गुटखा बनवणारा मात्र अदृश्य असतो. हेच प्लॅस्टिकचं आहे. विकणारे सापडतात, बनवणारे नाहीत का? कारण ते श्रीमंत असतात आणि प्रशासन त्यांच्या उंबऱ्यावर जायला घाबरतं. फक्त गरिबावर नियम आणि श्रीमंताला सूट ही लोकशाही नाही, ही दिखाऊ व्यवस्था आहे. पर्यावरण सगळ्यांचं आहे, मग जबाबदारीही सगळ्यांचीच हवी.

९९२२९९९५८८

## अखंड मातृभूचे स्मरण

देशाच्या अखंडतेचे रक्षण करण्यासाठी त्याग आणि परिश्रम करण्याची स्फूर्ती देणारा अखंड मातृभूमीचा विचार आज कोठेही आढळत नाही. तडजोड करण्याची वृत्तीच सर्वत्र बळावली आहे. मातृभूमीवर आक्रमण करणाऱ्यांना तो भूभाग देऊन टाकून शांतता खरेदी करण्याच्या वृत्तीने लोकांना ग्रासून टाकले आहे. शत्रूच्या ताब्यात असलेल्या आपल्या भूप्रदेशाची आठवण हळूहळू बुजत चालली आहे. कैलास व मानसरोवर या आपल्या पवित्र तीर्थक्षेत्रात प्रवेश करण्यास आपल्याला प्रतिबंध आहे. जिच्यावरून आपल्याला हिंदू व हिंदुस्थान ही नावे प्राप्त झाली. त्या पवित्र सिंधू नदीत स्नान करण्याचे भाग्य आपल्याला आता राहिलेले नाही, याचे शल्य आपल्यापैकी किती जणांना आहे? एकेकाळी हिंदू तत्त्वज्ञानाच्या प्रसाराचे जागतिक केंद्र असलेले तक्षशिला आता आपल्या हाती नाही. हिरण्यकश्यपूपासून प्रल्हादाचे रक्षण करण्यासाठी झालेला भीषण नरसिंह अवतार ज्या मूलस्थानाने पाहिला तो मुलतान आज पुन्हा राक्षसी सतेच्या टाचेखाली गेला आहे. या सर्व आठवणी आपल्या अंत:करणात धगधगत आहे का? याबाबत आपण आपल्या स्वत:ला व उगवत्या पिढीला विशेष जपले पाहिजे, नाहीतर बाहेरील परिस्थितीच्या अत्याधिक दडपणामुळे भव्य कल्पनाचित्र हळूहळू पुसट होत जाईल आणि स्वाभिमानी वृत्ती नष्ट होईल. या देशाचा प्रत्येक कण त्याच्या रक्षणार्थ असंख्य वीरांनी व हुतात्म्यांनी सांडलेल्या रक्ताने पवित्र झालेला आहे. आज आपण असे म्हटले की, मुस्लिम किंवा चिनी आक्रमकांनी आपल्या मातृभूमीचा जो भूभाग हिरावून घेतला तो आमचा नव्हेच, त्यावर त्याचाच अधिकार आहे. तर त्याचा अर्थ एवढाच होईल की परिस्थितीशी टक्कर देण्याचे आपलं मनोधैर्य नष्ट झाले आहे, आणि आपल्या पराक्रमाची आपल्याला एवढी विस्मृती झाली आहे की, पराजयाला आणि मानहानीलाच आपण आपला गौरव समजू लागलो आहोत. मातृभूमीवरील उत्कट, सक्रिय, निरपवाद आणि ज्वलंत निष्ठा हा स्वतंत्र विकासोन्मुख व गौरवसंपन्न राष्ट्रजीवनाचा प्राण आहे.

'स्वार्थ साधना करण्याकरिता,
खंडित केली भारतमाता।
शल्य अमुच्या सलते हृदया,
अखंड करण्याचे, उद्याला सत्य म्हणायचे'

**रमेश धारकर**/९४२२१४०८६५

## वाचक पत्रे

### संस्कृती विसरू नका

९ ऑगस्ट २०२५ रोजीच्या 'तरुण भारत'मध्ये प्रसिद्ध झालेला गौरी सरनाईक यांचा 'ती आणि तिचा पदर' हा लेख वाचनात आला. पदराचं अतिशय सुंदर, लयबद्ध आणि मार्मिक विवेचन या लेखातून त्यांनी केलं आहे. त्याबद्दल गौरीताईंचे अभिनंदन. ताई, मला हा लेख वाचल्यानंतर, जे प्रकर्षानं जाणवलं, ते शब्दबद्ध केल्याविना राहवलं म्हणून हा खटाटोप. साडीचा पदर स्त्रीसाठी केवळ साडीचा भाग नाही तर भावनेचं, संस्कृतीचं आणि सौंदर्याचं प्रतीक आहे, पण दुर्दैवाने म्हणावंसं वाटतं की आजकालच्या या उन्मत्त मुलींना हे कसं पटवून देणार की, हा एक पदर नाही तर ती आमची संस्कृती आहे आणि त्यात मायेचा खजिनासुद्धा दडलेला आहे. आईचा पदर जर डोक्यावरून फिरला ना तर त्यासारखं सुख नाही, समाधान नाही. पदर हा नैतिक समर्थन देणारा विश्वासू आधार आहे. पदराची सावली कोणत्याही वाईट प्रवृत्तीपासून स्त्रीचे रक्षण करते. पदरामध्ये माया, प्रेम आणि आपुलकीचे बंध असतात, पण आज मात्र हे बंध तुटून वेगळे झाले आहेत. उत्तान आणि उन्मत्त परिधानामुळे पदराची नितांत सुंदर कल्पना लोप पावत चालली आहे. पाश्चिमात्य देशांमध्ये लोक तोकडे कपडे का वापरतात, याचा विचार कधी केला आहे का? भौगोलिक परिस्थितीनुसार शीतकटीबंधीय देशांमध्ये जवळपास हिवाळा आठ महिने असतो. उणे ५० डिग्रीपर्यंत तापमान बरेचदा जातं, सूर्यदर्शन होत नाही. परिणामी व्हिटॅमिन डीची कमतरता भासू लागते आणि म्हणूनच ज्यावेळी उन्हाळा असतो, त्यावेळी हेतुपुरस्सर तोकडे घातले जातात; जेणेकरून संपूर्ण शरीराचा संपर्क सूर्यप्रकाशासोबत यावा. त्यांच्या भौगोलिक परिस्थितीची ती गरज आहे. पण आमचं काय, अंधानुकरण करायचं, हा जणू वसाच घेतला आहे. एवढंच की काय, देवळातदेखील या वस्त्रांचं नकळत का होईना प्रदर्शन मांडलं जातं. त्यामुळे हल्ली बऱ्याचशा देवळांमध्ये पावित्र्य राखण्यासाठी म्हणून पारंपरिक वेशभूषेचा आग्रह धरला जात आहे. या मनोगताच्या माध्यमातून युवावर्गाला एवढंच आवाहन करू इच्छिते की, व्यक्तिस्वातंत्र्याच्या नादामध्ये संस्कृती विसरू नका. तोकडे कपडे उद्दामपणा दर्शवितात. संस्कृती टिकविणे आणि तिला वृद्धिंगत करण्यासाठी पदराची आज नितांत गरज आहे.

**कीर्ती गाडगे**/९९२११९९९२२

### भारतभूमी... पुण्यभूमी

आपला भारत महान आहे. जगात आपली भारतभूमी श्रेष्ठ आहे. भारतातच ऋषिमुनींनी जन्म घेऊन भारताला आध्यात्मिक ज्ञान दिले. आज भारताचे जगातील आध्यात्मिक रूप फार मोठे आहे. इथल्या संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी शेकडो परदेशी पाहुणे येत असतात. त्यांना एक कुतूहल आहे. भारतातच देवांनी मनुष्याचा जन्म घेऊन पापीजनांचा नायनाट केला. दृष्टांचा नाश केला. भारतीयांचे क्षत्रिय तेज पराक्रम महान आहे म्हणूनच शत्रू वाकड्या नजरेने बघण्याचे धाडस करू शकत नाही. भारतीय नागरिकांत माणुसकी आहे म्हणूनच जगातील सगळ्या धर्माचे लोकं इथे एका छताखाली नांदत आहे. म्हणूनच भारतभूमी ही पुण्यभूमी आहे.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

# पदभार न सोडणाऱ्या ग्रामसेवकांवर कारवाई : सीईओ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतीमध्ये पाच, दहा वर्षांपेक्षा जास्त कार्यकाळ झालेल्या ग्रामसेवकांच्या प्रशासकीय बदल्या केल्या होत्या. बदली प्रक्रिया पारदर्शक झाल्यानंतरही अनेक ग्रामसेवक बदल्याच्या ठिकाणी रुजू झाले नाहीत. एकाच गावात पाच वर्षांपेक्षा अधिक काळ नियमबाह्य ठाण मांडले आहेत, अशा ग्रामसेवकांची माहिती मागवली आहे.



त्यानंतर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचे संकेत सीईओ जंगम यांनी दिले.

ते म्हणाले, शासनाच्या आदेशानुसार आणि जिल्हा परिषदेच्या कामकाजाला गती येण्यासाठी ग्रामसेवकांसह इतर कर्मचाऱ्यांच्या विनंती बदल्या केल्या आहेत. त्यातील इतर विभागातील कर्मचारी हजर झाले. मात्र, बरेच ग्रामसेवक अद्यापही बदल्याच्या ठिकाणी रुजू झाले नाहीत, त्याविषयी तक्रारी आल्यानंतर त्या ग्रामसेवकांची माहीती मागवली आहे. त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

**विस्तार अधिकाऱ्यांवर कारवाई**

पारदर्शक बदली प्रक्रिया राबविल्यानंतर स्वग्राम व एकाच गावात नियमबाह्य ठाण मंडलेल्या ग्रामसेवकांवर कारवाई करण्यात येणार आहे. पदभार प्रक्रिया रखडल्याने ग्रामसेवकांना पाठबळ देणाऱ्या दक्षिणमधील विस्तार अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत.

**ग्रामसेवकांकडून परस्पर गाव निवड :** सीईओ जंगम यांनी समायोजनाद्वारे ग्रामसेवक बदली केल्यानंतरही मंद्रुपसह दक्षिणमधील अनेक ग्रामसेवकांनी पदभार सोडला नाही. शिवाय सीईओंचा आदेश डावलून परस्पर दुसऱ्या गावात कामकाज करीत असल्याने विस्तार अधिकाऱ्यांच्या कामकाजाबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.



# सोलापूर इलेक्ट्रॉनिक्स डिलर्स असोसिएशनची कर्मचाऱ्यांना शैक्षणिक व वैद्यकीय मदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

सोलापूर इलेक्ट्रोनिक्स डिलर्स असोसिएशन (सेडा) या संस्थेद्वारे कर्मचाऱ्यांसाठी प्रतिवर्षीप्रमाणे शैक्षणिक व वैद्यकीय मदत करण्यात आली. मदत समितीचे अध्यक्ष सतीश मालू, अध्यक्ष आनंद येमूल, सचिव भूषण भूतडा, खजिनदार सुयोग कालाणी, संचालक सर्वश्री चंद्रकांत शहापुरे, रवी पाचलग, बसवराज नवले आदींच्या उपस्थितीत ही मदत देण्यात आली.

## १३ सप्टेंबरपासून कुंथलगिरीत तरुणांसाठी आत्मचिंतन व ऊर्जा पुनर्भरणाचा प्रवास

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

जीवनाच्या धावपळीत स्वतःशी संवाद साधण्याची आणि आत्मशक्तीचे पुनर्भरण करण्याची संधी देणारा आगळावेगळा उपक्रम WOW 2.0 (वॉव २.०-निरोगीपणाचे मार्ग) सप्टेंबर महिन्यात कुंथलगिरी तीर्थाच्या निर्मळ व पवित्र वातावरणात आयोजित करण्यात आला आहे. प. पू. १०८ निर्यापक श्रमण वीरसागरजी महाराज श्री ससंघ यांच्या पावन सान्निध्यात हा कार्यक्रम दोन टप्प्यांत पार पडणार आहे १३ ते १४ सप्टेंबर मुलांसाठी आणि २० ते २१ सप्टेंबर मुलींसाठी हा कार्यक्रम आहे. १८ ते २५ वयोगटातील तरुणांसाठी विशेष आवाहन वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी यांनी केले आहे. नोंदणीसाठी https://forms.gle/NA5kTKSRceaqoDEj8 ही ऑनलाईन लिंक उपलब्ध आहे.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज नं. २३/२०२५

### अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

**श्री. बसवराज सूर्यकांत बानेगाव-पाटील - अर्जदार**
वय - ५२ वर्षे, धंदा - व्यापार
रा. मु.पो. चपळगांव, ता. अक्कलकोट,
जिल्हा सोलापूर
विरूध्द
**कोणी नाही - सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांचे वडील श्री. सुर्यकांत बसवणप्पा बानेगांव-पाटील हे दिनांक ०९/०५/२०१४ रोजी शहर सोलापुरातील अश्विनी हॉस्पिटल येथे तर जनक आई शालिनी या दिनांक २२/१२/२०२४ रोजी मु.पो. चपळगांव ता. अक्कलकोट जिल्हा सोलापूर येथे दोघेही मयत झालेले आहे.

यातील अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांना त्यांचे वडील श्री. सुर्यकांत बसवणप्पा बानेगांव-पाटील व आई शालिनी सुर्यकांत बानेगांव-पाटील यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्र हे कायदेशीर प्रयोजनाकरिता तसेच शासकीय, निमशासकीय, अशासकीय कार्यालयातील कामकाजाकरिता, अर्जदाराचे नावाचे नोंदीसाठी व इतर आवश्यक काम काजासाठी पूरावा म्हणून अर्जदार यांना सदर मयताचे वारस असल्याचे प्रमाणपत्राची मागणी वेगवेगळ्या कार्यालयाकडून होत आहे. त्यामुळे अर्जदार यांनी कायदेशीर वारस असल्याचे जाहीर होऊन, वारसा दाखला मिळणेकरिता सदरचा अर्ज हा दाखल केला आहे.

त्याअर्थी, जर कोणास वरील अर्जदार यांच्या नावाने वारसा दाखला देण्यासंबधी काही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत अथवा नेमलेली तारीख १५/०९/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहून लेखी म्हणणे मांडवे, सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास, कोणाची काही हरकत नाही असे समजून मे. कोर्ट पुढील योग्य ते आदेश करतील याची नोंद घ्यावी.

ही जाहीर प्रसिध्दीकरण माझ्या सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्यानिशी दिली असे. दिनांक १३/०८/२०२५

सही/-
लिपीक

कोर्टाचा शिक्का

सही/-
अधिक्षक दिवाणी
न्यायाधीश क. स्तर, अक्कलकोट

## जाहीर समन्स नोटीस

पुढील नेमली तारीख ०३/०९/२०२५
आरटीएस अपिल नं १२७/२०२३

### सोलापूर येथील मे. उपविभागीय अधिकारी क्र.१ यांचे न्यायालयात

**हनुमंत बलदु ताटे - अपेलंट**
विरुध्द
**राजेंद्र प्रल्हाद कुलकर्णी, वगैरे - रेस्पॉडंट**

प्रति,
**राजेंद्र प्रल्हाद कुलकर्णी**
रा. टेलिफोन एक्सजेंजजवळ, शिवाजी आखाडा,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
**अच्युत प्रल्हाद कुलकर्णी**
रा. टेलिफोन एक्सजेंजजवळ, शिवाजी आखाडा,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

ज्याअर्थी अपेलंटने तुमचे विरुध्द या मे. कोर्टात मंडल अधिकारी बार्शी यांचेकडील कासारवाडी १७६६/२३ तकार/एसआर/०१/२३ ता. ३१/०५/२०२३ रोजीचे आदेशावर अपिल आणलेले आहे. सदर अपिलात तुम्ही रेस्पॉडंट/प्रतिवादी नं. १ व ४ म्हणून सामील आहात. तुम्हास अपिलात नमूद पत्यावर समन्स / नोटीस काढली. परंतु तुम्ही सदर ठिकाणी राहत नसलेचा रिपोर्ट / पोस्ट पाकीट परत आलेले आहे. तसेच तुम्ही कोठे गेला आहेत हे माहिती नाही, कोणी माहिती सांगत नाहीत तुमचा निश्चित असा ठावठिकाणा आढळून येत नाही, सदर अपिलाक़ामी तुम्ही प्रतिवादी / रिस्पॉडंट म्हणून सामील आहात.

त्याअर्थी तुम्हास सदर जाहीर सगन्सद्वारे कळविण्यात येते की, आपण सदर अपिलाकामी जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेगली तारीख ०३/०९/२०२५ रोजी स्वतः अगर माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होऊन आपले म्हणणे, कैफियत लेखी स्वरुपात मा. न्यायालयात द्यावी. मुदतीत आपण हजर होऊन आपली कैफियत / म्हणणे दिले नाही तर आपणास सदर नोटीसची बजावणी होऊनही आपणास काहीही सांगावयाचे नाही असे समजून मा. न्यायालयाचे सदरकामी यथायोग्य हुकूम होतील याची नोंद घ्यावी.

सदरचे जाहीर समन्स आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे ता. ०६/०८/२०२५

शिक्का

सही/-
उपविभागीय अधिकारी
सोलापूर क्र. १, सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि. कि. अर्ज नं. ९१/२०२५
पुढील न. ता. १०/०९/२०२५ नि. ६

### बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डि. सो. यांचे कार्टात मे. एच.यु.यु. पाटील कोर्ट

१) **श्रीमती मंदाकिनी चंद्रकांत मोरे,**
वय ५३ वर्ष, धंदा - घरकाम,
रा. आगळगांव रोड, वाणी प्लॉट बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **श्री. सुदर्शन चंद्रकांत मोरे,**
वय - ३१ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सदर
३) **सौ. ज्ञानेश्वरी रोहन दाभाडे,**
वय - ३३ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. विमल बंगला, आगरकर मळा,
रेल्वे स्टेशनजवळ, अहमदनगर,
४) **श्रीमती भामाबाई वसंत उर्फ वसंतराव मोरे,**
वय - ८२ वर्षे, धंदा - काही नाही,
रा. खंडोबा वेस, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर
— **अर्जदार**
विरुध्द
**कोणोही नाही - सा.वाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं १ चे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल तसेच अर्जदार नं. ४ यांचा मुलगा चंद्रकांत वसंतराव मोरे हे वाणी प्लॉट, आगळगांव रोड, बार्शी ता. बार्शी, जि. सोलापूर येथे राहत्या घरी आजारपणामुळे दि. ०२/०४/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. त्यामुळे यातील अर्जदार नं १ ते ४ हेच मयत चंद्रकांत वसंतराव मोरे यांचे कायदेशीर एकमेव व जवळचे वारस आहेत. म्हणून अर्जदार यांना वारस (हेअरशीप) प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दी करणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदाराचे अर्जातील मागणी व विधाना संबंधाने जर कोणाचेही आक्षेप असल्यास सबंधीतांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमलेल्या ता. १०/०९/२०२५ रोजी पर्यंत मे. कार्टात स्वतः अगर आपल्या विद्योज्ञामार्फत हजर होऊन आपले तक्रारी, हरकती लेखी स्वरुपात सादर कराव्यात अन्यथा मुदती नंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण केले असे ता. १३/०८/२०२५

सही/-
कनिष्ठ लिपीक

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक,
मे. सि.ज.ज्यु.डि. सो, बार्शी

## चुकीची दुरुस्ती

दैनिक तरुण भारतमध्ये दि. १२/०८/२०२५ रोजी **सद्गुरू ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., मोहोळ** यांचे जाहीर लिलाव प्रसिध्द करण्यात आलेल्यामध्ये **स्थावर मालमत्तेचा तिसरा फेर जाहीर लिलाव** असे प्रसिध्द करण्यात आला आहे. त्याऐवजी **स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव** असे वाचण्यात यावे.

आपला
व्यवस्थापक

## IDFC FIRST Bank Limited

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### आर्थिक मालमत्तेचे सुरक्षाकरण आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा हितसंबंध कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (**पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 112490537 | मालमत्तेवर कर्ज | 1. आनंद म्हंता<br>2. स्वाती आनंद म्हंता | 26/07/2025 | INR 5,37,646.24/- |

**मालमत्तेचा पत्ता :** सोलापूर, उपविभाग : उत्तर सोलापूर येथील मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल, महानगरपालिकेच्या हद्दीत, कसबे सोलापूर, सर्वे क्रमांक ११९/१/ए/१/१ पैकी प्लॉट क्रमांक ४५, त्याचा जुना सर्वे क्रमांक १२१/१ एकूण पसरलेला क्षेत्र पूर्व-उत्तर कोपरा ५५० चौरस फूट, आणि पूर्वेकडील सीमा : प्लॉट क्रमांक ४६ पश्चिमेकडील रस्ता : उत्तर रस्ता : दक्षिणेकडील रस्ता: प्लॉट क्रमांक ४७

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 107431159 | मालमत्तेवर कर्ज | 1. जब्बार दादासो मुलाणी<br>2. जैराबी दादासो मुलाणी | 26/07/2025 | INR 7,20,052.68/- |

**मालमत्तेचा पत्ता :** दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेल्या निवासी घराचा तो सर्व तुकडा आणि पार्सल घराचा तळमजला = १८००.०० चौ.फूट एकूण, बांधलेले क्षेत्रफळ = १८००.०० चौ.फूट, गाव पुलुज ता. पंढरपूर, जिल्हा सोलापूर येथे स्थित आणि मालमत्ता क्रमांक ५ येथे नोंदणीकृत, पोस्ट पुलुज येथे, ता. पंढरपूर, जिल्हा सोलापूर ४१३३०४, एकूण जमीन - २६०० चौ.फूट, आणि सदर मालमत्तेची सीमा खालीलप्रमाणे आहे: पूर्वेकडे किंवा दिशेने - सिद्धेश्वर प्रल्हाद म्हमाणे पश्चिमेकडे किंवा दिशेने - बोलवे उत्तरेकडे किंवा दिशेने - आयुब महिबूब अतार दक्षिणेकडे - मज्जीद. त्यांच्याशी संलग्न अधिकार, स्वातंत्र्य आणि मान्यतांसह, वर्तमान आणि भविष्य, इमारती, संरचना, उभारणी आणि/किंवा त्यावरील बांधकामे आणि त्यानंतरचे विकास आणि पृथ्वीशी जोडलेले किंवा पृथ्वीशी जोडलेल्या कोणत्याही गोष्टीशी कायमचे जोडलेले सर्व वनस्पती आणि यंत्रसामग्री, वर्तमान आणि भविष्य दोन्ही.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 143407549 | मालमत्तेवर कर्ज | 1. सिद्राम गेना फाटे<br>2. शामल सिद्राम फाटे | 05/07/2025 | INR 8,88,101.01/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायतीचा सर्व तुकडा आणि पार्सल मिळकत क्रमांक ५४५, एकूण परिसर १६०० चौरस फूट, मौजे येथे स्थित: अधेगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीत, उपविभाग: मोहोळ, विभाग: सोलापूर, महाराष्ट्र-४१३२४८ पूर्व: रस्ता पश्चिम: रस्ता उत्तर: स्वतःची जमीन दक्षिण: रतन डोंगरे

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेड म्हणून ओळखले जाते)

दिनांक : 14/08/2025
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र

## IDFC FIRST Bank Limited

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### आर्थिक मालमत्तेचे सुरक्षाकरण आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा हितसंबंध कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (**पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 130866567 | मालमत्तेवर कर्ज | 1. अभिजित पंडीत कराळे<br>2. सुजाता पंडीत कराळे | 31/07/2025 | INR 7,78,888.68/- |

**मालमत्तेचा पत्ता:** निवासी घराचा तो संपूर्ण तुकडा आणि पार्सल, एकूण बांधलेले क्षेत्रफळ असलेला तळमजला: ८५०.०० चौ. फूट, एकूण जमीन क्षेत्रफळ - १९९४ चौ. फूट, मिळकत क्रमांक ३८१ सरकोली, सरकोली, पंढरपूर, सोलापूर, महाराष्ट्र -४१३३०४ येथे स्थित आहे, आणि सदर मालमत्तेची सीमा अशी आहे: पूर्व: संजय भालके पश्चिम : बाबुराव कराळे उत्तर : रस्ता दक्षिण: दत्तात्रय भालके

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 117598301 | मालमत्तेवर कर्ज | 1. मारुती कुंडलिक पवार<br>2. कुंडलिक बाळू पवार | 26/07/2025 | INR 4,98,869.63/- |

**मालमत्तेचा पत्ता:** सोलापूर उपविभाग उत्तर सोलापूर येथे स्थित असलेल्या मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल, ग्रामपंचायत रणमसाळेच्या हद्दीत, ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ५४८/२, एकूण जाहिरात-मापन क्षेत्र ५५२ चौरस फूट. मालमत्तेची सीमा: पूर्व:- पश्चिमेकडील एक गल्ली:- सिंधू जाधव दक्षिण:- गंगूबाई पवार उत्तर:- रस्ता. त्यासोबत जोडलेले हक्क, स्वातंत्र्य आणि मान्यता, वर्तमान आणि भविष्य, इमारती, संरचना, उभारणी आणि/किंवा त्यावरील बांधकामे आणि त्यानंतरचे विकास आणि पृथ्वीशी जोडलेले किंवा कायमचे पृथ्वीशी जोडलेले सर्व वनस्पती आणि यंत्रसामग्री, वर्तमान आणि भविष्य दोन्ही.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 103649251 | मालमत्तेवर कर्ज | 1. नाना विठ्ठल जाधव<br>2. विठ्ठल राजाराम जाधव | 31/07/2025 | INR 7,59,897.01/- |

**मालमत्तेचा पत्ता :** मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल, मालमत्तेचा क्रमांक ४३/अ, एकूण बांधलेले क्षेत्रफळ ८७४.०० चौ.फूट, बामणी, तालुका-सांगोला, जिल्हा-सोलापूर, महाराष्ट्र-४१३३१७ येथे स्थित मालमत्ता, आणि सदर मालमत्तेची सीमा अशी आहे: उत्तर: सदाशिव रामचंद्र साळुंखे दक्षिण: प्राथमिक आरोग्य केंद्र पूर्व

सतीश रामचंद्र कुलकर्णी पश्चिम: रस्ता त्याशी संलग्न हक्क, स्वातंत्र्य आणि मान्यता, वर्तमान आणि भविष्य, इमारती, संरचना, उभारणी आणि/किंवा त्यावरील बांधकामे आणि त्यानंतरचे विकास आणि पृथ्वीशी संलग्न किंवा कायमचे पृथ्वीशी संलग्न असलेल्या कोणत्याही गोष्टीशी, वर्तमान आणि भविष्य दोन्हीसह. गरे

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 139989105 | मालमत्तेवर कर्ज | 1. सोमनाथ अप्पाराव दांडगे<br>2. कांचन सोमनाथ दांडगे | 31/07/2025 | INR 7,42,339.66/- |

**मालमत्तेचा पत्ता :** बेरंग ग्रामपंचायत मिळकत क्रमांक २९५ येथील निवासी घराचा तो संपूर्ण तुकडा आणि पार्सल, दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेला, ज्याचे क्षेत्रफळ तळमजला १०००.०० चौ. फूट आहे. एकूण बांधलेले क्षेत्रफळ = १०००.०० चौ. फूट आणि एकूण जमीन क्षेत्रफळ १२०० चौ. फूट आहे. गाव: कोंढारकी, तालुका: पंढरपूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४ येथे स्थित आहे, आणि पूर्व: रघुनाथ दांडगे पश्चिम: सीताराम नागणे उत्तर: पांडुरंग दांडगे दक्षिण: रस्ता

या प्रसिध्दीकरणाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेड म्हणून ओळखले जाते)

दिनांक : 14/08/2025
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र

## जाहीर समन्स

**उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर**
सिटी सर्व्हे नं. ८४१३, दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापूर - ४१३००३

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ व त्याखालील नियम १९६१ चे नियम ८६ (ब) अन्वये

### जाहीर नोटीस

**आदर्श जनसेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर - वादी**
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले पतसंस्थेचे थकबाकीदार सभासद) **- प्रतिवादी**

| अ. क्र. | दावा क्र. | दावा रक्कम | प्रतिवादी | प्रतिवादीचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ५४९/२०२५ | रु. १३,०३,८१९/- | कर्जदार | **श्री. पंकज विजयसिंह करपे**<br>सी-१९, स्मृती विहार, आरटीओ ऑफिसजवळ, सोलापूर ४१३००४ |
| २ | ५४९/२०२५ | रु. १३,०३,८१९/- | जामिनदार | **श्री. रविंद्र राजशेखर कल्याणशेट्टी**<br>गणेश हौसिंग सोसायटी, आसरा सोलापूर ४१३००३ |

यात वादी पतसंस्था यांनी कलम १०१ अन्वये दाखल केलेल्या दाव्यातील वर नमुद केलेल्या प्रतिवादी यांचे कडून राहते पत्त्यावर सुनावणी नोटीस पाठवली असता ती व्यक्ती सदर पत्यावर राहत नसल्याने / पत्ता चुकीचा /घर बंद असल्याचे नमुद कर नोटीस परत आली आहे. तरी सदर जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की,

उपनिर्दिष्ट अर्जासंबधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वतः अथवा वकिलामार्फत मंगळवार दि. २६/०८/२०२५ दुपारी ठीक १२:३० वाजता कागदपत्रांसह उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर शहर, सिटी सर्वे नं. ८४१३, दुसरा मजला, जिल्हाधिकरी आवार, सोलापूर ४१३००३ येथे हजर रहावे. या नोटीशीद्वारे असेही कळविण्यात येते की वरील तारखेस हजर न राहिल्यास आपल्या गैरहजरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व गुणवत्तेवर निर्णय देण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०८/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्देसह हे जाहीर नोटीस दिली असे.

शिक्का

सही/-
उपनिबंधक
सहकारी संस्था सोलापूर, शहर सोलापूर.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः तडवळे, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे तडवळे हद्दीतील शेतजमीन याचा गट जमीन गट नं. १५७ क्षेत्र ०हे. ७७ आर, आकार २ रु. ३७ पैसे व गट नं. ४४ क्षेत्र ० हे. १० आर, आकार ० रु. ३० पैसे ही जमीन आमचे अशिल दिपक दत्तात्रय वाघ यांची अविवाहित मयत बहिण छाया दत्तात्रय वाघ हिच्या नावे आहे. गट नं. ४४ पैकी ० हे.१० आर ही जमीन आमच्या अशिलाच्या कुटूंबाची असून आमचे अशिल व त्यांचा मयत पुतण्या आकाश आण्णासाहेब वाघ यांनी दिनांक ०१/११/२०२३ रोजी सदरची जमीन छाया दत्तात्रय वाघ यांना खरेदी दिलेली होती. पुढे आमचे अशिलाची बहिण दि. १४/०१/२०२५ रोजी राहत्या घरी वैराग या ठिकाणी मयत झाली. आमचे अशिलाचे वडील दत्तात्रय गेनबा वाघ हे ११/०४/१९९४ रोजी मयत आहेत. आई इंदूबाई उर्फ इंदूमती दत्तात्रय वाघ ही दि. २६/०८/१९९३ रोजी मयत आहे. भाऊ आण्णासाहेब दत्तात्रय वाघ दि. ०५/०५/२०११ रोजी मयत आहे. भावजय सुनंदा आण्णासाहेब वाघ या दि. १३/०९/१९९७ रोजी मयत आहेत व पुतण्या आकाश आण्णासाहेब वाघ हा दि. २२/११/२०२४ रोजी वैराग येथे मयत झाला. व अविवाहित मयत भाऊ रावसाहेब दत्तात्रय वाघ हे दि. २५/०३/१९७७ रोजी मयत आहेत. अशा प्रकारे आमच्या अशिलाच्या कुटूंबातील वरील सर्व व्यक्ती मयत असून दत्तात्रय गेनबा वाघ यांना आमचे अशिल एकमेव कायदेशीर वारस आहेत. आमचे अशिलांनी वरील दोन्ही शेतजमीनीवर त्यांच्या नावाची नोंद वारस म्हणून होणेकरीता मे. ग्राम महसूल अधिकारी तडवळे यांच्याकडे रितसर कार्यवाही चालू आहे.

तरी आमचे अशिल दिपक दत्तात्रय वाघ यांची वरील दोन्ही गटावर वारस नोंद करणेकामी आमचे अशिल हे ग्राममहसूल अधिकारी यांच्याकडे रितसर कार्यवाही करीत आहेत. तरी सदर नोंदीस कोणाची हरकत असल्यास त्यांनी मे. तलाठी तडवळे यांच्याकडे संपर्क साधून ८ दिवसात लेखी हरकत नोंदवावी. ही जाहीर नोटीस दिली असे. ता.१३/०८/२०२५

सही/-
**ॲड. लक्ष्मीकांत सिध्देश्वर झाडे**
**२२०९/३८, सिध्देश्वर निवास, गणेश नगर,**
**माढा रोड, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## मध्य रेल्वे

**निर्देशांक क्रमांक १**

निविदा क्रमांक **CR-BB-SNT-P-TELE-2025-39** निविदा क्रमांक CR-BB-SNT-P-TELE-2025-39 साठी निविदा क्रमांक CR-BB-SNT-P-TELE-2025-39 साठी शुद्धीपत्र क्रमांक 1 जारी करण्यात आला आहे. निविदा अंतिम तारीख 12/09/2025, 15:00 अशी सुधारित करण्यात आली आहे. तपशील www.ireps.gov.in या वेबसाइटवर पाहता येतील. उर्वरित इतर सर्व अटी आणि शर्ती तशाच राहतील. ही निविदा सार्वजनिक खरेदी धोरण आदेश 2017 दिनांक 15/06/2017 चे पालन करते.

366 **DRM (S&T) CSMT**

अनाधिकृत रूप से रेल लाईन को पार करना दंडनीय अपराध है।

## CHANGE IN NAME

I, GIRI MACHCHHINDRANATH HANMANT ARMY HAWALDAR R/O A/P TADAWALE, S. KOREGAON, DIST. SATARA - 415010, TEMPORARY RESIDENT OF GURUNANAK CHOWK, ARMY CSD CANTEEN, SOLAPUR-413001 HEREBY DECLARE THAT MY WIFE'S NAME HAS BEEN RECORDED AS VARSHA IN MY SERVICE BOOK (958), BUT MY WIFE'S FULL NAME IS **VARSHA MACHCHHINDRANATH GIRI** BOTH NAMES PERSON IS ONE AND SAME PERSON, IE. MY WIFE (AFFIDAVIT SR NO. 35244 DATED 12-08-2025) KINDLY NOTE THE SAME.

## CHANGE IN NAME

I, AJIT KASHINATH JADHAV ARMY HAWALDAR R/O A/P SANGAMNER, TAL. BARSHI, DIST. SOLAPUR - 413 406 TEMPORARY RESIDENT OF GURUNANAK CHOWK,ARMY CSD CANTEEN, SOLAPUR- 413001 HEREBY DECLARE THAT MY WIFE'S NAME HAS BEEN RECORDED AS POOJA IN MY SERVICE BOOK (958), BUT MY WIFE'S FULL NAME IS **POOJA AJIT JADHAV** BOTH NAMES PERSON IS ONE AND SAME PERSON, IE. MY WIFE (AFFIDAVIT SR NO. **6150** DATED 13-08-2025) KINDLY NOTE THE SAME.

## CHANGE IN NAME

I, PATHADE BALASAHEB LAXMAN ARMY HAWALDAR R/O A/P TAKALIMIYA, TAL. RAHURI, DIST. AHMEDNAGAR - 413716 TEMPORARY R/O GURUNANAK CHOWK, ARMY CSD CANTEEN, SOLAPUR HEREBY DECLARE THAT MY WIFE'S NAME HAS BEEN RECORDED AS TEJASHREE IN MY SERVICE BOOK (958), BUT MY WIFE'S FULL NAME IS **PATHADE TEJASHREE BALASAHEB**. BOTH NAMES PERSON IS ONE AND SAME PERSON, IE. MY WIFE. (AFFIDAVIT NO.35242 DATED 12-08-2025.) KINDLY NOTE THE SAME

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२

### जाहिर प्रसिध्दीकरण

नमुना झेड
नमुना झेड (नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) पहा)

### स्थावर मालमत्ता ताब्यात घेण्याबाबतची नोटीस

ज्याअर्थी खाली सही करणार विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री कृष्णाहरी यल्लप्पा मैसूर c/o श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर हि संस्था महाराष्ट्र सहकारी कायदा १९६१ अन्वये यादीतील ऋणको (थकबाकीदार) याने रक्कम जमा करण्यास कसूर केले आहे. त्याअर्थी खाली सही करणाऱ्याने खालील नमूद यादीतील ऋणको यांची स्थावर मिळकतबाबत जप्तीची नोटीस देऊन व रजी. गहाणखत अन्वये गहाण ठेवलेली यापुढे निर्दिष्ट केलेली स्थावर मालमत्ता जप्त केलेली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला आणि सर्व नागरिकांना जाहीर नोटीस देण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करण्याऱ्याने त्यांना महाराष्ट सहकारी संस्था नियम १०७ पोटनियम ११(डी-१) अन्वये दिलेल्या अधिकारा नुसार प्रतीकात्मक (सिम्बोलिक) ताबा घेतलेला आहे.

विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात हेत आहे की, खाली नमूद केलेल्या यादीतील मालमत्ते संबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर या संस्थेच्या खाली नमूद केलेल्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज, कायदेशीर शुल्क व भविष्यात होणारे इतर खर्चाचा बोजा सदर मिळकतीवर राहील, याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | कर्जदार / जामिनदाराचे / मिळकतदाराचे नाव | मिळकतीचे वर्णन | सिस नं. / गट नं./ क्षेत्र | दिनांक मागणी नोटीस व प्रतिकात्मक ताबा ३०/०६/२०२५ अखेर येणेबाकी |
|---|---|---|---|---|
| १ | **पुष्पा अनंतराव पिंगळे** (महादेव मेडिकल्स प्रोप्रा. स्वाती उतरेश्वर पिंगळे) यांचे जामीनदार | डी. सोलापूर व सब डी ता. बार्शी, पैकी मौजे श्रीपत पिंपरी हद्दीतील मिळकत | गट नं. ५८९/२, पैकी पुष्पा अनंतराव पिंगळे यांचे मालकीची पूर्व बाजूची तिचे क्षेत्र १.१०.०० हे.आर. चौ.मी. आकार ४.२० | १०/०३/२०२५<br>०६/०८/२०२५<br>रु.४७,३३,९४८/- |
| | **उत्तरेश्वर अनंतराव पिंगळे** (महादेव मेडिकल्स प्रोप्रा. स्वाती उतरेश्वर पिंगळे) यांचे जामीनदार | डी. सोलापूर व सब डी ता. बार्शी, पैकी मौजे श्रीपत पिंपरी हद्दीतील मिळकत | गट नं. ५८९/२, पैकी उत्तरेश्वर अनंतराव पिंगळे यांचे मालकीची पश्चिम बाजूची तिचे क्षेत्र १.१०.०० हे. आर.चौ.मी. आकार ४.१६ | |
| | **पोपट महादेव भांडवलकर** (महादेव मेडिकल्स प्रोप्रा. स्वाती उतरेश्वर पिंगळे) यांचे जामीनदार | डी. सोलापूर व सब डी ता. बार्शी शहर हद्दीतील मिळकत | गट नं. ८६८/क, पैकी दक्षिण बाजूचा प्लॉट याचे क्षेत्र १५९.५७ चौ.मी. | |
| | **मंजुषा सुरजितसिंह कोकाटे** (महादेव मेडिकल्स प्रोप्रा. स्वाती उतरेश्वर पिंगळे) यांचे जामीनदार | डी. सोलापूर व सब डी ता. बार्शी शहर हद्दीतील मिळकत | गट नं. १००४/२, क्षेत्र १.०७.९२ हे.चौ.मी. आकार ०.३६ पो.ख. ०.२०.०० मंजुषा सुरजितसिंह कोकाटे यांचे हिस्सेपूरते | |
| २ | **देवई धनाजी चौधरी** (चौधरी ट्रेडिंग कंपनी प्रोप्रा. बळवंत धनाजी चौधरी) यांचे जामीनदार | डी. सोलापूर व सब डी ता. बार्शी, पैकी मौजे येळम्ब हद्दीतील मिळकत | गट नं. १७३ क्षेत्र ०.६६.०० हे. आर. चौ.मी. आकार ०.८१ | १०/०३/२०२५<br>०४/०८/२०२५<br>रु.२१,४८,४९८/- |
| ३ | **सुरज बापू कारकर** (कृष्णा इलेक्ट्रो प्लेटर्स प्रोप्रा. जय बापू कारकर) यांचे जामीनदार | डी. सोलापूर व सब डी ता. बार्शी, पैकी मौजे जामगांव (अ) हद्दीतील मिळकत | गट नं. ४४/१/अ प्लॉट नं. १० क्षेत्रफळ ३०७.५६ चौ.मी. | १०/०३/२०२५<br>०८/०८/२०२५<br>रु.३३,५५,०६९/- |
| ४ | संतोष वसंत झोंबाडे (पूनम प्लाय प्रोप्रा. संतोष वसंत झोंबाडे कर्जदार) | डी. सोलापूर व सब डी ता. बार्शी, पैकी मौजे जाम गांव हद्दीतील मिळकत | गट नं. ४४/१/अ प्लॉट नं. २१ क्षेत्र ३०२.९४ चौ.मी. (ऑनलाईन उतारे प्रमाणे याचे क्षेत्र ३००.०० चौ.मी. | २३/०८/२०२४<br>०७/०८/२०२५<br>रु.१०,०७,८५२/- |

वरील सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या स्थावर मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा, ताबा पत्रावर सही करून, खाली नमूद वसुली अधिकारी यांच्याकडे या जाहीर प्रसिद्धीकरण दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत घ्यावा. अन्यथा, तसे न केल्यास मुदतीनंतर सदर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेण्याची कायदेशीर प्रक्रिया मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडे अर्ज करून पार पडले जाईल व तसेच उपरोक्त स्थावर मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल, तरी त्यापुढील होणाऱ्या सर्व परिणामास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : १२/०८/२०२५**

सही/-
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

## ▶▶ महत्वाचे...

### कांताबाई प्रभाकर बटगेरी स्मृती चषक बुद्धिबळ स्पर्धा रविवारी

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**



कांताबाई प्रभाकर बटगेरी स्मृती चषक बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन विजापूर रोडवरील सुंदर मल्टीपर्पज हॉल येथे १७ ऑगस्ट रोजी केले आहे. ही स्पर्धा रविवारी सकाळी दहा वाजता सुरू होणार आहे. वैभव प्रभाकर बटगेरी हे याचे प्रायोजक आहेत. या स्पर्धेसाठी रोख रक्कम व १०० चषक व मेडल्स मिळून ८,९,१०,११,१२,१३,१४,१७,१९ व खुल्या वयोगटातील खेळाडूंना एकूण ३२ हजार रुपयांची बक्षीसे देण्यात येणार आहेत. तसेच जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक स्पर्धा मालिकेत भाग घेऊन जास्तीत जास्त गुण मिळवून विजयी होणाऱ्या नऊ खेळाडूंना नऊ बुद्धिबळाचे घड्याळ बक्षीस देण्यात येणार आहे. इच्छुकांनी सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे सचिव शरद नाईक ( मो. ९४२३३३७३४६) यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन श्री रमा जगदीश बहुउद्देशीय महिला उत्कर्ष संस्थेचे अध्यक्ष मधुकर नाईक यांनी केले आहे.

### महिलांसाठी रविवारी जिल्हा योगासन व सूर्यनमस्कार स्पर्धा

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

महिला पतंजली योग समितीच्या वतीने रविवार १७ ऑगस्ट रोजी दुपारी १ ते ५ वाजेपर्यंत येथील इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय, जुना एम्प्लॉयमेंट चौक येथे महिलांसाठी जिल्हा योगासन व सूर्यनमस्कार स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती संगीता जाधव व सुजाता शास्त्री यांनी पत्रकार परिषदेत दिली. विविध तीन गटांमध्ये ही स्पर्धा घेण्यात येणार आहे. प्रत्येक गटातून योगासन व सूर्यनमस्कार स्पर्धांसाठी गोल्ड, सिल्वर, ब्रांझ मेडल व उत्तेजनार्थ दोन अशी पाच बक्षिसे आणि प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत. इच्छुकांनी १६ ऑगस्ट सायंकाळी ५ वाजेपर्यंत ९४२१९०६९९४ या मोबाईलवर नाव नोंदणी करावी. या स्पर्धेनंतर त्याच ठिकाणी सायंकाळी ६ वाजता पतंजली योग समितीच्या महिला राज्य प्रभारी सुधा अळळीमोरे यांच्या हस्ते बक्षीस वितरण होईल. या पत्रकार परिषदेस संतोष दुधाळ, स्वाती राऊत, शोभा तोरणगी, अलगा गवळी, ज्योती दुलंगे आदी उपस्थित होते.

### तलवारबाजी जिल्हा निवड चाचणी स्पर्धा शनिवारी

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

सोलापूर शहर व जिल्हा तलवारबाजी असोसिएशनच्या वतीने २०वी कॅडेट जिल्हा तलवारबाजी निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन शनिवार १६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाच्या मैदानावर केले आहे. १ जानेवारी २००९ नंतर व १५ ऑगस्ट २०१२ पूर्वी जन्मलेले खेळाडू यासाठी पात्र आहेत. या स्पर्धेतून निवडलेला संघ २२ ते २४ ऑगस्ट दरम्यान छ. संभाजीनार येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेमध्ये सहभागी होईल. इच्छुक खेळाडूंनी पवन भोसले (९६३७९६३७७७) अथवा अक्षय माने (८३२९०७०७६४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संघटनेचे जिल्हा सचिव दीपक शिंदे यांनी केले आहे.

### शालेय स्पर्धेत समावेशासाठी आजपासून बेमुदत दांडपट्टा चालविणार

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

शालेय क्रीडा प्रकारामध्ये राज्यशास्त्र म्हणून मान्यता दिलेल्या दांडपट्टा या खेळाचा समावेश करावा या मागणीसाठी गुरुवार १४ ऑगस्टपासून जिल्हा परिषद पूनम गेट समोर दिवस रात्र चालवून शासनाचे लक्ष वेधण्यात येणार आहे, अशी माहिती ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्टस असोसिएशनचे राज्य सचिव अश्विन कडलासकर यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. महाराष्ट्र शासनाने राज्यशास्त्र म्हणून दांडपट्टा यास अधिकृत मान्यता दिलेली आहे. मात्र या क्रीडा प्रकाराचा शालेय क्रीडा मध्ये अद्याप समावेश करण्यात आला नाही. या खेळाचा अभ्यास अनेक विद्यार्थी खेळाडू आणि तरुण पिढी करत आहे. या पत्रकार परिषदेस शिवराम भोसले, अ‍ॅड. अविनाश कडलासकर, संजय साळुंखे आदी उपस्थित होते.

# क्रीडा विधेयकाची ६ महिन्यांत अंमलबजावणी : मांडवीय

### सहभाग मानक सुरक्षेचे नियमन

◆ **नवी दिल्ली, १३ ऑगस्ट**

संसदेत क्रीडा विधेयक सुरळीतपणे मंजूर झाले, ऐतिहासिक राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक पुढील सहा महिन्यांत अंमलात आणले जाईल आणि नियमांचा मसुदा व पायाभूत सुविधांची ओळख यासारखे तयारीचे काम आधीच सुरू झाले आहे, असे क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी बुधवारी वृत्तसंस्थेला सांगितले.

दोन्ही सभागृहात विधेयक मंजूर झाल्यानंतरच्या पहिल्या मुलाखतीत, मांडवीय यांनी विधेयकातील तरतुदीचे 'मानक सुरक्षेचे' समर्थन केले, जे सरकारला 'असाधारण परिस्थितीत' भारतीय संघ व वैयक्तिक खेळाडूंच्या आंतरराष्ट्रीय सहभागावर 'वाजवी निर्बंध लादण्याचा' विवेकाधीन अधिकार देते.

हे विधेयक शक्य तितक्या लवकर अंमलात आणले जाईल. पुढील सहा महिन्यांत १०० टक्के अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी सर्व प्रक्रिया पूर्ण केल्या जातील, असे मांडवीय यांनी त्यांच्या निवासस्थानी झालेल्या विशेष संवादात सांगितले.



क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय

विधेयक मंजूर झाल्यामुळे भारत क्रीडा कायदा असलेला २१ वा देश झाला आहे. त्याच्या सर्वात महत्त्वाच्या तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय क्रीडा मंडळ (एनएसबी) स्थापन करणे आवश्यक आहे, जे राष्ट्रीय क्रीडा महासंघांना (एनएसएफएस), वाद निराकरणासाठी राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरण (एनएसटी) आणि निवडणुकांवर देखरेख करण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा निवडणूक पॅनेल (एनएसईपी) संलग्नता प्रदान करेल.

पदांची निर्मिती व इतर प्रशासकीय मान्यता कार्मिक आणि प्रशिक्षण विभाग आणि खर्च विभागाच्या स्थापित प्रक्रियांनुसार केल्या जातील, असे ते म्हणाले.

या विधेयकाचा उद्देश वैधानिक आणि प्रक्रियात्मक आवश्यकतांनुसार शक्य तितक्या लवकर दोन्ही संस्था (एनएसबी आणि एनएसटी) पूर्णपणे कार्यरत आहेत याची खात्री करणे आहे, असे त्यांनी सांगितले, तसेच हे विधेयक स्वातंत्र्यानंतरच्या क्रीडा क्षेत्रातील सर्वात मोठी सुधारणा असल्याचा त्यांनी पुनरुच्चार केला.

या विधेयकाला एनएसएफएस तसेच खेळाडूंनी मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला आहे. सुरुवातीला संशयास्पद असलेल्या भारतीय ऑलिम्पिक संघटनेनेही मंत्र्यांशी व्यापक चर्चेनंतर त्याचे समर्थन केले आहे. (वृत्तसंस्था)

#### मानक सुरक्षा उपाय

विधेयक मंजूर झाल्यानंतर, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताच्या सहभागावर अंतिम निर्णय घेण्याचा सरकारचा अधिकार असल्याची अघोषित समज औपचारिक झाली आहे. हा मुद्दा बहुतेकदा तेव्हा उपस्थित होतो जेव्हा कट्टर शत्रू पाकिस्तान उच्च सीमा तणावाच्या काळात सहभागी असतो, जसे की या वर्षीच्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यापासून आहे. मांडविया म्हणाले की, विधेयकातील सरकारी विवेकबुद्धी कोणत्याही विशिष्ट देशाशी विचारात घेऊन संहिताबद्ध केलेली नाही. आंतरराष्ट्रीय सहभाग रोखण्यासाठी सरकारला सक्षम करणारी तरतूद ही जागतिक स्तरावरील क्रीडा कायद्यांमध्ये आढळणारी एक मानक सुरक्षा उपाय आहे, जी असाधारण परिस्थितीत वापरण्यासाठी आहे, असे मांडविया म्हणाले. हे राष्ट्रीय सुरक्षेचे धोके, राजनैतिक बहिष्कार किंवा जागतिक आणीबाणी यासारख्या परिस्थितींचा समावेश करते आणि ते कोणत्याही विशिष्ट देशाविरुद्ध निर्देशित केलेले नाही. प्रत्यक्षात पाकिस्तानसोबतच्या क्रीडा संबंधांबाबतचे निर्णय व्यापक सरकारी धोरण आणि सुरक्षा मूल्यांकनांद्वारे आकारले जातात. ■

### भारतीय बुद्धिबळ लीगसाठी स्पोर्ट्स फाऊंडेशनशी करार

◆ **नवी दिल्ली, १३ ऑगस्ट**

एका ऑनलाइन चेस प्लॅटफॉर्मने इंडियन चेस लीग सुरू करण्यासाठी आणि देशातील खेळाच्या परिसंस्थेला बळकटी देण्यासाठी स्पोर्ट्स प्रमोशन फाऊंडेशनसोबत करार केला आहे. या करारामध्ये वंचित तरुण प्रतिभांची ओळख पटवणे व त्यांचे संगोपन करणे यासह अनेक उपक्रम राबवले जात आहेत.

गत काही वर्षांत ग्रॅण्डमास्टर्सची संख्या व जागतिक स्तरावर भारतीय खेळाडूंच्या कामगिरीच्या बाबतीत देशातील बुद्धिबळ क्षेत्रात लक्षणीय वाढ होत आहे.

टी९एअल क्यूबद्वारे सुरू झालेले स्टार्टअप रुकटूकने तरुण भारतीय प्रतिभेचे संगोपन करण्याच्या महत्त्वाकांक्षेसह बुद्धिबळ विकासाला चालना देण्यासाठी स्टार्स फाऊंडेशनसोबत भागीदारी केली आहे, असे एका निवेदनात म्हटले आहे.

रुकटूक हे एक बुद्धिबळ प्लॅटफॉर्म आहे, जे व्यक्तांना दैनंदिन स्पर्धांमध्ये भाग घेण्याची व बक्षिसे मिळविण्याची परवानगी देते. म्हणजे सोसायटी फॉर ट्रान्सफॉर्मेशन, इन्क्लुजन अ‍ॅण्ड रिकग्निशन थ्रू स्पोर्ट्स आणि हा तळागाळातील खेळ आणि युवा विकासावर केंद्रित उपक्रम आहे. (वृत्तसंस्था)

## सुरेश रैना ईडीसमोर हजर



### बेकायदेशीर बेटिंग अ‍ॅप्स प्रकरण

◆ **नवी दिल्ली, १३ ऑगस्ट**

माजी भारतीय क्रिकेटपटू सुरेश रैना बुधवारी नवी दिल्लीतील अंमलबजावणी संचालनालयासमोर (ईडी) कथित बेकायदेशीर बेटिंग अ‍ॅपशी संबंधित अवैध सावकारी प्रकरणात चौकशीसाठी हजर झाला, असे अधिकृत सूत्रांनी सांगितले.

एकदा तो साक्ष देत असेल, तर संघीय तपास एजन्सी अवैध सावकारी प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पीएमएलए) त्याचे जबाब नोंदवेल अशी अपेक्षा आहे.

१एक्स बेट नावाच्या अ‍ॅपशी संबंधित बेकायदेशीर बेटिंग प्रकरणात चौकशीसाठी माजी भारतीय क्रिकेटपटू सुरेश रैना (३८) याला १३ ऑगस्ट रोजी एजन्सीसमोर हजर राहण्यास सांगण्यात आले होते, त्यानुसार रैना बुधवारी ईडीसमोर हजर झाला.

माजी भारतीय क्रिकेटपटू काही विशिष्ट जाहिरातींद्वारे अ‍ॅपशी जोडला गेला असल्याचे समजते. चौकशीदरम्यान ईडी अधिकाऱ्यांना त्याचे या अ‍ॅपशी असलेले संबंध समजण्याची अपेक्षा आहे.

एजन्सी अशा अनेक बेकायदेशीर बेटिंग अ‍ॅप्सची चौकशी करत आहे, ज्यांनी असंख्य लोकांना व गुंतवणूकदारांना कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचा किंवा मोठ्या प्रमाणात कर चुकवल्याचा आरोप आहे. (वृत्तसंस्था)

## खालिद जमील पूर्णवेळ भारतीय प्रशिक्षक म्हणून काम करणार

### दोन वर्षांचा करारबद्ध

◆ **नवी दिल्ली, १३ ऑगस्ट**

खालिद जमील यांनी दोन वर्षांच्या कालावधीसाठी पूर्णवेळ आधारावर भारतीय वरिष्ठ पुरुष फुटबॉल संघाचा प्रशिक्षक म्हणून कार्यभार स्वीकारला आहे आणि निकालांवर अवलंबून त्यांचा करार एक वर्ष वाढवण्याचा पर्याय आहे, असे अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने (एआयएफएफ) बुधवारी सांगितले.

जमशेदपूर एफसीशी वेगळे झाल्यानंतर जमील यांनी एआयएफएफच्या करारावर स्वाक्षरी केली आहे, असे त्यांनी सांगितले. जमील १५ ऑगस्ट रोजी बंगळुरूमधील द्रविड-पदूकोण सेंटर फॉर स्पोर्ट्स एक्सलन्स येथे आपलचा पहिला प्रशिक्षण शिबिर सुरू करणार आहे. त्यांची पहिली कामगिरी भारतीय संघासोबत नेशन्स चषक असेल. या नेशन्स चषक स्पर्धेत भारतीय संघ यजमान ताजिकिस्तान (२९ ऑगस्ट), इराण (१ सप्टेंबर) आणि अफगाणिस्तान (४ सप्टेंबर) गट ब मध्ये सामना खेळणार आहे.

ऑक्टोबर विंडोमध्ये भारत सिंगापूर विरुद्ध (९ आणि १४ ऑक्टोबर) दोन महत्त्वाचे आशियाई चषक २०२७ पात्रता सामने खेळेल.



आमच्या राष्ट्रीय संघाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी मला सोपवण्यात आली याचा मला खूप अभिमान आहे, असे जमील म्हणाले. गत काही वर्षांत मला भारतीय खेळाडूंना प्रशिक्षण देण्याची संधी मिळाली आहे व मी त्यांची ताकद आणि कमकुवतपणा जवळून समजून घेतला आहे. सीएएफए नेशन्स चषक आणि सिंगापूरविरुद्धच्या आगामी महत्त्वाच्या आशियाई चषक पात्रता सामन्यांसाठी आम्ही जे काही करणार, ते अंतर्दृष्टी मूलभूत असेल, असेही जमील म्हणाले.

खालिद जमील यांनी मनोलो मार्केझची जागा घेतली आहे. त्यांचा प्रशिक्षकपदाचा करार गत महिन्यात एआयएफएफने रद्द केला होता.

२०१२ मध्ये सॅव्हियो मेडेरा नंतर पुरुषांच्या राष्ट्रीय संघाचे प्रशिक्षक असलेले जमील हे पहिले भारतीय आहेत. त्यांना इंडियन सुपर लीग व आय-लीगमध्ये व्यापक प्रशिक्षणाचा अनुभव आहे. त्यांनी जमशेदपूर एफसी, नॉर्थईस्ट युनायटेड एफसी, ऐझॉल एफसी, ईस्ट बंगाल एफसी, मोहन बागान एसी आणि मुंबई एफसी सारख्या क्लबचे व्यवस्थापन केले आहे. त्यांनी २०१६-१७ मध्ये ऐझॉल एफसीला ऐतिहासिक आय-लीग विजेतेपद मिळवून दिले. जमील यांच्या मार्गदर्शनाखाली जमशेदपूर एफसीने सुपर चषक २०२५ च्या अंतिम फेरीत व आयएसएल प्ले-ऑफ २०२४-२५ आणि सुपर चषक २०२४ च्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

जमील हा १५ सामने खेळणारा माजी भारतीय आंतरराष्ट्रीय खेळाडू आहे. मधल्या फळीतील खेळाडू म्हणून जमील यांनी १९९७ मध्ये नेपाळमध्ये झालेल्या दक्षिण आशियाई फुटबॉल स्पर्धेत पदार्पण केले वल या स्पर्धेत भारत विजेता ठरला. तो २००२ च्या विश्वचषक पात्रता आणि २००१ च्या मर्डेका स्पर्धेसाठी भारतीय संघाचा भाग होता. आपल्या क्लब खेळण्याच्या कारकिर्दीत जमील यांनी महिंद्रा युनायटेड सोबत राष्ट्रीय फुटबॉल लीग, दोन फेडरेशन चषक व दोन शिल्ड जिंकले. त्यांनी एअर इंडिया व मुंबई एफसीचे शर्ट सुद्धा घातले. संतोष चषकात त्यांनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले व महाराष्ट्राला त्यांनी १९९९ मध्ये जेतेपद जिंकून दिले होते. (वृत्तसंस्था)

## २०३० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी भारताच्या बोलीला आयओएने दिली मान्यता

◆ **नवी दिल्ली, १३ ऑगस्ट**

भारतीय ऑलिम्पिक संघटनेने (आयओए) बुधवारी येथे झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत (एसजीएम) २०३० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या आयोजनासाठी देशाच्या बोलीला औपचारिक मान्यता दिली.

भारताने २०३० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी अहमदाबादला यजमान शहर म्हणून आधीच रस व्यक्त केला आहे, परंतु ३१ ऑगस्टच्या अंतिम मुदतीपूर्वी देशाला अंतिम बोलीसाठी प्रस्ताव सादर करावे लागतील.

अहमदाबादसह २०१० चे यजमान दिल्ली आणि भुवनेश्वर यांचाही विचार केला जाईल. आम्ही सर्वजण एकत्र आहेत याचा मला आनंद आहे.



आयओएच्या अध्यक्ष पी. टी. उषा

हा एकमताने निर्णय होता व आमची तयारी पुढे जाईल. अहमदाबाद हे यजमान शहर आहे की नाही हे आम्ही सांगू शकत नाही. भुवनेश्वर व दिल्लीमध्येही आमच्याकडे चांगल्या सुविधा आहेत, असे आयओएचे अध्यक्ष पी. टी. उषा यांनी विशेष बैठकीनंतर सांगितले.

कॅनडाने यजमानपदाच्या शर्यतीतून माघार घेतल्याने २०३० राष्ट्रकुल स्पर्धेचे यजमानपद जिंकण्याची भारताची शक्यता उजळली आहे.

नेमबाजी, तिरंदाजी, कुस्ती इत्यादी आपले सर्व पदक मिळवणारे खेळ असावेत अशी योजना आहे. कबड्डी व खो-खो सारखे आपले पारंपारिक खेळही तिथे असले पाहिजेत, असे आयओएचे सहसचिव कल्याण चौबे म्हणाले.

राष्ट्रकुल क्रीडाचे एक मोठे शिष्टमंडळ या महिन्याच्या अखेरीस शहरात येण्याची अपेक्षा आहे.

२०३० ची राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा ही एक पूर्णवेळ खेळ असेल. आपल्याकडे ज्या खेळांमध्ये आपण चांगले आहोत आणि जास्तीत जास्त पदके जिंकण्याची संधी आहे, असे कार्यकारी परिषदेचे सदस्य रोहित राजपाल म्हणाले.

राष्ट्रकुल क्रीडाची महासभा नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात ग्लासगो येथे यजमान देशाचा निर्णय घेईल. भारताने यापूर्वी २०१० मध्ये दिल्ली येथे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले होते. (वृत्तसंस्था)




वेस्ट इंडीजने तिसरा एकदिवसीय सामना २०२ धावांनी जिंकून पाकिस्तानविरुद्धची ऐतिहासिक वन-डे मालिका २-१ ने जिंकली. या सामन्यात शाई होपने शतक झळकावले. १९९१ नंतर वेस्ट इंडीजने पाकिस्तानविरुद्ध जिंकलेली ही पहिली द्विपक्षीय एकदिवसीय मालिका होती आणि ऑस्ट्रेलिया आणि पाकिस्तानविरुद्ध कसोटी आणि टी-२० स्वरूपात घरच्या मैदानावर पराभवांचा मालिका खंडित केली.

### रोहित वन-डे क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर

**दुबई** : आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील त्याच्या भविष्याबद्दलच्या चर्चे दरम्यान, भारतीय महान फलंदाज रोहित शर्मा बुधवारी जाहीर झालेल्या आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. २०२५ च्या आयपीएल हंगामापासून कोणतेही स्पर्धात्मक क्रिकेट खेळलेला नाही. ३८ वर्षीय रोहितने बाबर आझमला मागे टाकले आहे, तर नुकत्याच संपलेल्या वेस्ट इंडीजविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत कमी धावा काढल्यानंतर पाकिस्तानी खेळाडू तिसऱ्या क्रमांकावर घसरला आहे. ७५६ रेटिंग गुणांसह रोहित शुभमन गिल (७८४) च्या मागे आहे.

## खाणं म्हणजे पोट भरणे नव्हे तर तो एक यज्ञ होय

### योगतज्ञ मनमोहन भुतडा यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

खाणं म्हणजे केवळ जिभेचे चोचले पुरविणे किंवा पोट भरणे नव्हे तर तो एक यज्ञ होय, असे प्रतिपादन योगतज्ञ मनमोहन भुतडा यांनी केले.

नवी पेठेतील शिवस्मारक सभागृहात योगसेवा मंडळातर्फे आयोजित व्याख्यानमालेतील ''आहार का, कसा, केव्हा, किती, कुठे'' याचे दुसरे पुष्प गुंफताना ते बोलत होते.

ते म्हणाले, शरीराचं पोषण आहारातील स्थूल, तर मनाचं सूक्ष्म भागामुळे होतं. आपल्या अन्नाचे मुख्य घटक म्हणजे पिष्टमय, नत्रयुक्त, स्निग्ध पदार्थ आणि कमी प्रमाणात जीवनसत्वे, क्षार व तंतुमय पदार्थ होत. ते सर्व शरीराला त्याच्या गरजेपुरते मिळायला हवेत. त्यांचं प्रमाण कमी पडलं तर नुकसान होतच पण जास्त झालं तरी अपाय होतो. आपल्या अन्नातील विविध प्रकारातून ते मिळतात.आपला



आहार असा ठेवला पाहिजे की त्यानं शरीराचं पोषण नीट होईल, झीज भरून निघेल, शरीराचे सर्व व्यवहार सुरळीतपणे पार पडण्यासाठी लागणारी ऊर्जा मिळेल, रोगांपासून संरक्षण होईल. रस, रक्त, अस्थी, मांस, मेद, मज्जा व शुक्र या सातही धातूचं पोषण होईल. मानवाला ज्या सहा चवींच ज्ञान होतं त्या सर्व मधुर, तिक्त, आम्ल, लवण, कषाय, कटू या सर्व रसाचं -उतरत्या क्रमाने- त्यात योग्य प्रमाण हवं. उपनिषदे, चरकसंहिता , हठयोग,घेरंड संहिता, भगवत गीता,पातंजल योगसूत्र, आयुर्वेद या भारतीय व अनेक परदेशी ग्रंथातून ,जागतिक आरोग्य संघठना इ. मधून आहाराविषयी खूप व सविस्तर मार्गदर्शन मिळते. त्यांनी उपस्थितांच्या शंकांना समर्पक उत्तरे दिली. पाऊस असूनही योगसाधक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढील सत्र रविवार दि. १७ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता शिवस्मारक येथेच होईल. त्यामध्ये आपल्या गरजेनुसार आहार कसा बनवायचा तेही जाचक नियंत्रणे न ठेवता, सर्वांना सहज शक्य होईल असा आहार कसा ठरवायचा याबद्दल मार्गदर्शन केले जाईल.

#### व्याख्यानातील मुख्य बाबी

दिवसातून दोनच वेळा जेवावे. दुपारचं ११ ते १ या वेळेत तर संध्याकाळच सूर्यास्ताचे वेळी. सायंकाळी जेवण हलके असावे. सकाळी व दुपारी फळे खावीत- त्यांचा रस नको. आधीचे अन्न पचल्याशिवाय पुढचे खाऊ नये. विरुद्ध गुणांचे पदार्थ एकत्र खाऊ नयेत. अन्न ताजं, गरम असावं, शिळं किंवा परत गरम करून खाऊ नये. पोटाचा अर्धा भाग भरेल इतकेच अन्न खावे, पाव भाग द्रवाने भरावा व उरलेला पाव भाग रिकामा ठेवावा.अन्नाला नावे ठेवू नये, चव घेत खावे.

## राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेत सोलापुरच्या श्रावणी सूर्यवंशीला वरिष्ठ गटात सुवर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

अहमदाबाद येथील वीर सावस्कर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेतील डायव्हिंग प्रकारात येथील श्रावणी प्रताप सुर्यवंशी हिने बुधवारी वरिष्ठ गटात सुवर्ण पदक पटकाविले. श्रावणीने महाराष्ट्रकडून प्रतिनिधित्व करताना ३ मीटर स्प्रिंग बोर्डमध्ये १८६.५० गुणासह ही कामगिरी केली

श्रावणी ही देगांव येथील स्व.सौ. मीनाताई ठाकरे (माँसाहेब) क्रीडा व शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय देगांवची विद्यार्थिनी असून ती इयत्ता १२ वी शास्त्र शाखेत शिकत आहे. तिला आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक श्रीकांत शेटे, कुंजकिशोर मेलेम, अतुल पाटील, क्रीडाशिक्षक श्री बेलुरे यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय वानकर, विश्वस्त विठ्ठल वानकर, प्राचार्य आर. व्ही. खांडेकर यांनी अभिनंदन केले.

**१७ व्या वर्षात ६० पदकांची कमाई**
सुवर्ण-रौप्य-ब्राँझ
राज्य : २२, ६,१
राष्ट्रीय : १६, ५, २
आतंरराष्ट्रीय:२,४,२



अहमदाबाद : सुवर्ण पटकाविलेल्या श्रावणी सुर्यवंशीसमवेत तिचे प्रशिक्षक श्रीकांत शेटे.

# लाभार्थ्यांनी वेळेत औजारे खरेदी करावे

## सीईओ कुलदीप जंगम; कृषी औजारे व साहित्याची लॉटरी सोडत



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये जिल्हा परिषदेच्या कृषि विभागामार्फत सेस योजने अंतर्गत जिल्हयातील शेतक-यांकरीता शेतीपुरक औजारे व साहित्य वाटपाकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या अध्यक्षतेखाली लॉटरी सोडत काढण्यात आली.

यावेळी त्यांनी पात्र लाभार्थ्यांनी वेळेत औजारे खरेदी करण्याचे आवाहन केले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांचे उपस्थितीमध्ये लक्षांकानुसार लॉटरी सोडत नेहरू नगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुलांकडून लाभार्थी नावे काढण्यात आली. यावेळी कृषी विकास अधिकारी हरिदास हावळे, उत्तरचे गटविकास अधिकारी राजाराम भोंग, जिल्हा कृषी अधिकारी सागर बारवकर, भारत कदम, अजय वगरे, महेश पाटील, सुर्यकांत मोहिते, राजश्री कांगरे, लता बनसोडे यांची उपस्थिती होती. औजारासाठी तालुकानिहाय उद्दीष्ट २४५९ असुन त्याकरीता २१४४१ अर्ज प्राप्त झाले होते. मुख्य कार्यकारी अधिकारी व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या उपस्थीतीत सुरुवातीला उत्तर पंचायत समिती कडील लाभार्थ्यांची सोडत शाळकरी मुलांकडुन काढण्यात आली.

**निवड झालेल्या लाभार्थ्यांना आर्थिक वर्षामध्ये विहित खरेदी प्रक्रिया पूर्ण केल्या नंतरच सदर योजनेचा लाभ थेट पद्धतीने देय राहणार आहे. सर्व सोडतीमध्ये पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांनी पंचायत समिती स्तरावर क्षेत्रीय यंत्रणेशी समन्वय साधून वेळेत औजारे खरेदी करण्याची दक्षता घेण्याचे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले.**

## महत्वाचे...



### मृत बिराजदार यांच्या कुटुंबीयांना मदत मिळण्यासाठी प्रयत्न करणार : शटगार

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

अक्कलकोट तालुक्यातील आंदेवाडी(ज.) येथील बोरी नदीच्या पाण्याच्या प्रवाहाच्या पात्रात वाहून गेलेल्या रेवणसिद्ध श्रीमंत बिराजदार वय २७ रा.बबलाद हा तरुण मृत पावला होता. बबलाद येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या कुटुंबियांची सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा.सातलिंग शटगार, अक्कलकोटच्या माजी नगराध्यक्ष डॉ. सुवर्णाताई मलगोंडा, जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष अरुण जाधव आदींनी मृत्त रेवणसिद्ध बिराजदार यांच्या मातोश्री रेवम्मा बिराजदार व पत्नी वर्षा बिराजदार यांची भेट घेऊन सांत्वन केले. प्रशासनानी आपत्तीग्रस्त कुटुंबीयांना लवकरात लवकर जास्तीत जास्त मदत द्यावी. आणि त्यांच्या पत्नीस कुटुंबीयांच्या उदरनिर्वाहासाठी शासकीय सेवेत सामावून घ्यावे. अशी मागणी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सातलिंग शटगार यांनी केले आहे. यावेळी हनुमंत पाटील, आमोगसिध्द पुजारी, मलकारी पुजारी, सुभाष सुसलादे, मलकारी बिराजदार आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### शिवाजी महाविद्यालयाच्यावतीने तिरंगा रॅली

**बार्शी, दि. १३ ऑगस्ट-**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयामधील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत हर घर तिरंगा मोहीम अंतर्गत तिरंगा रॅली काढण्यात आली. रॅलीचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अब्दुल शेख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य प्रा. रविंद्र वायकर, डॉ. महादेव राऊत, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. दामाजी भिसे, प्रा. मनोज चिकराम, प्रा. समाधान लोंढे, प्रा. युवराज खुळे, प्रा. नागोराव खंदारे,डॉ. अजय तोडकरी, प्रा.अनिता चिंचोलकर, प्रा.अविनाश शेंडगे आदी उपस्थित होते.

### सांगोल्यात आज धारेश्वर महाराजांच्या आशीर्वचनाचा कार्यक्रम

**सांगोला, दि. १३ ऑगस्ट-**



श्रावणमासा निमित्त आज गुरुवार दि.१४ ऑगस्ट रोजी सायं.५.३० वा. चौंडेश्वरी मंदिर, कोष्टी गल्ली, सांगोला येथे श्री.ष.ब्र.१०८ राष्ट्रसंत ज्ञानराज पद्मभास्कर डॉ.नीलकंठ शिवाचार्य धारेश्वर महाराज तीर्थक्षेत्र आदिमठ संस्थान धारेश्वर ता.पाटण, जि.सातारा यांचे आशीर्वचन कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रम संपल्यानंतर सर्व भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

### दुचाकी घसरून तरुण जखमी

**सांगोला, दि. १३ ऑगस्ट-**

शेतातून घरी दुचाकीवरून जात असताना गाडी घसरल्याने तरुण जखमी झाला. शुभम संभाजी लोहार (वय १८, रा देगाव, ता. मोहोळ) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. सोमवारी सायंकाळी सहाच्या सुमारास तो शेतातून राहत्या घरी दुचाकी वर निघाला होता. रानमसले येथे त्याची दुचाकी घसरली. त्यात त्याच्या तोंडास जखम झाल्याने त्याच्यावर वडाळा येथे प्राथमिक उपचार करून पुढील उपचारास मामा विनोद लोहार यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

### हँडल लॉक केलेली दुचाकी लंपास

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३. ईबी.१३६६ ही दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना जाधव पान शॉप अक्कलकोट रोड येथे ७ ऑगस्ट रोजी घडली.याप्रकरणी सोहेल सलीम नदाफ (वय-२३,रा.रामवाडी, अंबाबाई मंदिर जवळ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.




## अंगारकी चतुर्थीनिमित्त विविध गणेश मंडळाच्या नूतन अध्यक्षांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

अंगारकी चतुर्थीच्या दिनी विविध गणेश मंडळाच्या नूतन अध्यक्षांचा सत्कार सोहळा श्री कालिका गणपती मंडळाच्यावतीने उत्तर कसबा, मसरे गल्ली येथे संपन्न झाला.

त्यावेळी प्रमुख अतिथी श्री सिद्धेश्वर यात्रेचे प्रमुख मानकरी राजशेखर हिरेहब्बू, शिवसेना जिल्हाप्रमुख डॉ. प्रा. अजय दासरी, आर्यनंदी परिवारचे प्रमुख मा.डॉ. राजेश फडकुले, मराठी पत्रकार संघाचे मा. मनीष केत, कसबा गणपती नूतन उत्सव अध्यक्ष बाळासाहेब मुस्तारे, रेवणसिद्ध आवजे, अंबादास शेळके, मंडळाचे मार्गदर्शक सिध्दाराम काशेट्टी, बसवराज गाबणे, प्रवीण वाले इत्यादी उपस्थित होते. शशिकांत बिराजदार यांनी आभार मानले. सूत्रसंचालन धनेश सावळगी यांनी तर छायाचित्रण प्रसिद्धीप्रमुख केदार लिगाडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लक्ष्मण कलागते, नागेश वडणे, अजित पाटील, शुभम उलागड्डे, रणजीत मोरे, महेश शिवशेट्टी, सुनील हिरेमठ, मल्लिनाथ पोतदार, अजय सारंगमठ, रोहन गाबने, सचिन खंडरे, पाथरीकर बंधू, कुलकर्णी बंधू, हेमंत हरकारे, अजिंक्य तोंडारे, ओंकार म्हेत्रे इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले.

## श्री गणपती फार्मसीमध्ये क्वालिटी अश्युरन्सवर वर्कशॉप

**टेंभूर्णी, दि. १३ ऑगस्ट-**

श्री गणपती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च, टेंभुर्णी महाविद्यालयामध्ये क्वालिटी अश्युरन्स इन फार्मा: ब्रिजिंग अॅकॅडेमिया अँड इंडस्ट्री या विषयावर वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी प्रमुख वक्ते म्हणून आशुतोष पंके सध्या असिस्टंट मॅनेजर , सिप्ला गोवा उपस्थित होते. मागील १० वर्षाचा त्यांचा प्रदीर्घ अनुभव, क्वालिटी अश्युरन्स विभागाचे औषधनिर्माण कंपनी मध्ये असणारे महत्व, जबाबदाऱ्या आणि कर्तव्य यावर त्यांनी प्रकाश टाकला.

त्याचबरोबर औषधनिर्माण कंपनीमध्ये असणारे सर्व विभाग आणि त्यांचे काम काज याबद्दलही माहिती विद्यार्थ्यांना दिली. सूत्रसंचालन प्रा. नामदेव शिंदे यांनी केले तर आभार डॉ. प्रशांत मिसाळ यांनी केले. यावेळी संस्था सचिव डॉ. रवींद्र बेंद्गुडे, अध्यक्ष अॅड. विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबा येडगे, प्राचार्या डॉ. रुपाली बेंद्गुडे, ट्रेनिंग प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. नामदेव शिंदे, डॉ. सचिन सकट, डॉ. प्रशांत मिसाळ, प्रा. शिवराज ढगे, प्रा. शैलेश पेंडोर उपस्थित होते.



## 'उत्कर्ष'चे विविध स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १४ ऑगस्ट-**

स्व. आ. डॉ. भाई गणपतरावजी देशमुख यांच्या ९८ व्या जयंतीनिमित्त आयोजित तालुकास्तरीय लोकनृत्य, वक्तृत्व, रंगभरण स्पर्धेमध्ये सांगोल्यातील उत्कर्ष विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले. लोकनृत्य स्पर्धेत इ.१ ते ४ च्या गटात उत्कर्ष प्राथमिक विद्यालयाच्या इ.४ च्या विद्यार्थ्यांनी सुंदर वेशभूषा सहित आदिवासी नृत्य सादर केले व उपस्थितांची मने जिंकली. यामध्ये द्वितीय क्रमांक पटकावला.

रंगभरण स्पर्धेमध्ये इ.४ च्या पृथ्वीराज बुंजकर, सौम्या बाबर यांनी द्वितीय तसेच पूर्वा बनसोडे हिने उत्तेजनार्थ क्रमांक मिळवला. वक्तृत्व स्पर्धेत इ.८ ते १० च्या गटात उत्कर्ष माध्यमिक विद्यालयातील इ.८ वी मधील विद्यार्थिनी स्नेहल जानकर हिने द्वितीय क्रमांक पटकावला. लोकनृत्य गाण्याचे दिग्दर्शन शिक्षिका पुनम भाकरे व शिक्षक मुरलीधर चौरे यांनी केले. या सर्वांचे कौतुक संस्थेच्या अध्यक्षा नीलिमा कुलकर्णी, डॉ. संजीवनी केळकर, शालिनी कुलकर्णी, वसुंधरा कुलकर्णी, माध्यमिकचे मुख्याध्यापक सुनील कुलकर्णी, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका विश्रांती मागाडे, उपमुख्याध्यापिका स्वराली कुलकर्णी, पूर्व प्राथमिकच्या मुख्याध्यापिका संध्या शास्त्री यांनी केले.



## डॉ. रंगनाथन हे भारतीय ग्रंथालयाच्या इतिहासातील चिरस्थायी व्यक्तीमत्व

### ग्रंथपाल सुधीर माळी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १२ ऑगस्ट-**

भारताला ग्रंथालय क्षेत्रात जागतिक प्रतिष्ठा प्राप्त करून देणाऱ्या डॉ. रंगनाथन यांचा ग्रंथालय विकासात मोठा वाटा आहे. देशातील सर्वसामान्यांना ज्ञानाची दारे विनामूल्य खुली करण्याचा विचार सर्वप्रथम डॉ. एस. आर.रंगनाथन यांनी रुजवला. भारतीय ग्रंथालयाच्या इतिहासातील चिरस्थायी व्यक्तीमत्व म्हणून डॉ. एस. आर. रंगनाथन यांना ओळखले जात असल्याचे मत ग्रंथपाल सुधीर माळी यांनी व्यक्त केले.

फॅबटेक टेक्निकल कॅम्पस येथे ग्रंथालयामध्ये डॉ.एस.आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. रविंद्र शेंडगे, पॉलिटेक्निकचे प्राचार्य तानाजी बुरूंगले, डॉ. स्वाती लोकरे, कार्यालयीन अधिक्षक राजकुमार पाटील, चीफ अकाउंट सुनिल टाकळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विविध पुस्तक कादंबरीचे स्टॉल ग्रंथालयात वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यात आला होता. यावेळी डॉ. स्वाती लोकरे, प्रा. आशिष जोशी यांनी उपस्थितांना संबोधित केले. याप्रसंगी डॉ. ज्योती शिंदे, स्टुडंट डिन प्रा. संजय पवार, प्रा. शरद आदलिंगे, गौरव जाधव, सविता भेरे, स्वाती इंगळे, दिलीप महाडिक, मनोज हत्तेकर, रविंद्र बिले, प्रितम खाडे, अजित ढुणे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथालयातील मोहन लिगाडे, स्वप्नील रूपनर, नेताजी मस्के यांनी परिश्रम घेतले.

## उपळे (दु) येथील मराठा आरक्षण आंदोलकांवरील गुन्हे मागे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१३ ऑगस्ट-**




बार्शी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयांनी उपळेदुमाला (ता.बार्शी) येथील मराठा समाज आरक्षण लढ्यात आंदोलन करणाऱ्या मराठा आंदोलाकांवरील गुन्हे शासन आदेशाने आज मागे घेतले. या मराठा समाज आरक्षण आंदोलकात कैलास (बापू) नेवाळे (लिंगायत समाज), नानासाहेब शेंडगे (धनगर समाज) हे इतर जात समाजबांधव आंदोलक म्हणून सहभागी झाले होते.

मराठा समाज आरक्षण लढ्यात मराठा समाजाचे नसताना देखील मराठा समाज आरक्षण लढ्यात गुन्हे अंगावर घेणारे, मराठा आरक्षण लढ्यात हिरीरीने भाग घेणारे कैलास (बापू) नेवाळे, नवनाथ शेंडगे यांचा देखील समावेश होता. या न्यायालयीन लढ्यात लढवय्या मराठा समाज आरक्षण आंदोलकांच्यावतीने अॅड. हर्षवर्धन बोधले, अॅड. रणजीत तांबारे, अॅड. राजेश काशीद अॅड. श्रीकांत पाटील, अॅड. वैभव देशमुख, अॅड. गणेश फावडे यांनी काम पाहिले.

## वरिष्ठ लिपिक राजेंद्र गिड्डे यांचा सन्मान

**मोडनिंब, दि. १३ ऑगस्ट-**

मोडनिंब (ता. माढा) येथील मा. ह. महाडीक महाविद्यालयाचे वरिष्ठ लिपिक राजेंद्र गिड्डे यांचा विद्यापीठाच्या वतीने सन्मान करण्यात आला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा २१ वा वर्धापनदिन समारंभ नुकताच विद्यापीठ सभागृहात झाला. विद्यापीठाच्या वतीने उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार देऊन राजेंद्र गिड्डे यांना गौरविण्यात आले. या समारंभास कुलगुरु प्रा. प्रकाश महानवर, आमदार गोपीचंद पडळकर, प्रा. अनिल सहस्त्रबुध्दे, प्रा. डॉ हेमलता बागला आदी मान्यवर उपस्थित होते. गिड्डे यांच्या सन्मानाबद्दल अभिनंदन होत आहे.



## नूमवि शाळेत चिमणीचे घरटे बनवण्याची कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

शरद पवार फेलोशिप उपक्रम ंतर्गत नैतिक मूल्ये आणि जीवन कौशल्यांचा विकास करण्यासाठी नूमवि मराठी शाळेत चिमणीचे घरटे बनवण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुणे निसर्गप्रेमी शोभा शेटे आणि कृपा शेटे यांचा परिचय रोहिणी चौधरी यांनी करून दिला.

मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांनी विविध पक्षांची माहिती सांगितली. तसेच घरटे कसे तयार करावे, त्याचा चिमण्यांच्या जीवनात कसा उपयोग होतो याची माहिती दिली. घरटे बनवण्याच्या प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे काम केले, ज्यामुळे सहकार्य, संयम, जबाबदारीची भावना यांसारखी नैतिक मूल्ये आणि सर्जनशीलता, समस्यांचे निराकरण कौशल्य, पर्यावरण संवर्धनाची जाणीव यांसारखी जीवन कौशल्ये विकसित झाली. सूत्रसंचालन व आभार रोहिणी चौधरी यांनी केले.

## निधन वृत्त...

### नंदिनी बिराजदार



**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

श्रीशैल नगर भवानी पेठ येथील नंदिनी उर्फ धनव्वा शिवलिंग बिराजदार (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने बुधवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुन, जावई व नातवंडे असा परिवार आहे. अॅड. अभय बिराजदार यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पार्थिवावर लिंगायत रुद्रभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### रंजना कुलकर्णी



**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

सांगोला शहरातील एखतपूर रोड येथील श्री दत्त मंदिराचे पुजारी शरद कुलकर्णी यांच्या पत्नी रंजना कुलकर्णी (वय-६२) यांचे मंगळवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात, एक मुलगा, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### अंबूबाई मडुर



**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

पूर्व विभागातील एकेकाळी प्रसिद्ध असलेले मडूर डाईंगच्या मालकीन अंबूबाई लक्ष्मण मडुर यांचे (वय ९२) यांचे बुधवारी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा व दोन मुली नातू नातवंडे, परतवंडे आहेत. नागेश मडूर व श्रीपाद मधुर यांच्या त्या आजी होत.

## पिकविमा भरण्याचा आज शेवटचा दिवस

**यंदा जिल्ह्यातून २ लाख ६७ हजार शेतकऱ्यांनी २ लाख हेक्टरसाठी भरला पीकविमा**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

खरीप हंगामासाठी यंदा नवीन पीकविमा योजना सुरू झाली आहे. शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी होऊन आपल्या पिकांचे संरक्षण करावे, असे आवाहन शासनाकडून वारंवार करण्यात येत आहे. मात्र यंदा १ रूपयात पीकविमा उतरता येत नसल्याने जिल्ह्यातील अवघ्या २ लाख ६७ हजार २९५ शेतकऱ्यांनी पीकविमा भरला आहे.

शेतकऱ्यांसाठी पीकविमा योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत १४ ऑगस्ट असून, त्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचा लवकरात लवकर विमा भरावा, असे आवाहन जिल्हा कृषी विभागाकडून करण्यात आले आहे. या योजनेत, नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगराईमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जाते. शेतकरी ऑफलाइन किंवा ऑनलाइन पद्धतीने या योजनेत अर्ज करू शकतात. अधिक माहितीसाठी, तुम्ही कृषी विभागाच्या वेबसाइटला भेट देऊ शकता किंवा तुमच्या जवळच्या कृषी कार्यालयात संपर्क साधू शकता. पिकविमा योजना शेतकऱ्यांसाठी खूप फायद्याची आहे. त्यामुळे, जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी होऊन आपल्या पिकांचे संरक्षण करावे, असे आवाहन शासनाकडून करण्यात येत आहे.

२०२४ च्या खरिप-रबी हंगामात पीक विमा योजनेसाठी ५ लाख ८२ हजारांहून अधिक बोगस अर्ज दाखल झाले. या अर्जांद्वारे, खोट्या व बनावट कागदपत्रांद्वारे सरकारी, गायरान, मंदिर-मशिदींच्या जमिनी आणि पडीक जमिनींवर शेती केल्याचं दाखवून विमा उतरवण्यात आला. आता १ रुपयाऐवजी शेतकऱ्यांना पूर्वीप्रमाणे खरिप हंगामासाठी विमा संरक्षित रकमेच्या २ %, रबी हंगामासाठी १.५% आणि दोन्ही हंगामातील नगदी पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या ५ % एवढा हप्ता भरावा लागणार आहे. उदाहरणार्थ, समजा तुम्हाला खरिप हंगामात १ हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन पिकाचा विमा उतरवायचा आहे आणि सोयाबीनला हेक्टरी विमा संरक्षण ३५,००० रुपये आहे. तर ३५,००० रुपयांच्या २ % म्हणजे प्रती हेक्टर ७०० रुपये शेतकऱ्याला द्यावे लागणार आहेत.




## निंबाळकर विद्यालयामधे स्पर्धा परीक्षा, सायबर क्राईमवर मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ ऑगस्ट-**

येथील अध्यापक विद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा व सायबर क्राईम यावर मार्गदर्शनाचे आयोजन केले. याप्रसंगी बार्शी तालुका पोलीस स्टेशन सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे, निर्भया पथक प्रमुख सौ.सिंधू देशमुख, पत्रकार धीरज शेळके उपस्थित होते. ढेरे यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी, ध्येय निश्चित करुन, सतत अभ्यास करावा, सातत्य ठेवावे, आई वडिलांची जाणीव ठेवावी, स्वताच्या नोट्स काढव्यात.

अपयश आले तरी खचून न जाता प्रयत्न करावेत, तसेच त्यांनी स्वतःचा संघर्ष सांगितला. तसेच मोबाईलचा वापर मर्यादित करावा, असे सांगितले. सिंधू देशमुख मॅडमनी मुलीना स्वसंरक्षण, गुड टच, बॅड टच, कोणाचाही अन्याय सहन करायचा नाही, प्रवास करताना कशी काळजी घ्यायची, काहीही अडचण असेल तर निर्भया पथकाला संपर्क करा. शिक्षण घेऊन स्वताच्या पायावर उभा रहा, असे मार्गदर्शन केले.

## महत्वाचे...



### पारधी समाजाची व्यायाम शाळा जाळल्याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

शहरातील सेटलमेंट भागात असलेल्या पारधी समाजाचे मंदिर आणि व्यायामशाळा परिसरातील समाजकंटकांनी जाळून समाजातील युवकांना जीवे मारण्याची धमकी दिल्याबाबत जय कालिका आदिवासी पारधी समाज सामाजिक संस्थेच्या वतीने समाजातील शेकडो नागरिक एकत्र येऊन जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. जय कालिका आदिवासी संस्थेचे अध्यक्ष महेश काळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना निवेदन दिले. २९ जुलै रोजी रात्री साडेआठच्या दरम्यान सेटलमेंट भागातील काही युवकांनी सचिन चव्हाण याला हटकून त्याला मारहाण करत जातीवाचक शिवीगाळ केली होती. त्यानंतर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यानंतरही दाखल झालेला गुन्हा मागे घेण्यासाठी जीवे मारण्याची धमकी देत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. यानंतर चिडून त्या लोकांनी समाजाच्या व्यायामशाळेला आग लावून आतील साहित्य आणि मंडळाची गणेश मूर्ती याची नासधूस केली आहे. यावेळी मनोज काळे, पार्वती काळे, राजेंद्र काळे, मारुती काळे, मंजुनाथ काळे, रवीना चव्हाण, शंकर चव्हाण, मंथन काळे, मयूर काळे, सिद्धूबाई काळे, कविता चव्हाण, मनीषा काळे, सुमित्रा काळे उपस्थित होते.



### अमेरिकन साम्राज्यवादाचा धिक्कार असो; माकपचे ट्रम्पच्या विरोधात आंदोलन

**सोलापूर, दि. १४ ऑगस्ट-**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १ ऑगस्टपासून भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर २५ टक्क्यांपर्यंत अतिरिक्त कर लादण्याचा निर्णय घेतला असून, त्यामुळे भारतीय उद्योग आणि शेती क्षेत्रावर गंभीर परिणाम होणार आहेत. व्यापार वाटाघाटी सुरू असतानाही अमेरिकेकडून सातत्याने धमक्या देण्यात येत आहेत. रशियाकडून भारत तेल व शस्त्रास्त्रे विकत घेत असल्याने ती खरेदी थांबवण्याची धमकी ट्रम्प यांनी दिली आहे. अन्यथा, २७ ऑगस्टपासून आणखी २५ टक्के अतिरिक्त कर लावण्याची घोषणा करण्यात आली आहे. या कृतीतून अमेरिकन साम्राज्यवादाचा कुरूप चेहरा उघड झाला असून, भारताच्या सार्वभौमत्वावर व स्वतंत्र व्यापार धोरणांवर सरळ आक्रमण केले जात आहे. तसेच या टेरिफ करामुळे शहरातील मुख्य उत्पादन चादर व टॉवेल्स निर्यातीस बंदी असल्याने अडीचशे कोटी रुपयांची उलाढाल ठप्प झाली आहे. यामुळे हजारो कामगारांच्या रोजीरोटीचा प्रश्न गंभीर बनलेला आहे. टेरीफ कर हाणून पाडा अन्यथा रस्त्यावरची लढाई आणखी तीव्र करण्याचा इशारा ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी दिला. बुधवार १३ ऑगस्ट रोजी सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्सच्या वतीने सिटूचे राज्य उपाध्यक्ष कॉ. युसुफ शेख (मेजर) यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद पूनम गेट येथे टेरिफ कराच्या निषेधार्थ आक्रमक धरणे आंदोलन व अमेरिकन साम्राज्यवादाचा प्रमुख डोनाल्ड ट्रम्प यांचा प्रतीकात्मक पुतळा दहन करण्यात आला. सिटूचे राज्य महासचिव कॉ. एम.एच. शेख म्हणाले, भारत सरकारने अशा कारस्थानांना बळी पडू नये. नुकत्याच झालेल्या युरोपियन युनियन व युनायटेड किंगडमसोबतच्या 'सीईटीए'सारख्या करारांमध्ये झालेल्या तडजोडीमुळे शेती, दुग्ध व्यवसाय आणि औद्योगिक क्षेत्रावर संकट अधिक गडद झाले आहे. यामुळे ब्रिटन, युरोपियन युनियनसह साम्राज्यवादी देशांना फायदा होत असून, भारतीय शेतकरी व कामगार यांचे नुकसान होत आहे. अशा पार्श्वभूमीवर, अमेरिकेसोबत सुरू असलेल्या मुक्त व्यापार कराराच्या वाटाघाटींमध्ये अमेरिकन अटींना मोदी सरकार बळी पडू नये. सरकारने अमेरिकेच्या दबावाखाली दहा वर्षांचा संरक्षण करार करण्याचा प्रयत्न त्वरित थांबवावा, अशीही भूमिका व्यक्त करण्यात आली आहे. यावेळी कॉ. नलिनीताई कलबुर्गी, नसीमा शेख, ड अनिल वासम, दत्ता चव्हाण, शेवंताताई देशमुख, सुनंदा बल्ला, व्यंकटेश कोंगारी, रंगप्पा मरेड्डी, दाउद शेख, विल्यम ससाणे, लिंगव्वा सोलापूर, नरेश दुगाणे, शंकुतला पाणीभाते, दीपक निकंबे, बापू साबळे, हसन शेख, मल्लेशम कारमपुरी, विजय हरसुरे, बाळकृष्ण मल्याळ, रफिक काझी, मुरलीधर सुंचू, विक्रम कलबुर्गी, अकिल शेख आदी उपस्थित होते.

# मनोज श्रोत्रींना परत पाठवणार तर सग्गमवर अब्रुनुकसानीचा दावा करणार

- पशुवैद्यकीय अधिकाऱ्याची सेवा समाप्त
- श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून कारवाईचा बडगा
- दर्शनरांगेतील बॅरिकेटींग ई निविदा, गोशाळेतील नवजात वासरू मयत चौकशीचा अहवाल प्राप्त



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.१३ ऑगस्ट -**

मंदिर समितीच्या दि.२३ जुलै रोजीच्या सभेतील निर्णयानुसार नियुक्त केलेल्या चौकशी समितीचा अहवाल मंदिर समितीकडून स्विकारण्यात आला. अहवालानुसार व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांना अधिनियमातील तरतुदीनुसार शासनास परत पाठविण्याचा तसेच सग्गम यांचेवर अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणेकामी ठराव मंजूर करून शासनास मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविणे आणि गोशाळेतील वासराच्या मृत्यू प्रकरणी पशुवैद्यकीय अधिकारी प्रशांत सर्वगोड, तानाजी जाधव व योगेश पाठक हे कर्मचारी सकृतदर्शनी दोषी असल्याचे दिसून आले आहे. याशिवाय पशुवैद्यकीय अधिकारी प्रशांत सर्वगोड यांच्याकडे पशुवैद्यकीय अधिकारी पदाची शैक्षणिक पात्रता नसल्याने त्यांची सेवा समाप्त करण्याचे निर्णय घेण्यात आल्याची माहिती चौकशी समितीच्या अध्यक्षा ॲड. माधवीताई निगडे यांनी सांगीतले.

बॅरिकेटिंग कामाच्या ई निविदेबाबत श्री पुरुषोत्तम सग्गम, सोलापूर यांची आर्थिक फसवणूक प्रकरणी आणि गोशाळेतील नवजात वासरू मयत प्रकरणी मंदिर समितीच्या दि.२३ जुलै रोजीच्या सभेतील निर्णयानुसार मंदिर समितीच्या सदस्या ॲड. माधवी निगडे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीचा अहवाल प्राप्त झाला असल्याची माहिती सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. सदर अहवालाच्या अनुषंगाने मंदिर समितीची दि.१३ ऑगस्ट रोजी दुपारी २.३० वाजता मंदिर कार्यालयात सहअध्यक्ष औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा संपन्न झाली. या सभेत सदस्या शकुंतलाताई नडगिरे, डॉ दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, ॲड. माधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरूजी, ह.भ.प.शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, प्रभारी व्यवस्थापक मुकेश अनेचा उपस्थित होते. या सभेत संबंधित दोषींवर कारवाईबाबतचा निर्णय मंदिर समितीने घेतला आहे.

## गणेशोत्सवात धावणार जादा बसेस

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

गणेशोत्सवात प्रवाशांची संख्या मोठी असल्याने एसटी महामंडळाकडून तयारी करण्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदा देखील सोलापुरातून जादा बस सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. २७ ऑगस्ट रोजी गणेश चतुर्थीनिमित्त मुंबई, पुण्यासह कोकणात बससेवा सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे गणेशभक्तांना कोकणासह मुंबई, पुण्याला जाणाऱ्या गणेश भक्तांसाठी सोलापूर एसटी विभागाच्या वतीने जादा बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.



सोलापूर विभागातून ६६८ एसटी बस तसेच २९ खासगी शिवाई बसेस सोडण्याचा निर्णय घेतला आहे. सोलापुरातील नऊ आगारांतून या बसचे नियोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सव काळात सोलापूर शहर आणि तालुक्यांतून एसटी बसची सेवा दिली जाणार आहे. या सेवेचा अधिकाधिक प्रवाशांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांनी केले आहे. दरम्यान, गणेशोत्सवाच्या दरम्यान एसटी बसेसची वाहतूक सुरळीत होण्यासाठी बस स्थानकावर आणि बस थांब्यावर एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह कर्मचारी देखील अहोरात्र कार्यरत राहणार आहे. तर महामार्गावर ठिकठिकाणी दुरुस्ती पथक देखील असणार आहे.

## अकरावी प्रवेशासाठी १९ ऑगस्टला शेवटची फेरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

यावर्षी अकरावी प्रवेशप्रक्रीया ऑनलाईन झाल्याने संथ गतीने प्रवेश सुरु झाले. त्यामुळे अकरावीचे वर्ग सुरू होण्यास विलंब झाला. १९ ऑगस्टला अकरावी प्रवेशासाठी शेवटची फेरी असणार आहे.

त्यामुळे विद्यार्थ्यांनी त्वरीत प्रवेश घेण्याचे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे. अकरावी प्रवेशप्रक्रीया ऑनलाईन झाल्याने सुरूवातीस अर्ज प्रक्रियेस विलंब झाला. पालक व विद्यार्थ्यांना अनेक अडचणी सहन करावे लागले. सर्वर गायब होणे व चलन न स्वीकारणे यासह अनेक अडचणी आल्या. मात्र, शिक्षण विभागाकडून प्रवेशप्रक्रीया सुरळीत होण्यासाठी चार ते पाच फेऱ्या करण्यात आल्या. यावेळी विद्यार्थ्यांना आवडीच्या महाविद्यालयात प्रवेशाची संधी देण्यात आली. शिवाय संस्था कोट्यातुनही विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाले. सोमवार ११ ऑगस्टपासून अकरावीचे वर्ग सुरू झाले आहेत. मात्र, ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाले नाहीत, विद्यार्थ्यांसाठी १९ ऑगस्टला प्रवेशाची संधी देण्यात आली आहे.

**प्रवेशप्रक्रिया अंतिम टप्प्यात**

अकरावी प्रवेशप्रक्रीया अंतिम टप्प्यात आली असून १९ ऑगस्टला प्रवेशाची शेवटची फेरी असणार आहे. ११ ऑगस्टपासून महाविद्यालय सुरू झाल्याने शेवटची फेरी संपल्यानंतर अध्यापनास सुरू होईल.

**- सचिन जगताप,**
माध्यमिक शिक्षणाधिकारी,
जिल्हा परीषद सोलापूर.

## श्रेयश नर्सिंग होमच्या दुसऱ्या शाखेलाही ठोकले टाळे

- मनपा आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांची कारवाई
- बाळे येथील नर्सिंग होममध्ये परस्पर प्रॅक्टिस सुरू
- डॉक्टरांनी केली होती अशी ही बनवाबनवी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

महापालिकेच्या आशा वर्कर्सना पैशाचे आमिष दाखवून महापालिकेच्या प्रसूतीगृहातील रुग्ण खाजगी रुग्णालयात पळिवले तसेच बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट खाली आढळलेल्या विविध त्रुटीमुळे अखेर नवी पेठेतील श्रेयस नर्सिंग होम तात्पुरत्या स्वरूपात सील करण्यात आले होते.असे असताना महापालिका प्रशासनाची दिशाभूल करून बाळे येथील दुसऱ्या शाखेत प्रॅक्टिस सुरू असल्याची माहिती मिळताच महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी श्रेयश नर्सिंग होमच्या दुसऱ्या शाखेलाही आज टाळे ठोकले आहे. उद्या या ठिकाणी सील लावण्यात येणार आहे. सोलापूर महापालिकेच्या प्रसूतिगृहांमध्ये तपासणीसाठी येणाऱ्या महिलांना प्रसूतीसाठी खासगी रुग्णालयात वळिवण्याचा प्रकार आशा वर्कर्स कडून होत असल्याचे उघडकीस आला आहे.

पैशाचे आमिष दाखवून आशा वर्कर्सकडून हे काम करून घेतले जात होते. याप्रकरणी नवी पेठेतील श्रेयश नर्सिंग होमचे डॉ. सुमित सुरवसे आणि डॉ. श्रद्धा सुरवसे यांना रुग्णालयाचा परवाना(लायसन) रद्द करण्याची नोटीस बजावण्यात आली होती. चार दिवसात त्याचा खुलासा देण्याची सूचना केली होती. दरम्यान, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी नवी पेठेतील नर्सिंग होमला तात्पुरत्या स्वरूपात सील करण्याची कारवाई एक ऑगस्ट २०२५ रोजी केली होती.




नवी पेठेतील श्रेयश नर्सिंग होममध्ये तात्पुरत्या स्वरूपात सील ठोकण्याची कारवाई करण्यात आले असताना दुसरीकडे या डॉक्टरानी बाळे येथील दुसऱ्या शाखेत प्रॅक्टिस सुरू ठेवली असल्याची माहिती महापालिका आरोग्य अधिकारी डॉक्टर राखी माने यांना मिळाली. ही माहिती मिळताच आरोग्य अधिकारी डॉ. माने या तत्काळ बाळे येथील श्रेयश नर्सिंग होमच्या दुसऱ्या शाखेत दाखल झाल्या. या ठिकाणी पण ऑपरेशन थिएटर डिलिव्हरी रूम व सोनोग्राफी रूम आहे. तीन दिवसापासून ते येथे पेशंटची तपासणी करत होते. त्यामुळे आरोग्य अधिकारी डॉ. माने यांनी आज हॉस्पिटलला टाळे लावले. गुरुवारी ही शाखा सील करण्यात येणार आहे. महापालिका आरोग्य विभागाला ही माहिती लपवून ठेवून परस्पर ही दुसरी शाखा संबंधित डॉक्टरांनी सुरू ठेवली असल्याचे उघडकीस आले आहे, अशी माहिती आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी दिली.

## मल्टिमीडिया प्रदर्शनाच्या माध्यमातून उलगडणार स्वातंत्र्य संग्रामाची अमृत गाथा

- १८५७ ते १९४७ कालखंडातील दुर्मिळ छायाचित्रांचा समावेश
- केंद्रीय संचार ब्यूरो, मध्य रेल्वे सोलापूरचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ ऑगस्ट-**

भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्युरो, क्षेत्रीय कार्यालय सोलापूर व मध्य रेल्वे सोलापूर यांच्या संयुक्त विदयमाने भारतीय स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या महत्वपूर्ण घटना, ऐतिहासिक स्थळे, राष्ट्र ध्वजाचा इतिहास, ज्ञात व अज्ञात क्रांतिकारक आणि राष्ट्रपुरुषांची माहिती देणाऱ्या दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन दि. १४ ते १५ ऑगस्ट या कालावधीत सोलापुर




रेल्वे स्टेशनच्या अनारक्षित तिकीट खिडकी येथे आयोजित केल्याची माहिती क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव यांनी दिली.

या प्रदर्शनाचे उद्घाटन पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी आणि विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजीत मिश्रा यांच्या हस्ते १४ ऑगस्ट, रोजी सकाळी ११वाजता करण्यात येईल.

यावेळी अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक अंशूमाली कुमार, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार, भारतीय सैन्य दलातील अधिकारी आणि रेल्वे विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहतील. हे प्रदर्शन सकाळी १० ते रात्री ९ वाजे पर्यंत विनामुल्य खुले आहे.

याप्रसंगी वीर माता, वीर पत्नी, निवृत्त माजी सैनिक यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. या प्रदर्शनामध्ये १८५७ ते १९४७ पर्यंतच्या भारतीय स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना, ऐतिहासिक स्थळे, राष्ट्र ध्वजाचा इतिहास, सोलापुरातील चार हुतात्मे, सेल्फी बूथ, भारत-पाकिस्तान फाळणीच्या वेळी घडलेल्या घडामोडी आणि घटनांचे दुर्मिळ छायाचित्रे व मजकूराचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. यादव यांनी केले आहे.

## 'लोकमंगल'चा एक लाख वह्या वाटपाचा संकल्प पूर्ण

- विविध १०० शाळांमध्ये वह्या वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

लोकमंगल फाउंडेशनच्या वतीने आमदार सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या एक लाख वही वाटपाचा संकल्प करून झाला आहे. विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून आ. सुभाष देशमुख यांनी जून महिन्यापासूनच वही वाटपाचा उपक्रम सुरू केला होता; शहरासह दक्षिण आणि उत्तर तालुक्यात सुमारे १०० शाळांमध्ये एक लाख वही वाटप पूर्ण झाले आहे.

मल्लिकार्जुन हायस्कूल, रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय, हत्तूर नगरे, छत्रपती शिवाजी विद्यामंदीर सोरेगाव, ता.उ. सोलापूर, एस. बी. प्राथमिक शाळा कल्याण नगर, मजरेवाडी, न्यु हायस्कूल सलगरवाडी सोलापूर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निंबर्गी, जि.प.प्रा.शाळा कुमठे, जि.प.प्राथमिक शाळा लाकुतांडा, जि.प. प्राथमिक शाळा राजूर, जि.प.प्राथमिक शाळा वडकबाळ, सोमेश्वर हायस्कूल, हत्तूर, जि.प.प्राथ.शाळा प्रतापनगर, ता.उ.सोलापूर, जागृती विद्यामंदीर, नेहरु नगर, विजापूर रोड, गजानन महाराज विद्यामंदीर



स्वागतनगर १ कुमठा नाका, आदर्श प्राथमिक मराठी शाळा होटगी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कवठे, जवाहर विद्यालय, १७, म्हाडा, जुळे सोलापूर, संत ज्ञानेश्वर मराठी विद्यालय, स्वागत नगर, जि.प.प्रा. शाळा श्रमजिवीनगर ता.उ. सोलापूर, जि.प.प्रा.शाळा मंद्रुप व जि.प.प्राथ. ऊर्दू शाळा, जि.प.प्रा.शाळा भिमनगर, मंद्रुप, जि.प.प्रा.शाळा भंडारकवठे, दलित मित्र भीमराव जाधव प्रशाला लिमयेवाडी, श्रीनाथ प्रशाला, शांतीनगर सोलापूर, हनुमान विद्यामंदीर बंकलगी, जि.प.प्रा.शाळा व ऊर्दू शाळा इंगळगी, जि.प.प्राथ. ऊर्दू शाळा होटगी स्टेशन, जि.प.प्रा. शाळा हिरज यासह सोमवारी १०० शाळांमध्ये वयांचे वाटप करण्यात आले.

# शिवदारे प्रतिष्ठानचे जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**डॉ. कोलूर, शुभांगी बुवा, सोमनाथ दुलंगे, प्रशांत जोशी मानकरी, रविवारी पुरस्कार वितरण सोहळा**


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

वि. गु. शिवदारे प्रतिष्ठानच्या वतीने सहकार महर्षी, स्वातंत्र्य सेनानी माजी आ. कै. वि. गु. शिवदारे यांच्या जयंती निमित्त रविवार १७ ऑगस्ट रोजी दुपारी ४:३० वाजता हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या किर्लोस्कर सभागृहात विविध क्षेत्रात समर्पित भावनेने, दीर्घकाळ उल्लेखनीय कार्य केलेल्या विविध क्षेत्रातील मान्यवरांचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे, अशी माहिती अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. बसवराज कोलुर (वैद्यकीय क्षेत्र), शुभांगी जयकृष्ण बुवा (सामाजिक क्षेत्र), सोमनाथ हलगे (कृषी क्षेत्र), प्रशांत जोशी (पत्रकारिता


कै.वि.गु.शिवदारे


डॉ.बसवराज कोलूर


शुभांगी बुवा


सोमनाथ हलगे


प्रशांत जोशी

क्षेत्र) आदी मान्यवरांचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. २१हजार एक रुपये रोख व स्मृती चिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. याचे वितरण पंढरपूर विठ्ठल रुक्मिणी मंदीर संस्थानचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते आणि डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे अध्यक्ष राजा माने यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. याप्रसंगी राजा माने हे 'सहकारापुढील आव्हाने आणि संधी' या विषयावर प्रबोधनात्मक विचार व्यक्त करणार आहेत. वि. गु. शिवदारे यांचा जन्म १७ ऑगस्ट, १९२६ व मृत्यू ८ ऑगस्ट, २००८ रोजी झाला. त्यांनी आपल्या संपूर्ण जीवनात जवळजवळ ६५ वर्षे सार्वजनिक चळवळीत योगदान दिले. सुरुवातीच्या काळात स्वातंत्र्यलढ्यात सहभाग, महाराष्ट्राच्या विधानसभेत सलग १५ वर्षे आमदार व प्रतोद, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेवर सलगपणे ४५ वर्षे संचालक व दोन वर्षे चेअरमन, स्वामी समर्थ सूत गिरणी वळसंग, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँक, सोलापूर जिल्हा सहकारी ग्राहक भांडार, दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ इत्यादी सर्व मोठ्या संस्था कै. वि. गु. शिवदारे यांनी स्थापन करुन आदर्श कार्यपध्दती नावारुपास आणली. भावी पिढीसमोर एक आदर्श उभा करावा या उदात्त हेतूने शिवदारे प्रतिष्ठानच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांना जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात येते, असे अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांनी सांगितले. पत्रकार परिषदेस नरेंद्र गंभीरे, डॉ. चनगोंडा हवीनाळे, सुभाष मुनाळे, प्रमोद बिराजदार, प्रा. भीमाशंकर शेटे, डॉ. बाहुबली दोशी आदी उपस्थित होते.



## स.हि.ने.प्रशालेत विद्यार्थ्यांचा गौरव

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

श्री सरस्वती मंदिर संस्था संचालित स.हि.ने.प्रशालेत एसएससी २०२५ परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा संपन्न झाला. या सोहळ्याची सुरूवात श्री सरस्वती प्रतिमा पूजनाने करण्यात आली. या सोहळ्यास प्रमुख अतिथी डॉ. नभा काकडे, सरस्वती मंदिर संस्थेच्या उपाध्यक्षा रेवती कुलकर्णी, सुधीर देव, सिंधूताई चंद्रगी-कोंडेवार, देणगीदार- सुनंदा तांबोळकर आदी उपस्थित होते.

उपस्थितांचे स्वागत प्रशालेच्या संगीत विभागातील मार्गदर्शक शिक्षक संतोष कोथळीकर व त्यांच्या बालचमुंनी "चला पाहुण्यांचे करू स्वागता" या गीताने करण्यात आले. मंचावर उपस्थित संस्थेच्या मान्यवरांच्या हस्ते प्रमुख अतिथींचा सत्कार करण्यात आला. सत्काराचे स्वरूप शाल, बुके आणि सरस्वती प्रतिमा असे होते. शिवाय गुणवंत विद्यार्थ्यांना रोख रक्कम स्वरूपात देणगी देणारे देणगीदार सुनंदा तांबोळकर यांचाही सत्कार करण्यात आला. प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थी सिद्धांत तुपेरे व स्वयम भांडेकर याने मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापिका नीता येरमाळकर यांनी प्रास्ताविक केले. पर्यवेक्षक मुकुंद गिरी यांनी आभार मानले.सूत्रसंचालन माधुरी शेंडगे यांनी केले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## पालिकेतील सफाई कामगारांसाठी वेतन अनुदान द्या

### श्रमिक विकास संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ ऑगस्ट-**

राज्याच्या सामाजिक न्याय विभागाचा निधी शिल्लक असतो. तो निधी इतरत्र वळविण्यापेक्षा महापालिकेतील मागासवर्गीय सफाई कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी अनुदान म्हणून देण्यात यावा, अशी मागणी श्रमिक विकास संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक व्हटकर यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

सोलापूर महापालिकेमध्ये दि. २४ फेब्रुवारी २०२४ रोजीचा न्यायालय आदेश आणि शासन निर्णयानुसार १९७५ पासून ते २०१३ पर्यंतच्या सफाई कामगाराच्या वारसांना लाड पागे समिती अंतर्गत वारसा हक्काने नियुक्ती देणे गरजेचे आहे. सोलापूर महापालिकडे जर सफाई कामगारांच्या वारसांना वेतनासाठी पैसे उपलब्ध नसेल तर राज्याच्या सामाजिक न्याय विभागाने लाड पागे कमिटी अंतर्गत नियुक्त केलेल्या या सफाई कामगारांना वेतन अनुदान द्यावे. येत्या २० ऑगस्ट पर्यंत निर्णय न झाल्यास टप्प्याटप्प्याने आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा अध्यक्ष अशोक व्हटकर यांनी दिला आहे. या पत्रकार परिषदेत रोहित माशाळकर, अमित गायकवाड, तुषार वाघमारे आदी उपस्थित होते.

## ▶▶ महत्वाचे...



### पालकमंत्री गोरेंच्या हस्ते उद्या मुख्य शासकीय ध्वजारोहण

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात स्वातंत्र्य दिनाचे मुख्य शासकीय ध्वजारोहण सकाळी ९ वा. ०५ मिनिटांनी होणार आहे. तरी या समारंभासाठी अधिकारी, कर्मचारी यांनी राष्ट्रीय पोषाखात वेळेपूर्वी १५ मिनिटे यावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी केले आहे.

### सैनिकांच्या कुटुंबांना मिळणार विनामूल्य कायदेशीर सेवा

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

वीर परिवार सहायता योजना २०२५ अंतर्गत सेवारत व निवृत्त सैनिकांच्या कुटुंबियांना कायदेशीर मदत व जनजागृतीसाठी जिल्हास्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमातून सैनिकांच्या कुटुंबांना विनामूल्य कायदेशीर सेवा उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे बैठकीत समितीची स्थापना करण्यात आली. यामध्ये मल्हार शिंदे (सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण), मेजर मिलिंद देवदत्त तुंगार (निवृत्त), शमशोद्दीन नदाफ (अधीक्षक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण), पॅनल विधीज्ञ लक्ष्मण पाटील आणि कार्यालयातील कर्मचारी सहभागी होते. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर तुंगार यांनी सैनिकांच्या कुटुंबीयांना आवाहन केले की त्यांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. कौटुंबिक वाद, मालमत्ता विवाद, फसवणूक, वारसा हक्क, नागरी व फौजदारी प्रकरणांमध्ये कायदेशीर सल्ला व मदत विनामूल्य दिली जाणार आहे. ही योजना न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या पुढाकारातून साकारली आहे.

### विमुक्त जाती, भटक्या जमाती समिती सोलापूर दौऱ्यावर

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा १९ ते २१ ऑगस्ट दरम्यान सोलापूर जिल्हा दौरा नियोजित आहे. तरी सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी त्यांच्या विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची अद्यावत माहिती तयार करून प्रशासनाला सादर करावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या दौरा पूर्वतयारी आढावा बैठकीत पाटील मार्गदर्शन करत होते. यावेळी इतर मागास बहुजन विभागाचे सहाय्यक आयुक्त गणेश सोनटक्के, समाज कल्याणच्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले उपस्थित होते. महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचे प्रमुख आमदार सुहास कांदे असून, विधान परिषद व विधानसभेचे म ान्यवर १४ आमदार समिती सदस्य आहेत. ही समिती या कालावधीत सकाळच्या सत्रात संबंधित विभागाच्या अधिकारी यांच्या बैठकी घेऊन दुपारच्या सत्रात स्थळांना भेटी देतील.स्थळ भेटीच्या वेळी संबंधित अधिकारी यांनी उपस्थित राहावे अशा सूचना त्यांनी दिल्या. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त गणेश सोनटक्के यांनी सर्व संबंधित विभागाने त्वरित अद्यावत माहिती उपलब्ध करून द्यावी असे सांगितले.

### बाल्कनीतून तोल जाऊन मुलगी जखमी

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

घराच्या बाल्कनीतून तोल जाऊन खाली पडल्याने मुलगी जखमी झाली. प्रीती विशाल मैनावाले (वय १०, रा. बापूजी नगर) असे जखमी मुलीचे नाव आहे. मंगळवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास घराच्या बाल्कनीमध्ये ती खेळत असताना तोल जाऊन पडली. त्यात तिच्या चेहऱ्याला जखम झाल्याने तिला उपचारास निलेश जमादार यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिसात झाली आहे.





सोलापूर : अवंती नगर भागातील पावसाचे पाणी शिरले आहे. दुसऱ्या छायाचित्रात हिप्परगा तलावाची पातळी वाढल्याने सोलापूर-धुळे महामार्ग पाण्याखाली आला आहे. (छाया : केवल तिवारी)

# मुसळधार पावसाने शहर-जिल्ह्यातील नदी-नाले, तलाव तुडुंब!

- जिल्ह्यात २४४ मिमी पावसाची नोंद
- पिण्याच्या पाण्याचा मिटला घोर
- हिप्परगा तलावाच्या सांडव्याचे पाणी घुसले शहरात
- नदीकाठच्या लोकांना सतर्कतेचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

गेल्या दोन दिवसांपासून सोलापूर शहर-जिल्हा आणि मराठवाड्यात सर्वदूर मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने नदी-नाले, विहिरी, साठवण तलाव आणि पाझर तलाव भरभरून वाहत आहेत. दरम्यान, आजतागायत सरासरी २४४ मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून, हिप्परगा तलावाच्या सांडव्याचा प्रवाह आणि आदिला नदीचे पाणी शहरातील सखल भागात घुसल्याने नागरिकांचे बेहाल झाले. दरम्यान, पालिका प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाकडून नदीकाठच्या लोकांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.

मे महिन्यात तब्बल २३० मिलीमीटर पावसाची नोंद सोलापूर जिल्ह्यात झाली होती. याच पावसावर जिल्ह्यातील बळीराजाने खरिपाच्या पेरण्या उरकल्या. यानंतर जून-जुलै महिन्यात ८२ मिलीमीटरपर्यंतच पाऊस पडला. कधीतरी पावसाच्या सरी पडत असल्याने खरिपातील पिकेही सुकून जात होत. मृग, आर्द्रा, पुष्य, पुनर्वसू ही नक्षत्रे तशी कमी पावसाचीच यंदा होती. यानंतर आश्लेषा नक्षत्राच्या पावसाने जोरदार हजेरी लावल्याने ८ ते १० दिवसांत जिल्ह्यात सरासरी २४४ मिलीमीटरपर्यंत जोरदार पाऊस झाला. दरम्यान, या पावसाने जिल्ह्यातील गावोगावच्या विहिरी, नदी, नाले, ओढे, तलाव भरून वाहत आहेत. याचा फायदा पुढील हंगामासाठी शेतकऱ्यांना होणार आहे. उजनी धरणही ओव्हरफ्लो झाल्याने जिल्ह्यातील बळीराजा यंदा पाण्यासाठी निवांत झाला आहे. गेल्या चार दिवसात जिल्ह्यातील सर्वच तालुक्याच्या अनेक भागात मुसळधार पावसाने सर्वत्र झोडपून काढले आहे. यामुळे अनेक गावांचा संपर्कही तुटला आहे. या पावसामुळे नद्या- नाले तुडुंब भरून वाहत आहेत. रस्त्यावर आलेल्या पाण्यामुळे अनेक गावात नदी आणि ओढ्यांना पूर सदृश्य परिस्थिती आहे. दी ओढ्यावर आलेल्या पुरामुळे बक्षी हिप्परगे ते सोलापूर जिल्ह्यातील वरळेगांव, वडजी वा मराठवाड्यातील सीमावर्ती भागातील खडकी धोत्री या मार्गाची वाहतूक खंडित झाली आहे. या दिवसात बक्षी हिप्परगे गावाचा सोलापूर शहराशी असलेला संपर्कही खंडित झाला आहे.

आठवडाभरात होत असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतात सर्वत्र पाणी थांबलं असून त्यामुळे खरिपातील तूर, उडीद, सोयाबीन, मुग यासह अन्य पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकरी दरवर्षी आपल्या काळ्या आईची ओटी भरण्याच्या भावनेने शेताची संपूर्ण मशागत करून खरिपाची पेरणी करतो, तो आपल्या दैनंदिन गरजांना फाटा तर देतोच, प्रसंगी आपल्या पोटाला चिमटा देऊन पीक वाढीसाठी तो दिवस रात्र परिश्रम करतो. यंदा प्रारंभ पासूनच समाधानकारक पाऊस झाल्याने आज शिवारात डोलत असलेली पिके, शेतकऱ्याच्या हातातोंडाशी आलेला घास या मुसळधार पावसामुळे मातीत मिसळला आहे. जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांच्या नुकसानीची दखल घेऊन शेतकऱ्यांना संकट काळात दिलासा देण्यासाठी सर्वतोपरी मदत करावी, अशी अपेक्षा शेतकरी बांधवांची आहे.

### जिल्हा प्रशासनाने घ्यावी दखल

या आठवडाभरात सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जिल्ह्याच्या अनेक भागात धुमाकूळ घातला आहे. या पावसामुळे बक्षी हिप्परगेसह अनेक भागात सर्वत्र पुलावर पाणी आल्यामुळे या गावांचा शहराशी असलेला संपर्क तुटलेला आहे. त्यातच शेतकऱ्यांनी परिश्रमानं जोपासलेल्या खरीप पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. जिल्हा प्रशासनाने या नुकसानीची दखल घेऊन शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा, अशी मागणी दक्षिण सोलापूर तालुक्यातील बक्षी हिप्परगे गावचे सरपंच मनोज महाडिक यांनी शासनाकडे केलीय.

### सोलापूर-तुळजापूर महामार्गावरून वाहिले पाणी

सोलापूर–तुळजापूर महामार्गावरील शेळगी ओढ्याला मोठा पूर आल्याने रूपा भवानी माता चौकातील पुलावरून गुडघाभर पाणी बुधवारी सकाळी वाहत होते. यामुळे चारचाकी आणि दुचाकीस्वारांचे सोलापूर शहरात येताना हाल झाले. दुपारनंतर मात्र या ठिकाणचे पाणी काही प्रमाणात ओसरल्याचे दिसून आले. या पाण्यातून लहान चारचाकी गाड्या जाताना अनेकांच्या गाड्या बंद पडल्याने हाताने त्या गाड्या ढकलून बाहेर काढाव्या लागल्या. दुचाकीस्वारांना काही वेळी सोलापुरात येता आले नाही. हेच पाणी पुढे वसंतविहार, अवंतीनगर आदी ठिकाणच्या सखल भागातून वाहत होते.

### बुधवारी दुपारीपर्यंत नोंदलेला तालुकानिहाय पाऊस

बुधवारी दुपारी ३:२६ पर्यंत सोलापूर जिल्ह्यातील तालुकानिहाय नोंदलेला पाऊस असा होता. यामध्ये उत्तर सोलापूर ३८५.७ मिमी, द. सोलापूर ४०६.५, बार्शी २५६.६, अक्कलकोट ३३७.८, मोहोळ २४४.७, माढा २२४.१, करमाळा १२८.३, पंढरपूर १८२.२, सांगोला २१५.४, माळशिरस १८४.२, मंगळवेढा २०५.९ असा जिल्ह्यात २४४.३ मिलीमीटर पाऊस पडला. तर पुणे विभागात ४५९.७ मिमी इतका पाऊस कोसळला आहे. करमाळा, पंढरपूर आणि माळशिरस तालुक्यात पाऊस कमी झाला असून, इतर सर्व तालुक्यात मात्र मोठा पाऊस कोसळला आहे.

## जागेवर खोदकाम करण्यावरून मारहाण

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

जागेवर खोदकाम करण्याच्या कारणावरून शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ११ ऑगस्ट रोजी जगजीवनराम झोपडपट्टी मोदीखाना सोलापूर येथे घडली.

याप्रकरणी किशोर सिद्राम तलवारे (रा. जगजीवनराम झोपडपट्टी मोदीखाना) यांनी सदर बाजार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे त्यांच्या फिर्यादीवरून दशरथ बोंललेलू व रुपा दशरत बोंललेलू (रा.जगजीवनराम झोपडपट्टी मोदीखाना) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की फिर्यादी व फिर्यादी यांचा मित्र कृष्णा भलके असे मिळून खरेदी केलेल्या मिळकत क्रमांक ५११ या मोकळ्या जागेत पत्रा शेड मारण्यासाठी कामगारास खड्डे काढण्यासाठी सांगितले. त्यावेळी कामगार खड्डे खांदत असताना वरील संशयित आरोपी यांनी येऊन कोणास विचारून खड्डे मारत आहे. असे म्हणून शिवीगाळ करत खोऱ्याच्या दांडक्याने फिर्यादी व फिर्यादी यांची पत्नी तसेच फिर्यादी यांचा भाऊ दीपक यांना मारहाण करून दुखापत केली. तसेच जागेवर घर कसे बांधता ते बघतो असे म्हणून धमकी देऊन रूपा हिने फिर्यादी यांच्या पत्नीस मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास महिला पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.




**पोस्टाचे रेकॉर्ड ऑफिस गळक्या छत्राखाली**

**सोलापूर : रेल्वे परिसरातील पोस्टाच्या मुख्य कार्यालयातील रेकॉर्ड ऑफिस गळक्या छत्राखाली आहे. त्यावर ताडपत्री टाकली आहे. परंतु मोठ्या पावसामुळे रेकॉर्ड भिजणार नाही याची पोस्ट खात्याने लक्ष देण्याची गरज आहे.**

## जागा विक्रीप्रकरणी फसवणूक; दोन जणांविरुद्ध गुन्हा

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

फसवणूक प्रकरणी दोन जणांविरुद्ध सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हि घटना २४ मार्च २०२५ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय येथे घडली.

याप्रकरणी अनिरुद्ध नंदकुमार जोशी (वय-५०, रा.स्वामी विवेकानंद नगर, हत्तुरे वस्ती, होडगी रोड) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून लक्ष्मण काशिनाथ माळी (रा.जुळे सोलापूर) व सविता तुकाराम पडळकर (रा. ए ३०५ तिसरा मजला, दोस्ती बेलेझा,जीडी आंबेडकर मार्ग, परेल,मुंबई) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की लक्ष्मण माळी याने सन २०१४ मध्ये मौजे मजरेवाडी येथील शिवदर्शन नगर येथील जुना सर्वे नंबर ३३७ त्याचा नवीन सर्वे नंबर १९/१० पैकी ४ प्लॉट विक्री केले होते. तरी संपूर्ण गटातील जागा पुन्हा विक्री करण्यासाठी लेआउट मंजूर करून फिर्यादीच्या मालकीच्या जागेवर ड्रेनेज लाईट रस्ता करून जागेचे अस्तित्व संपून जाहीर प्रसिद्धी दिली.

त्यामुळे विजापूर नाका पोलीस स्टेशन ६७७/२०२३ भादवि ४१७, ४२० नुसार गुन्हा नोंद केला असून, त्याचे दोषारोपपत्र क्रमांक १६८/२४ दि.२० जुलै २०२४ अन्वये प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी कोर्ट नंबर २ सोलापूर येथे सादर केले असताना सुद्धा वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांचे मालकीचे चार प्लॉट गटातील सर्व ४० जागा सविता पडळकर यांना दस्त क्रमांक २२२६/२५ अन्वये पुन्हा विक्री करून फिर्यादी यांची फसवणूक केली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुलकर्णी हे करीत आहेत.

# तिरुपतीच्या पद्मावतीदेवीला माहेरची साडी; २१ नोव्हेंबरला करणार अर्पण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

तिरुपतीनजीकच्या तिरुचानूर येथील श्री पद्मावतीदेवी मंदिरात सालाबादप्रमाणे नोव्हेंबरमध्ये ब्रह्मोत्सव होणार असून या उत्सवात शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर रोजी सोलापुरातील पद्मशाली बांधव देवीला माहेरची साडी अर्पण करणार आहेत, अशी माहिती पद्मशाली श्री पद्मावतीदेवी ब्रह्मोत्सवम संस्थेचे संस्थापक जनार्दन कारमपुरी व अध्यक्ष अंबादास बिंगी यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

भगवान व्यंकटेश्वर अर्थात बालाजी यांच्या पत्नी श्री पद्मावतीदेवी या पद्मशाली समाजाच्या कन्या आहेत. तिरुचानूर येथील श्री पद्मावतीदेवी मंदिरात दरवर्षी ब्रह्मोत्सव साजरा केला जातो. या उत्सवात गत १६ वर्षांपासून सोलापूरच्या पद्मशाली बांधवांना पद्मावतीदेवीला माहेरची साडी अर्पण करण्याचा बहुमान मिळत आहे. यंदा हा उत्सव नोव्हेंबरमध्ये असून २१ नोव्हेंबरला सोलापुरातील पद्मशालीबांधव पद्मावती



देवीला माहेरची साडी अर्पण करणार आहेत. याकरिता सोलापुरातील समाज बांधव हे १९ नोव्हेंबरला तिरुपतीला रवाना होणार आहेत. तेलुगुमध्ये माहेरची साडीला पुट्टींटी पट्टूचिरा असे संबोधले जाते. पद्मशाली श्री पद्मावतीदेवी ब्रह्मोत्सवम संस्थेच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविला जात आहे. यंदाच्या उत्सवात माहेरची साडी अर्पण करण्यासाठी सोलापुरातील पद्मशाली बांधवांसाठी प्रती जोडपी १५ हजार ५०१ रुपयांचे देणगी शुल्क असून यामध्ये देवीचे महावस्त्र (माहेरची साडी) प्रवास व निवास, भोजन, बालाजी दर्शन आदी व्यवस्था केली जाणार आहे. या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या समाजबांधवांनी अंबादास बिंगी (मो.९९२२७४१४३६), नागेश सरगम (मो.९०९६५६२१२३) व स्वाती चिटकेन (७७९६५५६१४३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेला संस्थेचे सचिव व्यंकटेश पडाल, खजिनदार नागेश सरगम, सल्लागार रामचंद्र जन्नू, पांडुरंग दिड्डी, गोपी वडेपल्ली, दामोदर पासकंटी, व्यंकटेश रच्चा, स्वाती चिटकेन, माधवी अंदे आदी उपस्थित होते.

### यंदा सामूहिक देणगीतून ५१ हजारांची साडी अर्पण करणार

यंदा पद्मशाली ज्ञाती संस्था, पद्मशाली पद्मावतीदेवी ब्रह्मोत्सवम संस्थेतर्फे पद्मावतीदेवीला ५१ हजारांची साडी अर्पण करण्यात येणार आहे. यासंदर्भात समाजबांधवांकडून सामूहिक देणगी घेण्यात येणार आहे. समाजबांधवांना यथाशक्ती देणगी देऊन या उपक्रमात सहभागी होता येणार आहे. १९ नोव्हेंबरला तिरुपतीला जाण्यापूर्वी आठ दिवस अगोदरपासून ही साडी दाजी पेठ येथील वेंकटेश्वर देवस्थान येथे दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. यानिमित्त मंदिरात कुंकुमार्चना करण्यात येईल. या उपक्रमात समाजबांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पद्मावतीदेवी पद्मशाली असल्याचे प्राचीन दाखले

**पद्मावतीदेवी पद्मशाली असल्याचे प्राचीन दाखले :** भगवान व्यंकटेश्वर यांच्या पत्नी महालक्ष्मी स्वरूपिणी देवी पद्मावती या स्वतः मी पद्मशाली असा गर्भगृहातून आवाज दिल्याचे पुरातन दाखले आहेत. त्यामुळे पुरातन काळापासून पद्मावतीदेवीला साडी चोळी, ओटीभरणा करण्याचा बहुमान पद्मशालीवंशीयांचा कायम आहे. तशी नोंद ताम्रपटात असून तो ताम्रपट आजही तिरुपती देवस्थानाकडे उपलब्ध आहे, हे विशेष.

# मृत्यूभयाची निवृत्ती हे मुक्तीचे द्वार : हभप डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ ऑगस्ट-**

मानवी जीवनात प्रत्येकाच्या अंतःकरणात काही ना काही भय दडलेले असते. पण त्या सर्व भयांमध्ये मृत्यूचे भय हे सर्वांत प्रबळ असते. वस्तुतः माणसाला मृत्यू स्वतः त्रास देत नाही तर मृत्यूची भीती हा खरा त्रासदायक घटक ठरतो. या भीतीची निवृत्ती होणे हाच खरा पुरुषार्थ आहे, असे श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी 'श्रीमद्भागवत कथा चिंतन' या विषयावर प्रवचनमालेच्या १९ व्या सत्रात प्रतिपादन केले.


श्रावणमास प्रवचनमाला
भाग - १९

महाराज पुढे स्पष्ट करतात की, नीतिशास्त्रकार भर्तृहरी यांनी जीवनातील विविध भयांची सुंदर व्याख्या केली आहे- भोगीला रोगाचे भय, कुलवंतास पतनाचे भय, रुपवंतास वार्धक्याचे भय, बलवंतास शत्रूचे भय, धनवंतास चोराचे भय तर देहधारी मनुष्याला मृत्यूचे भय. मृत्यू हा निस्संदिग्ध सत्य असला तरी तो कुणालाही प्रिय नसतो. त्यामुळे मृत्यूभयाची निवृत्ती हाच मुक्तीकडे नेणारा मार्ग आहे.

या संदर्भाने महाराजांनी समाजातील आजच्या विकृत प्रवृत्तीवर टोकदार भाष्य केले- भारतीय संस्कृतीला बाधा आणणाऱ्या चुकीच्या प्रथा, द्वेषभाव, सामाजिक द्वंद्व, दुराचार, विविध व्यसनांत गुरफटलेली तरुणाई... या सर्व गोष्टी मानवाच्या आध्यात्मिक प्रगतीत अडथळा ठरत आहेत. म्हणूनच, सांप्रत काळात विरक्त भाव ठेवून जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे, हाच मुक्तीचा खरा मार्ग आहे, असे आवाहन यावेळी डॉ. जयवंत महाराज करतात.

मृत्यूची भीती घालवायची असेल, तर देहाभिमानाचा त्याग अपरिहार्य आहे. 'मी देह आहे' हीच भावना सर्व दुःखांचे मूळ आहे. हे स्पष्ट करण्यासाठी महाराजांनी शुकाचार्य आणि राजा जनक यांच्यातील संवादाचे उदाहरण दिले. 'मी शुक' ही भावना देखील शिल्लक राहू नये; हीच खरी कृतार्थता होय.

याप्रसंगी, अहंकार या विकारामुळे होणाऱ्या अधोगतीवरही त्यांनी मार्मिक भाष्य केले. रवींद्रनाथ टागोर यांच्या जीवनातील प्रसंगाचा दाखला देत, आत्मप्रकाशाची अनुभूती मिळविण्यासाठी अहंकाराचे पूर्ण निर्मूलन हाच एकमेव उपाय असल्याचे निक्षून सांगितले.

राजा परीक्षित आपले मरण सात दिवसांवर आले आहे, हे समजताच तो शुकाचार्यांना विचारतो, 'आचार्य, मुक्तीची इच्छा असणाऱ्या माणसाने मृत्यूसमयी काय करावे?' तेव्हा शुकाचार्य म्हणतात, 'हे राजन्, सर्वप्रथम तुझ्या अंतःकरणातील भीती नष्ट झाली पाहिजे आणि ती भीती दूर करण्यासाठी देहाचा अभिमान संपविला पाहिजे. तेव्हाच मृत्यूची भीती नाहीशी होईल. पण हे कसे करावे? हे मी तुला उद्या सांगेन.' शेवटी महाराज सांगतात, 'भागवत सांगते, माणसाने मरावे कसे; आणि गीता सांगते, माणसाने जगावे कसे. राजा परीक्षिताचे प्रश्न व शुकाचार्यांची उत्तरे माणसाला शिकवतात की, मरण हे देखील मंगल कसे ठरु शकते.'

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरुवार
दि. १४ ऑगस्ट २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - श्रावण
तिथी कृ. षष्ठी (२६.०७)
ऋतु - वर्षा
नक्षत्र - रेवती (०९.०५)
योग - शूल (१३.११)
करण - गर (१५.१५)

दिनविशेष - चांगला दिवस
बृहस्पती पूजन, मुंबई उच्च न्यायालयाची स्थापना
....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष** : कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा. आई वडिलांचे आरोग्य चांगले राहील. नौकरीमध्ये अपक्षेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहे.

**वृषभ** : आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील. दुसऱ्याचा द्वेष करू नका. व्यापारात प्रगती राहील.

**मिथुन** : सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील. व्यापारात अपेक्षीत लाभ होईल. घराच्या संबंधी समस्या वाढतील.

**कर्क** : व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, माान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. दुसऱ्याची नक्कल करू नका. आनंदी रहा.

**सिंह** : प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील. कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या** : उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील. कौटुंबिक परिस्थती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल.

**तुळ** : आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे. धार्मिक प्रवास होऊ शकतो. व्यापारात प्रगती राहील.

**वृश्चिक** : कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कर्ज वाढणार आहे. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**धनु** : सर्वच ठिकाणी आपणास यश मिळणार आहे. नवीन संधी मिळतील. कोणचाही राग करू नका. आरोग्याच्या तक्रारी संपणार आहेत.

**मकर** : दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांची चिंता राहील.

**कुंभ** : व्यापारात अचानक फायदा होईल. अपूण राहीलेले कामे पूर्ण होतील. मित्रांना आपण मदत कराल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**मीन** : श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. विद्यार्थ्यांना शिक्षणात यश मिळेल.मुलांच्या कामामुळे दु:खी रहाल.

# शहरात घुमला वंदे मातरम्‌चा नारा

## तिरंगा सायकल रॅलीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

हर घर तिरंगा अभियाना अंतर्गत सोलापूर महापालिका आणि रॉयल रायडर्स सायकलिंग असोसिएशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हर घर तिरंगा ''तिरंगा सायकल रॅली काढण्यात आली. या रॅली द्वारे शहरात 'घर तिरंगा, वंदे मातरम्‌चा नारा घुमला. उत्साही वातावरणात शहरातून ही रॅली काढण्यात आली. या माध्यमातून देश प्रेम, राष्ट्रीय एकता आणि पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या नेतृत्वाखाली आणि अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. आज सकाळी ६ वाजता सोलापूर महापालिकेच्या प्रांगणातून या रॅलीला उत्साहात सुरुवात झाली. लोकांमध्ये राष्ट्रध्वजाबद्दल जागरूकता वाढवणे, देशभक्तीची भावना जागृत करणे आणि राष्ट्रध्वजासोबत वैयक्तिक बंध निर्माण करणे या उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार, उपायुक्त तैमूर मुलाणी, पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे, महापालिका क्रीडा अधिकारी श्रीकांत घोलप, स्वप्नील सोलनकर हे उपस्थित होते. रॉयल रायडर्स सायकलिंग असोसिएशनचे अध्यक्ष अभिनय भावठाणकर यांच्या नेतृत्वाखाली, असोसिएशनचे पदाधिकारी श्रीधर वडनाल, सुरेश बाळगावकर, विलास माळवदकर, कृष्णा कांबळे, सुबोध जगे, सुदर्शना चव्हाण, नितीन कोळी, इराप्पा स्वामी, प्रेषिता चपळगावकर, अंजली शेंडगे आणि दत्तात्रय गायकवाड यांच्यासह अनेक सायकलप्रेमींनी या रॅलीत सहभाग घेतला होता.




### अतिरिक्त आयुक्त पवार, उपायुक्त मुलाणी यांनी दिले प्रोत्साहन

या सायकल रॅलीमध्ये महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार आणि उपायुक्त तैमूर मुलानी यांनी सायकलवरून सहभाग नोंदवत सहभागी सर्वांना प्रोत्साहन दिले. तिरंगा राष्ट्रध्वजा विषयी अभिमान, देशभक्तीची प्रेरणा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश या रॅली द्वारे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला.

### या मार्गावरून काढण्यात आली रॅली

शहरातील महापालिकेपासून या रॅलीची सुरुवात होऊन पुढे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, नवी पेठ ,लकी चौक, चार हुतात्मा पुतळा चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, डफरीन चौक मार्गे महानगरपालिकेमध्ये समारोप करण्यात आला. या ''तिरंगा सायकल रॅली'' च्या माध्यमातून राष्ट्र अभिमान, राष्ट्रप्रेम संदेश प्रभावीपणे पोहोचवण्यात आला.



# श्राविका महाविद्यालयात गुलाबपुष्प देऊन अकरावी विद्यार्थिनींचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

उमाबाई श्राविका कनिष्ठ महाविद्यालयामध्ये इ.११ वी च्या नवीन प्रवेशित विदयार्थिनींचे स्वागत गुलाब पुष्प देऊन करण्यात आले. उमाबाई श्राविका महविद्यालयाचे प्राचार्य माननीय श्री.सुकुमार मोहोळे यांच्या शुभहस्ते इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींना प्राचार्यांनी मार्गदर्शन करताना त्यांनी कॉलेजची शिस्त नियम यांची माहिती दिली. त्याचबरोबर अभ्यासातील नियमितपणा व अभ्यासातील सातत्य तसेच नियमित उपस्थिती यावर भर देण्यास सांगितले. त्याचबरोबर श्राविका कॉलेजची स्थापना, संस्थापक याबद्दलही माहिती सांगितली. यावेळी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गणेश लेंगरे यांनी केले तर आभार प्रा.अविनाश मुळकुटकर यांनी मानले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अर्चना कानडे यांनी केले यावेळी या कार्यक्रमास प्रा. सोमनाथ राऊत प्रा ज्योती बांगर प्रा. प्राजक्ता काळे प्रा.कल्याणप्पा हायगोंडे तसेच महाविद्यालयीन विद्यार्थिनी उपस्थित होत्या.



# मेहता शाळेत ग्रंथपाल दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

कै.वि. मो.मेहता माध्यमिक शाळेत राष्ट्रीय ग्रंथापाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माननीय आनंद घोडके (अध्यापक जिल्हा परिषद शाळा, कल्लहिप्परगे) हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन, सरस्वती पूजन, दीप प्रज्वलन आणि नवीन पुस्तकाचे अनावरण करून झाली. याप्रसंगी ग्रंथपाल दिनाचे महत्त्व गौरी पोळ हिने तर वाचनाचे महत्त्व आदर्श कोरे याने पटवून दिले. तसेच वाचनवीर विद्यार्थिनींचा सत्कार असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. वाचन एक असे औषध आहे ज्यामुळे मेंदू तल्लक आणि निरोगी राहतो तसेच वाचनामुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास सर्वांगीण पद्धतीने होतो असे विचार प्रमुख पाहुण्यांनी मांडले. प्रशालेच्या उपक्रमाचे कौतुकही केले. त्यांनी प्रशालेला १० पुस्तके भेट स्वरूपात दिली. सूत्रसंचालन जान्हवी पाटील हिने केले. प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांनी केले. पाहुण्यांची ओळख अपेक्षा बंडगर हिने करून दिली तर क्षमा बोंदार्डे हिने आभार मानले. कार्यक्रमास मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, सेवाज्येष्ठ शिक्षिका मीनाक्षी भाटवडेकर, ग्रंथपाल अंनत दिवणजी उपस्थित होते.

# १५ वर्षापासून चोरीच्या गुन्ह्यातील फरारी आरोपीस अटक

## स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीणची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

गेल्या १५ वर्षापासून जबरी चोरीच्या गुन्ह्यात फरारी असलेल्या आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली.

बालाजी गोविंद सुरवसे (वय ३५, रा. बोळेगाव, ता. तुळजापूर, जि. सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. ४ एप्रिल २०११ रोजी सोलापूर तालुका पोलीस ठाणेच्या हद्दीत फिर्यादी प्रकाश बलभीम डांगे (रा. सिंधू विहार,सोलापूर) हे त्यांचेकडील मोटार सायकलवरून अक्कलकोट नाका ते मुळेगाव या रस्त्याने जात असताना अज्ञात तीन इसमांनी त्यांची मोटार सायकल आडवून त्यांना धमकी देवून त्यांचेकडीले मोबाईल, लॉकेट, अंगठी व रोख रक्कम असा ७१ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जबरी चोरी करून घेवून गेले होते. याबाबत सोलापूर तालुका पोलीस ठाणेस गुरनं ५८/२०११ नुसार जबरी चोरीचा गुन्हा दाखल होता. या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक शेख यांनी करून त्यामध्ये २ आरोपींना अटक करून न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. या गुन्ह्याच्या तपासामध्ये बालाजी सुरवसे हा आरोपी हा निष्पन्न होता, परंतू तो गुन्हा दाखल झाल्यापासून फरार झाला होता. आरोपी बालाजी सुरवसे हा अटक चुकविण्यासाठी परागंदा झाला होता. यामुळे तो हजर होण्यासाठी त्याचेवर न्यायालयाच्या परवानगीने स्थावर मालमत्ता जप्त करणेकामी जाहीरनामा देखील काढण्यात आला आहे. सदर आरोपी हा मिळून येत नव्हता.



सोलापूर जिल्ह्यातील फरार आरोपीचा शोध घेणेबाबत पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला दिले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना गोपनिय बातमीदार यांचेकडून आरोपी बालाजी सुरवसे हा सोलापूर येथील मंगळवार बाजारात येणार असल्याची बातमी मिळाली होती. त्यानुसार सहायक पोलीस फौजदार निलकंठ जाधवर, हवालदार हरीदास पांढरे, आबासाहेब मुंढे, गणेश बांगर व अनिस शेख हे मंगळवार बाजार येथे सापळा लावून थांबले होते. आरोपी हा मंगळवार बाजारात आल्यावर त्यास पथकाने ताब्यात घेतले आहे. त्यास सोलापूर तालुका पोलीस ठाणेच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कामगिरी पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, पोलिस निरीक्षक संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार निलकंठ जाधवर, हवालदार हरीदास पांढरे, आबासाहेब मुंढे, गणेश बांगर, अनिस शेख यांनी केली.



# लायन्स क्लबतर्फे क्रांती दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

लायन्स इंन्टरनॅशनल अंतर्गत लायन्स क्लब ऑफ सोलापूर सिटी क्रांती दिन विणकर बाग येथे करण्यात आला. यावेळी अशोक हबीब, सुनील पवार, गणेश जिंदम, सुरेश गिरी, माणिक भूमकर, नरसप्पा इंदापुरे, डॉक्टर पटेल, विजयकुमार दासरी उपस्थित होते. विणकर बाग अध्यक्ष मोहन भूमकर यांनी क्रांती दिनाबद्दल माहिती देऊन बलिदान दिलेले सोलापुरातील स्वातंत्र्यसैनिक व सोलापूरच्या चार हुतात्मे आठवण करून उजाळा दिला.

# जनजाती कल्याण आश्रमतर्फे रविवारी वनभाजी महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

जनजाती कल्याण आश्रम, पश्चिम महाराष्ट्र शाखा सोलापूर यांच्यावतीने रविवार दि. १७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत वनभाजी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती सोलापूर शाखेचे अध्यक्ष विनय वरणगावकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हा वनभाजी महोत्सव हरिभाई देवकरण प्रशालेच्या आवारातील एस.पी.एम. इंग्लिश मीडियम शाळेच्या प्रांगणात होणार असून याचे उद्घाटन सकाळी ११ वाजता वनबंधू पद्मश्री चैत्राम पवार यांच्या हस्ते होणार आहे. या महोत्सवात वनभाज्यांची माहिती देणारे चित्र प्रदर्शनही असणार आहे. या महोत्सवामध्ये भीमाशंकर खोऱ्यातील जंगल क्षेत्रात फक्त पावसाळ्यात नैसर्गिकरित्या उगवून येणाऱ्या औषधी गुणधर्म युक्त दुर्मिळ आशा कुरडु, चिंचरडा, चैताचा बार, तेरची, भारंगी, रताळी, काठ माठा, सोडगा, कोकम पाला, कवला, करड्या इत्यादी वनभाज्या घेऊन जनजाती बंधू-भगिनी येणार आहेत. यात नाचणीची भाकरी, वनभाजी, आंबिल व कोकमपाला कढी यांचा समावेश असणार आहे.

या पत्रकार परिषदेत सचिव अरुण उपाध्ये, संजय देशपांडे, प्रसाद चोळसगुड्डु, नरेंद्र भावे, योगेश दीक्षित, कपिल कोळी, मायांक चौहान व सचिन देशपांडे आदी उपस्थित होते.



# इको नेचरतर्फे बेलाच्या रोपांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

इको नेचर क्लबच्या माध्यमातून सिद्धेश्वर मंदिर परिसरात भक्तांना मोफत प्रसाद म्हणून भेट देण्यात येते आहे व तसेच श्रावणात बेलाची रोप मंदिर परिसरात व शेतीच्या बांधावर लावण्यात येतात. सोमवारी श्री सिद्धरामेश्वर मंदिरात भक्तांना बेलाचे रोप वाटप करण्यात आले. पर्यावरण दूत डॉ. मनोज देवकर म्हणाले जर बेलाचे झाडच लावले तर महादेव प्रसन्नत्र होतील परंतु निसर्गसृष्टीही आपल्याला आशीर्वाद देतील सर्वांचे आरोग्य निरोगी राहील हा उद्देश ठेवून दरवर्षीप्रमाणे यावर्षी त्यांनी बेलाचे रोप वाटप करायला चालू केले आहेत. यावेळी पोलीस अधिकारी सतीश बावणी जिल्हा विधिमित्र प्रतिभा देवकर, कांचन कोरे, काव्या वालवे व डॉ. मनोज देवकर यांच्या उपस्थितीत शंभर एक बेलाचे रोप वाटप करण्यात आले.

# इस्कॉनतर्फे श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ इस्कॉन सोलापूरच्या दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त दिनांक १० ते १७ ऑगस्ट दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती भागवताचार्य उद्धव प्रभू यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जगभरातील इस्कॉनच्या मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव अतिशय उत्साहात साजरा होणार आहे. सोलापूरातील अक्कलकोट रोड, नवीन जकात नाक्याजवळील इस्कॉनच्या व्रजधाम श्री श्री राधा दामोदर मंदिरातील जागेत हा महोत्सव विविध आध्यात्मिक कार्यकमाद्वारे साजरा होणार आहे.रविवार दि. १० ते १६ ऑगस्ट पर्यंत श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. आदरणीय उध्दव प्रभुजी (भागवताचार्य) श्री वृंदावन धाम है या भागवत कथेचे प्रवक्ता आहेत. अतिशय मधुर किर्तन व रसाळ वाणीद्वारे दररोज सायंकाळी ५.३० ते रात्री ८.३० पर्यंत हा कार्यक्रम इस्कॉनच्या प्रांगणात साजरा होईल. शुकवार दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ८ ते ९.३० पर्यंत तुलसी लक्ष्य अर्चना उपस्थित भक्तांद्वारे विष्णू सहस्त्रनाम या मंत्राद्वारे करण्यात येईल. शनिवार दि.१६ ऑगस्ट रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी, संपूर्ण दिवसभर विविध आध्यात्मिक कार्यक्रम होणार आहेत. सकाळी ४.३० ते ८.०० पर्यंत मंगल आरती, नृसिंह आरती तुलसी वंदना, अपध्यान गुरुपूजा होईल. सकाळी ८.३० ते ११.०० वाजेपर्यंत विश्वशांती श्री सुदर्शन यज्ञ श्रीमद् भागवत यजमानाद्वारे होईल. सायंकाळी ४ ते ८ वाजेपर्यंत श्री श्री राधा दामोदर विग्रहांचे अभिषेक अनेक दानकर्त्यांच्या हस्ते करण्यात येईल. इच्छुक व्यक्तीदेखील स्वहस्ते भगवंतांचा अभिषेक कार्यक्रमात भाग घेऊ शकतील. सायंकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत विशाल सांस्कृतिक मंडपात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नृत्य नाटिका व श्रीकृष्ण लीला इस्कॉनच्या भक्तांद्वारे सादर करण्यात येतील. रात्री १० ते १२ वाजेपर्यंत आदरणीय उध्दव प्रभुजीद्वारा श्रीकृष्ण कथेचे प्रवचन होईल. रात्री १२ नंतर ५६ भोग अर्पण, महाकिर्तन, महाआरती व शेवटी उपस्थित सर्व समुदायांसाठी महाप्रसादाने कार्यकमाची सांगता होईल. रविवार दि. १७ ऑगस्ट रोजी इस्कॉन संस्थेचे संस्थापकाचार्य कृष्णकृपामूर्ती श्री श्रीमद ए.सी. भक्तीवेदांत स्वामी श्रील प्रभूपाद यांचे १२९ वी जयंती (व्यासपुजा) महामहोत्सव करण्यात येणार आहे त्यावेळी सकाळी ९ ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत विविध कार्यकमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी श्रील प्रभुपाद यांच्या मूर्तीस महाअभिषेक तथा भक्तांद्वारे शब्दांजली, पुष्पांजली व नैवेद्य अर्पित करण्यात येईल. समस्त भाविकांनी व भक्तांनी या कार्यकमास आवर्जून उपस्थित राहून अध्यात्मिक आनंदाचा लाभ घ्यावा, असे आवाहन इस्कॉन सोलापूरचे अध्यक्ष कृष्णभक्त दास यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस पावन हरिनाम प्रभू, लीला पुरुषोत्तम दास, तीर्थराज प्रभुदास, साधुसंग प्रभू, आर्यन साळुंखे उपस्थित होते.



# सौरऊर्जेवर चालणारा तण काढणारा रोबोट

## 'सिंहगड'च्या विद्यार्थ्यांची अभिनव कल्पना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी सौरऊर्जेवर चालणारा स्वयंचलित तण काढणारा रोबोट तयार करण्याचा अभिनव प्रकल्प स्थानिक विद्यार्थ्यांनी साकारला आहे. हार्नेसिंग सोलर पॉवर फॉर ऑटोमेटेड गार्डन वीडिंग - अ रोबोटिक सोल्यूशन या शीर्षकाखाली हा प्रकल्प प्रा. एम. टी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या प्रकल्पात सुजाता दुधभाते, तेजस्विनी बाबर, निशा गडेकर आणि वैष्णवी सुरवसे या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. रोबोट पूर्णपणे सौर पॅनलद्वारे ऊर्जा मिळवतो, त्यामुळे बाह्य वीजपुरवठ्याची गरज भासत नाही. त्यामध्ये ESP३२ मायक्रोकंट्रोलर, अल्ट्रासोनिक सेन्सर आणि मोटर ड्रायव्हर यांचा वापर करण्यात आला आहे. रोबोट बागेतील तण ओळखून स्वयंचलितपणे कटर मोटर सुरु करून ते कापतो. तसेच अडथळे ओळखून त्यापासून बचाव करण्याची क्षमता त्याच्यात आहे. विद्यार्थ्यांच्या मते, हा प्रकल्प शाश्वत शेतीसाठी एक प्रभावी उपाय असून, भविष्यात इतर शेतीविषयक कामांसाठीही या तंत्रज्ञानाचा उपयोग करता येऊ शकतो. या प्रकल्पाचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. आर टी व्यवहारे, डॉ. विजय बिरादार, डॉ. प्रदीप तापकीरे यांनी कौतुक केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### शंभर भगिनींनी बांधली सुरज देशमुख यांना राखी

**टेंभुर्णी, दि.१३ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार)चे जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख यांना टेंभुर्णी येथील सिध्दार्थनगर भागातील शंभरहून अधिक भगिनींनी राखी बांधत यंदाची राखी पोर्णिमा साजरी केली. या कार्यक्रमाचे आयोजन आणि नियोजन परमेश्वर दादा खरात, नितीन खरात, यशपाल दादा लोंढे, समीर नाईकनवरे, आशिष लोंढे, शारंग गायकवाड, रोहन लोंढे व सिद्धार्थ नगर मित्र परिवार यांनी केले होते. यावेळी उपस्थित भगवान खरात, ठझख शहराध्यक्ष रमेश लोंढे, माणिक खरात, कैलास लोंढे, मुकुंद लोंढे, संतोष साळवे, संतोष खरात, अनिल लोंढे, अनिल जगताप, दत्ता जगताप, दिपक लोंढे, अमर गायकवाड, विशाल जगताप, स्वप्नील लोंढे, रोहित गायकवाड, महेश धोत्रे, करण सरवदे, आयुष खरात, सिद्धार्थ लोंढे होते.




### न्यू इंग्लिश स्कूल करकंबचे कराटे स्पर्धेत यश

**करकंब, दि.१३ ऑगस्ट-**

पंढरपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय कराटे स्पर्धेत चेतना विकास मंडळ संचलीत न्यू इंग्लिश स्कूल करकंब प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.यामध्ये ज्ञानेश्वरी अशोक भोसले १७ वर्षीय वयोगट प्रथम क्रमांक.मानसी अशोक भोसले १४ वर्षीय वयोगट प्रथम क्रमांक या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडाशिक्षक अशोक खपाले,शिक्षक महादेव चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष संजीवकुमार म्हेत्रे सर,सचिव अविनाश देवकते सर, स्कूलकमिटी अध्यक्ष प्रशांत वेळापूरकर सर, मुख्याध्यापक श्रीकांत लऊळकर, पर्यवेक्षिका लक्ष्मी शिंदे,शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.



### वेळापूरात लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**वेळापूर, दि.१४ ऑगस्ट-**

साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त वेळापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक मुलींच्या शाळेत चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन अध्यक्ष राहुल साठे व लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले होते. सावित्रीबाई फुले व डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनचरित्रावर काकासाहेब जाधव यांनी विचार व्यक्त केले. यावेळी सुयश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रशस्तीपत्र देऊन अमृतभैय्या माने देशमुख, राहुल साठे व मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. या कार्यक्रमाला महादेव देवालय ट्रस्टचे अध्यक्ष अमृतभैया माने देशमुख, किरण सकट, जय मल्हार क्रांतीचे जिल्हाध्यक्ष काकासाहेब जाधव, शिवसेना ता. उपप्रमुख सुनील साठे, पिनू येडगे, लालासाहेब मगर, डॉ अभिजीत पाटील, डॉ. श्रीधर देशपांडे, संजय आडत, सतीश साठे, निलेश नाईकनवरे, अक्षय बनसोडे, हर्षद साठे, रोमन वाघमारे, सुरज गायकवाड, रामदास साठे, अतुल जाधव, पिनू लोखंडे उपस्थित होते.

### भावसार समाजाचा रविवारी वधू-वर मेळावा

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

ऑल इंडिया क्षत्रिय भावसार महासभा, भावसार कल्याणम व समस्त भावसार क्षत्रिय समाज, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने वधूवर मेळावा रविवार, दि. १७ ऑगस्ट रोजी पद्मावती कन्व्हेंशन हॉल येथे आयोजित करण्यात आला आहे. मेळावा सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळेत पार पडणार आहे. मेळाव्यासाठी आतापर्यंत ११०५ वधू-वरांनी नोंदणी केलेली आहे. संपूर्ण मेळावा पूर्णतः डिजिटल पद्धतीने होणार असून पेपरलेस व हाय-टेक आयोजन करण्यात आले आहे. त्याच दिवशी डिजिटल सूची पालकांना उपलब्ध होणार आहे.



### पाण्याच्या कारणावरून एकास मारहाण

**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथे पाण्याच्या कारणावरून शिवानंद शिवलिंगप्पा गुळकोंडा (वय ५२) यास मारहाण करण्यात आली. सोमवारी रात्री दहाच्या सुमारास राहत्या घरी असताना पाण्याच्या कारणावरून शिवानंद यास लक्ष्मीपुत्र बसवंत गुळकोंडा व अन्य एकाने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यात चेहऱ्यास जखम, हाताला मार व सर्वांगास मुकामार लागल्याने उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तो अर्धवट शुद्धीवर असून या घटनेची नोंद पोलिसात झाली आहे.

# साडेचार हजार शाळांमध्ये आज घुमणार माऊलींचे पसायदान

## जिल्ह्यातील सुमारे आठ लाख विद्यार्थ्यांचा सहभाग

### संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या जयंतीनिमित्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

स्वतःसाठी काही नाही तर केवळ जगाच्या कल्याणासाठीच पसायदानाद्वारे देवाकडे मागणी करणाऱ्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या जयंतीनिमित्त गुरूवारी दि.१४ ऑगस्ट रोजी जिल्ह्यातील साडेचार हजार शाळांतून सुमारे आठ लाख विद्यार्थी सामुदायिक पसायदान पठण करणार आहेत.

यंदाचे वर्ष माऊलींच्या ७५० व्या जयंतीचे वर्ष आहे. यानिमित्ताने माऊलींनी पसायदानातून दिलेला विचार राज्यातील प्रत्येक शाळेत एकाच वेळी पोहोचावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार येत्या १४ ऑगस्ट रोजी राज्यातील प्रत्येक शाळेत पसायदानाचे गायन करण्यात यावे असे आदेश शालेय शिक्षण विभागाने राज्यातील शाळांना दिले आहेत. १५ ऑगस्ट रोजी गोकुळाष्टमीला संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांची ७५० वी जयंती आहे. स्वातंत्र्य दिनानिमित्त झेंडावंदन, प्रभातेरीचे कार्यक्रम शाळांत असल्याने पसायदानाचे गायन दि. १४ ऑगस्ट रोजी करण्याचे शालेय शिक्षण विभागाचे आदेश आहेत. जि. प. प्राथमिक शिक्षण विभागाकडूनही या संदर्भात सर्व गट शिक्षणाधिकाऱ्यांना याबाबतचे पत्र देण्यात आले आहे. सप्त शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त आयोजन संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचे सप्तशतकोत्तर (७५०) सुवर्णमहोत्सवी जयंतीवर्षा निमित्त येत्या १४ ऑगस्ट रोजी राज्यातील प्रत्येक शाळेत उत्सव साजरा करावा असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत,त्यानुसार संबंधितांना पत्र काढून सूचना दिल्या असल्याचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.



तालुका, शाळा, विद्यार्थी : १) सोलापूर यूआरसी १ २११, ८१,११३. २) सोलापूर युआरसी २, १७९, ७०,८१२. ३) माढा, ४५६, ६०,३९५. ४) करमाळा, ३२२, ३९,१८५. ५) मोहोळ, ३३८, ५०,६०५. ६) पंढरपूर, ५४७, ८५,८१९. ७) माळशिरस, ५४२, ८०,९३२. ८) बार्शी, ३८६, ६५,३०४. ९) अक्कलकोट, ३८०, ५२,७६६. १०) उत्तर सोलापूर, २७८, ५९,५४४. ११) दक्षिण सोलापूर, २८६, ४९,४१५. १२) सांगोला, ५०१, ६३,२०९. १३) मंगळवेढा, २७३, ४०,१८९. एकूण ४ हजार ६९९ शाळा व ७ लाख ९९ हजार २८८ विद्यार्थी.

## पिलीव प्राथमिक आरोग्यकेंद्रास पाच कोटीचा निधी मंजूर



### पालकमंत्री गोरे व मा. आमदार सातपुते यांचे सहकार्य

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १३ ऑगस्ट -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे सर्वात जुने प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. जवळपास पन्नास वर्षांचे हे आरोग्य केंद्र सध्या इमारत व कर्मचारी कवारटर शेवटची घटका मोजत आहे. यासाठी १० कोटीच्या वर दुरुस्ती व सोयी सुविधासाठी आवश्यक आहे. यासाठी पिलीव येथील माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशदादा पाटील, माळशिरस भाजपा मंडल अध्यक्ष नितीन मोहीते, भाजपाचे शहराध्यक्ष प्रमोद भैस, पत्रकार संजय पाटील यांनी याबाबत सतत पाठपुरावा केला होता. नुकताच या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दुरुस्तीसाठी

महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी संबंधित खात्याचे मंत्री यांच्या सोबत बैठक लावून ताबडतोब पाच कोटी निधी मंजुर केला.यासाठी माजी आमदार राम सातपुते यांचे सहकार्य लाभले.




## म.फुले गणेशोत्सव मंडळ अध्यक्षपदी पोरे

### खजिनदारपदी राऊत

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. १३ ऑगस्ट-**

वेळापूर (ता.माळशिरस) येथील श्रीक्षेत्र महात्मा फुले गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी राजकुमार पोरे, खजिनदारपदी तुकाराम राऊत, कार्याध्यक्षपदी विलास राऊत, उपाध्यक्षपदी राजू तेली तर सचिवपदी शंकर राऊत यांची निवड करण्यात आली.

यावेळी माजी अध्यक्ष सोमनाथ चांडोले आणि माजी उपाध्यक्ष बापू भानवसे यांचा ॲड. दत्तात्रेय राऊत यांच्या हस्ते तर नूतन कार्यकारिणीचा सत्कार प्राचार्य आर. बी. पवार व प्रा. बलभीम काकुळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पत्रकार महादेव जाधव व इंग्लिश स्कूल शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष अमोल मंडलीक यांचा माजी उपसरपंच शंकरराव काकुळे यांच्या हस्ते सत्कार झाला.

प्रा. बलभीम काकुळे यांनी प्रस्ताविक केले. यावेळी नागेश क्षीरसागर, राजकुमार शिंदे, दीपक राऊत, जयसिंग पांढरे, सुरज माने-देशमुख, उमेश भानवसे, जयराम भानवसे, शंकर बनकर, लक्ष्मण मेटकरी, चंद्रकांत राऊत, पिनू देशपांडे, पार्थ करमाळकर, माऊली राऊत, सतीश बनकर, जब्बार मुलाणी, अजान शेख, शब्बीर कोरबू, सुरज उरणे, गणेश उरणे, वेदांत पोरे, प्रथमेश भानवसे उपस्थित होते.

## पंढरपुरात तिरंगा रॅलीला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ ऑगस्ट-**

'हर घर तिरंगा' मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी पंढरपूर नगरपरिषदेच्यावतीने आज तिरंगा रॅली काढण्यात आली. तिरंगा रॅलीस शहरातील विविध विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७८ व्या वर्धापनदिना निमित्त पंढरपूर नगरपरिषदेच्या वतीने लोकांमध्ये राष्ट्रध्वजाबद्दल जागरूकता निर्माण करणे, देशभक्तीची भावना जागृत करणे आणि राष्ट्रध्वजासोबत प्रत्येक नागरिकाचा वैयक्तिक बंध जोडणे, या उदात्त उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीमध्ये लोकमान्य विद्यालय, गौतम विद्यालय, कवठेकर प्रशाला, द.ह कवठेकर प्रशाला, अरिहंत विद्यालय, आपटे उपलप प्रशाला, ईश्वर अम्मा प्रशाला, यशवंत विद्यालय, विवेक वर्धिनी विद्यालय, औदुंबर पाटील विद्यालय आदी शाळांचे विद्यार्थी व शिक्षक यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. दरम्यान भारत माता की जय, वंदेमातरम्, वंदेमातरम्, भारतीय स्वातंत्र्याचा विजय असो, घर-घर तिरंगा हर घर तिरंगा च्या जयघोषाने शहरातील वातावरण देशभक्तीमय, देशभक्तीने मंत्रमुग्ध झाले होते.प्रत्येक विद्यार्थ्याच्या हाथी तिरंगा झेंडा फडकवीत सदर रॅली शिस्तबध्द रीतीने पार पडली. सदर रॅली शहरातील प्रदक्षिणा मार्गावरून संचलन करीत जिजामाता उद्यान येथे समाप्त झाली.




### तिरंगा बाईक रॅलीचे आज आयोजन

हर घर तिरंगा अभियान अंतर्गत गुरुवारी दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी दोन वाजता तालुक्यातील सर्व कार्यालयांचे विभागप्रमुख व कार्यालयीन कर्मचारी यांची तिरंगा बाईक रॅली आयोजित करण्यात आली असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

ही तिरंगा बाईक रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक चौफाळा - नाथ चौक - तांबडा मारुती - महाद्वार - कालिका माता मंदिर - काळा मारुती चौफाळा ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत काढण्यात येणार आहे.बाईक रॅलीस तालुक्यातील सर्व लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार असून, तालुक्यातील सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिकांनी बाईक व तिरंगा झेंडासह रॅलीत सहभागी व्हावे असे आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

## घरातून दूरचित्रवाहिनी संच चोरीस

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ ऑगस्ट-**

येथील संभाजीनगर, रेल्वे स्टेशन रोड परिसरात घरफोडी करुन अनोळखी चोरट्याने ५० हजार रुपये किमतीचा सोनी कंपनीचा ५५ इंची एलईडी टीव्ही चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे.

फिर्यादी श्याम चंद्र कुमार (वय-३१), मूळचे बिहार येथील असून सध्या बार्शी येथे स्टेशन मास्टर म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, १० ऑगस्ट रोजी रात्री १० ते ११ ऑगस्ट रोजी सकाळी ८ या वेळेत ते सेवेवर असताना त्यांच्या राहत्या घराचा कडीकोयंडा तोडून चोरट्याने घरात प्रवेश केला. घराच्या पाठीमागील दरवाजातून आत घुसून चोरट्याने ५० हजार रुपये किमतीचा सोनी कंपनीचा ५५ इंची एलईडी टीव्ही लंपास केला. घरी परतल्यावर दरवाजा तुटलेला दिसून आल्यानंतर शेजाऱ्यांच्या मदतीने घरात पाहणी केली असता टीव्ही गायब असल्याचे उघड झाले. याप्रकरणी अनोळखी चोरट्याविरुद्ध बार्शी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बँकांनी शेतकऱ्यांची अडवणूक करू नये

### आ. उत्तमराव जानकर; आढावा बैठकीत सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.१३ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील बँकांनी खरीप हंगामातील पीक कर्ज वाटप करताना कोणत्याही शेतकऱ्यांची अडवणूक करू नये, कर्ज वेळेत वितरित करावे, अशी सूचना आमदार उत्तमराव जानकर यांनी दिली.

येथील गरुड बंगला येथे खरीप पिक कर्ज वाटप आढावा बैठक आमदार जानकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीस सचिव सहाय्यक निबंधक सारडा, सदस्य गटविकास अधिकारी पांढरे, कृषी अधिकारी कचरे तसेच तालुक्यातील सर्व बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. आमदार जानकर म्हणाले,



शेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यांना खरीप हंगामासाठी लागणारे पिक कर्ज वेळेवर मिळाले पाहिजे. विलंब झाला, तर शेतकऱ्यांचे नियोजन बिघडते आणि उत्पादनावर थेट परिणाम होतो. त्यामुळे कोणत्याही कारणास्तव शेतकऱ्यांची अडवणूक होऊ देऊ नका. सीबील अथवा इतर कोणत्याही प्रक्रियेमुळे कर्ज रोखून धरले जाणार नाही, याची सर्व बँकांनी काळजी घ्यावी. ते पुढे म्हणाले, शेतकऱ्यांच्या हातात बियाणे, खते आणि शेतीसाठी लागणारी साधने वेळेवर यायला हवीत. त्यासाठी आर्थिक पाठबळ अत्यंत महत्त्वाचे आहे. आपण सर्वांनी मिळून हे काम जबाबदारीने पार पाडले, तर शेतकरी हंगाम यशस्वी होईल. बँकांनी शेतकऱ्यांसाठी दारं उघडी ठेवावीत, कागदपत्रांची अनावश्यक अडचण निर्माण करू नये आणि प्रत्येक पात्र शेतकऱ्याला तातडीने कर्ज मिळाले पाहिजे. सर्व बँक अधिकाऱ्यांना पीक कर्ज वाटपाची गती वाढवावी.

## वाहनाच्या धडकेत पादचारी ठार

**बार्शी, दि. १३ ऑगस्ट-**

बार्शी बायपास रोडवरील विश्वा मंगल कार्यालयाजवळ काल दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास अनोळखी वाहनाने पाठीमागून धडक दिल्याने पादचारी ठार झाल्याची घटना घडली. उमेश दिगंबर वालुपंते (वय-६०, रा. जुनी चार्ट गल्ली, बार्शी) असे अपघातात मृत्यू झालेल्याचे नाव आहे. वालुपंते हे मजुरीसोबत फुलांचा व्यवसाय करीत होते. घटनेनंतर त्यांना ग्रामीण रुग्णालय, बार्शी येथे दाखल करण्यात आले. तेथून पुढील उपचारासाठी सोलापूर येथे नेत असताना रुग्णालयाच्या गेटवरच त्यांचा मृत्यू झाला. चालक अपघाताची माहिती न देता पसार झाला.

## लम्पी नियंत्रणासाठी दोन लाख लसींचे वितरण

### ७ लाख ७० हजारपैकी २ हजार जनावरांना लम्पी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**

जिल्ह्यात पसरणारी लम्पीची साथ पाहता जिल्हा परिषद सेसमधून एक लाख ९ ० हजार ४०० लम्पी प्रतिबंधात्मक लसींची खरेदी करण्यात आली आहे. त्यांचे तालुकास्तरावर वितरण पूर्ण झाले आहे.

जिल्ह्यात लम्पी बाधित पशुधनाची संख्या दोन हजार झाली असली तरी मृत्यूचे प्रमाण कमी आहे. लम्पीबाधित पशुधनांपैकी एक हजार ५२६ पशुधन बरे झाले आहेत, तर एकूण ५८ पशुधनांचा मृत्यू झाला आहे. ७ लाख ७० हजार जनावरांपैकी २ हजार जनावरे लम्पीबाधित झाले आहे.

### तालुकानिहाय लसींचा पुरवठा

अक्कलकोट - १३,०००, बार्शी - ९,०००, पंढरपूर - २७,९००, करमाळा - १०,०००, माढा - १०,०००, माळशिरस - २७,९००, मंगळवेढा -१६,००० मोहोळ - २०,०००, सांगोला - ५०,०००, उत्तर सोलापूर - २,०००, दक्षिण सोलापूर - ५,५००, एकूण - १ लाख ९० हजार ४००

### लम्पीवर नियंत्रण मिळविण्यात यश

जिल्हा परिषद सेसमधून मिळालेल्या लम्पी प्रतिबंधात्मक लसींचे वितरण पूर्ण झाले आहे. पावसाळापूर्व लसीकरणात ८० टक्केपेक्षा पशूना लसीकरण करण्यात आल्याने अल्प प्रमाणात लम्पीबाधित पशूसंख्या आहे. जिल्ह्यात ७ लाख ७० हजार पशूंपैकी २ हजार पशूंना लम्पी झाले आहे. पावसाळापूर्व लसीकरणामुळे लम्पीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले आहे.

**- डॉ. विशाल येवले, जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, सोलापूर**

## बुद्धीच्या बळावर यशस्वी होत आश्रयदाते बना

**▸ माजी प्राचार्य भीमाशंकर पैलवान; सांगोला विद्यामंदिरमध्ये गणवेश वाटप**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१३ ऑगस्ट-**

उत्तम प्रकारे ज्ञान संपादन करत उच्चशिक्षित व्हा, आपल्या बुद्धिमत्तेच्या बळावर आजच्या परिस्थितीवर मात करा व कर्तृत्व संपन्न होत भविष्यकाळातील आश्रयदाते बना, असे आवाहन माजी प्राचार्य भीमाशंकर पैलवान यांनी सांगोला विद्यामंदिर प्रशालेमधील गरजू विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप प्रसंगी मार्गदर्शन करताना केले.



यावेळी व्यासपीठावर संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, माजी प्राचार्य नारायण विसापूरे, बाळासाहेब वाघमारे, प्राचार्य अमोलगायकवाड,उपप्राचार्यप्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक काकासाहेब नरूटे, प्रा.नवनाथ बंडगर, बाळराजे सावंत उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी कै. बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार समर्पण करून पूजन करण्यात आले. प्रास्ताविक अमोल गायकवाड यांनी केले. मोफत गणवेश वाटपासाठी सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, लायन्स क्लब, सांगोला, उद्योगपती बाळासाहेब मस्के, उत्तम ढोले, नारायण विसापुरे, बाळासाहेब वाघमारे, भीमाशंकर पैलवान, अमोल गायकवाड, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, मुख्य लिपीक हेमंत नलवडे, पद्मिनी कुलकर्णी, सुकानंद हळ्ळीसागर, सुमन पाटणे, शिक्षक बाळराजे सावंत, अशपाक काझी, अश्विनी साळुंखे, नागेश पाटील, निलेश जंगम, लिपीक चांगदेव कुंभार, चेतन भांडेकर, वसंत कपडेकर, अरुण सुरवसे, गिरीश पाटोळे आदी देणगीदारांनी आर्थिक सहकार्य करून मदत केली. सूत्रसंचालन वैभव कोठावळे यांनी तर आभार राजेंद्र ढोले यांनी मानले.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बार्शीत वाहतूक शिस्त मोहिमेत ३१ वाहनांवर कारवाई




**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१३ ऑगस्ट-**
शहरातील वाढती वाहतूक कोंडी आणि नियमभंग रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम राबवली. या मोहिमेत वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्या ३१ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

पोलिसांनी वाहतुकीचे नियम उल्लंघनांवर कारवाई केली. शहरातील मुख्य चौक, बाजारपेठ आणि गर्दीच्या भागात तपासणी करुन ही कारवाई पार पडली. वाहतूक पोलिसांनी नागरिकांना विनंती केली आहे की, स्वतःच्या सुरक्षिततेसाठी आणि शहरातील वाहतूक शिस्त राखण्यासाठी नियमांचे पालन करावे. नियमभंग केल्यास पुढील काळात आणखी कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.



## महत्त्वाचे

### अंगारकी चतुर्थीनिमित्त शहरातील विविध गणपती मंदीरात गर्दी



**सोलापूर, दि. १३ ऑगस्ट-**
पवित्र श्रावण महिन्यातील अंगारकी चतुर्थीमुळे मंगळवारी दि.१२ ऑगस्ट रोजी शहरातील विविध गणपती मंदीरात भाविकांची गर्दी झाली होती. शहरातील अजोबा गणपती, कसबा गणपती, ताता गणपती, सिध्देश्वर तलाव घाटावरील गणपती यासह हिप्परगा येथील मश्रुम गणपती मंदीरात भाविकांच्या रांगा दिसून आल्या. मश्रुम गणपती मंदीरात परिसरातील हगलूर, उळे, कासेगाव, तामलवाडी यासह तुळजापूरहून अनेक भक्त चालत आले होते.

### प्लॅस्टिक राष्ट्रध्वजाचा वापर, निर्मिती करु नये



**पंढरपूर, दि. १३ ऑगस्ट-**
केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजाकरिता प्लॅस्टिकच्या वापरास व निर्मितीस मनाई आहे. भारतीय राष्ट्रध्वज संहितेचे काटेकोर पालन करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत प्लास्टीकचे राष्ट्रध्वज वापर व निर्मिती करण्यात येऊ नये असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे. राष्ट्रध्वजाविषयीचे प्रेम, निष्ठा, अभिमान दर्शविण्याकरिता विद्यार्थी नागरिकांकडून देखील राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येतो. कार्यक्रमानंतर राष्ट्रध्वज विविध सार्वजनिक ठिकाणी टाकले जातात. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. रस्त्यात इतरत्र विखुरलेले राष्ट्रध्वज बरेच दिवस नष्ट होत नाहीत. राष्ट्रप्रतिष्ठेच्या दृष्टीने ही बाब गंभीर आहे. राष्ट्रध्वजाचा अवमान करणे त्याची विटंबना होणे हे बोधचिन्हे नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम १९५० राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१ तसेच ध्वजसंहितेच्या तरतुदीनुसार दंडनीय अपराध आहे. खराब झालेले, राष्ट्रध्वज आढळून आल्यास ते सन्मानपूर्वक गोळा करुन नजीकच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयामध्ये जमा करावेत. तसेच नागरिकांनी ध्वज संहितेच काटेकोर पालन करावे असे आवाहनही प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.




### बार्शीत अध्यापिका विद्यालयाची तिरंगा रॅली

**बार्शी, दि. १३ ऑगस्ट-**
आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत हर घर तिरंगा २०२५ ही मोहीम देशभरात सर्वत्र सुरु करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत अध्यापिका विद्यालय, बार्शी येथे तिरंगा, रांगोळी स्पर्धा, राष्ट्रीय प्रश्न मंजुषा, तिरंगा रॅली , सेल्फी विथ तिरंगा हे उपक्रम घेण्यात आले. या मोहिमेअंतर्गत आज तिरंगा रॅलीचे काढण्यात आली. रॅलीची सुरुवात विद्यालयापासून झाली. यानंतर सुभाषनगर, हिरेमठ हॉस्पिटल रोड, जावळी प्लॉट, रिंग रोड या भागातून रॅली पुढे जात अध्यापिका विद्यालयाच्या परिसरात रॅलीची सांगता झाली. हर घर तिरंगा, भारत माता की जय, वंदे मातरम या घोषणांनी वातावरणात उत्साह निर्माण झाला. प्राचार्य जीवन लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रा. वाघमोडे, प्रा. देंडे, प्रा. माळी, प्रा. घुले, प्रा. मांडे व प्रा. हामणे उपस्थित होते. रॅलीमध्ये प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी बहुसंख्येने सहभागी झाल्या होत्या.

## अवयवदान जनजागृती रॅलीत तीन हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

### प्र. कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते प्रारंभ



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ ऑगस्ट-**
अवयवदान हे मोठे सामाजिक काम असून, प्रत्येक गरजू रुग्णांना अवयव मिळायलाच पाहिजे. अवयवदात्याची गरज असलेले मोठ्या प्रमाणात रुग्ण असून प्रत्येकाने अवयवदान करावे असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले. डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित अवयवदान महाअभियानाच्या शुभारंभाप्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर, उपअधिष्ठाता डॉ. नरेश झंजाड, अश्विनी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुहास कुलकर्णी, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनचे डॉ. श्रीकांत येळेगांवकर, डॉ.एन.बी. तेली, डॉ. संतोष हराळकर, अश्विनी सहकारी रुग्णालयाचे संचालक श्री. अशोक लांबतूरे, वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रशांत औरंगाबादकर, प्रशासकीय अधिकारी श्री. सचिन बिज्जरगी व सोलापूर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ. राजेंद्र वडजे, डॉ. अभिजीत जगताप, डॉ. तोडकर इत्यादी उपस्थित होते. किडनी, त्वचा, डोळे, यकृत, फुफ्फुस यासारखे अवयव आपण दान करु शकतो व आपण सर्वांनी आजच्या दिवशी अवयवदानाचा संकल्प करुन अर्ज भरावा, असे आवाहन केले. अधिष्ठाता डॉ. जयकर यांनी प्रास्ताविक केले. रॅलीचे स्वागत व सूत्रसंचालन श्री. लांबतुरे यांनी केले. यावेळी समन्वयक डॉ. प्रदीप जाधव यांनी अवयवदानाची शपथ दिली. कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर यांनी अवयवदान व देहदान करण्याचा संकल्प केला. वाशीचे विकास चव्हाण यांनी अवयवदान व देहदानाचा संकल्प केला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रांगणातून या रॅलीचा शुभारंभ प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला.

सदर जनजागरण दिंडी (रॅली) डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथून पोटफाडी चौक, सिध्दार्थ हौसिंग सोसायटी, कुंभार गल्ली, जगदंबा चौक, लष्कर, सात रस्ता, संगमेश्वर कॉलेज मार्गे गरुड बंगला, रोटरी बगीचा मार्गे भगतसिंग मार्केट येथील अश्विनी सहकारी रुग्णालयाच्या मैदानामध्ये समारोप करण्यात आला. डॉ. वैशंपायन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्र कुंभारी व अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियमित, सोलापूर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ (राष्ट्रीय सेवा योजना विभाग) व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने रॅली काढण्यात आली.

या रॅलीमध्ये कमलाबेन पटेल नर्सिंग कॉलेज, कुंभारी, अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, कुंभारी, अश्विनी नर्सिंग इन्स्टिट्यूट, सोलापूर, डीबीएफ दयानंद कॉलेज, डीबीएफ दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, नर्सिंग कॉलेज सिव्हिल हॉस्पिटल, देहांगदान जीवनदान संस्था समाजसेवी संस्था, संगमेश्वर महाविद्यालय, यू.ई.एस. महिला महाविद्यालय, अश्विनी पॅरामेडिकल कॉलेज, सोलापूर मार्कंडेय रुग्णालय, भाई छन्नुसिंग चंदेले समाजशास्त्र महाविद्यालय, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, हरिभाई देवकरण कॉलेज, शिवदारे कॉलेज ऑफ फार्मसी, सोशल कॉलेज, ए. आर. बुर्ला महिला विद्यालय, एस.एस.ए. कॉलेज, सोलापूर, यशोधरा नर्सिंग इन्स्टिट्यूट, सोशल कॉलेज, डीएव्ही वेलणकर कॉलेज, संगमेश्वर कॉलेज ९ महाराष्ट्र बटालियन, छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज, रोटरी ई क्लब सोसायटी, मंगळवेढेकर कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, संगमेश्वर कॉलेज राष्ट्रीय समाजसेवा विभाग सहभागी होते. यावेळी विकास लिंगराज, प्रा. नंदकिशोर सगरे, प्रा. मधुराणी मोहिते, डॉ. मनिया शिंदे, राजश्री काळे, डॉ. हराळकर, बाबुराव चांदकवटे, विरेंद्र परदेशी, डॉ. एस. एस. पाटील, कॅप्टन अजित जाधव, एस.एस. जगताप, व्ही.एम. मुलगे, प्रा.विजय मोरे, प्रा. घोंगडे, प्रा. युवराज सुरवसे, धनश्री केळकर, राजू नरळे, डॉ.ए.जी. जमादार, डॉ. व्ही.जी. सुरवसे, ए.व्ही. बेडगकर, डॉ. के.जी. शिंदे, डॉ. एम.एम. पिरजादे, वैशाली इंडे, प्रा.डॉ. पाटणकर, डॉ. एस. शिंदे, डॉ. ए.व्ही. साखर, राजू माने आदी उपस्थित होते. रॅलीच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम डेप्युटी पी.ई. स्वप्नील लांबतुरे, उमेश शिवशरण, अवधूत कुलकर्णी, मनोज परदेशी, सुर्यकांत कवलगी, नागराज दंतकाळे, नीळकंठ चौगुले, अविनाश गायकवाड यांनी घेतले. या रॅलीचे समारोपप्रसंगी आभारप्रदर्शन प्रा.डॉ. श्रीकांत येळेगांवकर यांनी केले.

## सोलापूर-मुंबई-दिल्ली थेट विमानसेवा सुरु करा

### खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांची मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१३ ऑगस्ट-**
नवी दिल्ली येथे केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी भेट घेत सोलापूर-मुंबई-दिल्ली अशी थेट विमान सेवा सुरू करण्याची मागणी केली. या सेवेमुळे सोलापूर आणि परिसरातील नागरिकांना मुंबई आणि दिल्ली येथे प्रवास करणे सुलभ होईल, तसेच व्यापारी आणि व्यावसायिक संबंधांना चालना मिळेल असे त्यांनी सांगितले.

यासोबतच, खासदार मोहिते-पाटील यांनी राज्यात ज्याठिकाणी नवीन विमानसेवा सुरू करणार आहेत त्याठिकाणाहून तातडीच्या कामानिमित्त जिल्हाधिकारी व जि.प. मुख्याधिकारी यांच्या सोबतच इतरही सरकारी कर्मचाऱ्यांना कामानिमित्त मुंबई मंत्रालयात जाण्यासाठी विमान प्रवासाची परवानगी आणि सवलत देण्याची मागणी केली. यामुळे कर्मचाऱ्यांचा वेळ वाचेल आणि कामकाजात गती येईल, असे सांगितले. केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांनी या मागण्यांवर सकारात्मक विचार करून योग्य पावले उचलण्याचे आश्वासन दिले. या भेटीमुळे सोलापूरच्या कनेक्टिव्हिटी आणि विकासाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. यावेळी भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष संजय सिंह, महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे, हिंदकेसरी पै.योगेश दोडके उपस्थित होते.



## बार्शीत ‘आया सावन झुमके’ ला रसिकांची उत्स्फूर्त दाद

### स्वरसंध्या प्रस्तुत हिंदी मराठी गीतांना मोठा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१३ ऑगस्ट-**
दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रावण महिन्याचे औचित्य साधून स्वरसंध्या प्रस्तुत आया सावन झुमके हा मराठी व हिंदी गीतांचा कार्यक्रम रविवारी दि. १० रोजी यशवंतराव चव्हाण सांस्कृतिक सभागृहात झाला. त्याला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी, तुकाई क्रिएशन पुणे प्रमुख देवीदास पाटील, प्रमोदिनी कोठारी व स्वरसंध्याचे सर्व कलाकार यांच्या हस्ते नटराज पूजनाने उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचा आरंभ किसीके मुस्कुराहटोपे हो निसार या गीताच्या समूह गायनाने करण्यात आला. डॉ. मदन देगावकर, वर्षा रसाळ, सूर्यकांत वायकर, मधुसूदन चांडक, रुपाली शिंदे, प्रतीक्षा कोठारी यांनी आपल्या सुरेल आवाजात सुमधुर गीते सादर केली. या संपूर्ण गाण्याचे निवेदन माधुरी शिंदे व मंजुषा राऊत यांनी केले. यावेळी अनेक गीतांना वन्समोअर व टाळ्यांचा प्रतिसाद मिळाला. पथझड सावन, टीप टीप बरसा पाणी, गुम है किसीके प्यार मे, ईशारो ईशारो मे, गोमू संगतीन, मेरे नैना सावन भादो, दिल का भवर, मै कही कवी न बन जाऊ, कहेना है, अग हेमा, मी डोलकर अशा अनेक गीतांनी रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी रसिक श्रोत्यांनी सभागृह तुडुंब भरले होते. कार्यक्रमास बार्शीतील विविध क्षेत्रातील जाणकार व संगीतप्रेमी शेवटपर्यंत उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता 'होटोपे सच्चाई रहती है' या अर्थपूर्ण गीताच्या समूह गायनाने करण्यात आली. मधुसूदन चांडक यांनी आभार मानले.

## सांगोल्यातील खोदकामात सापडले दगडी बांधकामाचे अवशेष

### शहरातील खंदक परिसरात दगडी चौथरा, तटबंदी भिंत आढळली



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१३ ऑगस्ट-**
शहरातील जुन्या धान्य बाजार (खंदक) परिसरात नव्याने उभारण्यात येणाऱ्या व्यापारी संकुलाच्या बांधकामासाठी पाया खोदण्याचे काम सुरु असताना सुमारे १५ ते २० फूट खाली दगडी चौकोनी आकाराचे प्राचीन बांधकाम व पश्चिम बाजूस पूर्व-पश्चिम दिशेने तटबंदीची भिंत आढळून आली आहे. या अवशेषांच्या शोधामुळे परिसरातील नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

सांगोला शहराचा इतिहास फार जुना व समृद्ध आहे. शहरातील भुईकोट किल्ला हा आदिलशाही, शिवशाही व मोगल साम्राज्याच्या काळात लष्करी दृष्ट्या महत्वाचे ठाणे म्हणून ओळखला जात होता. आजही या किल्ल्याचे काही बुरुज व तटबंदी शहरात उभ्या असून त्यांचा जीर्णोद्धार होण्याची प्रतीक्षा आहे. व्यापारी संकुल उभारण्यात येत असलेल्या खंदक भागालाही ऐतिहासिक महत्त्व आहे. पाया खोदकामाच्या वेळी सापडलेले दगडी अवशेष व तटबंदीचे अवशेष नेमके कशाचे आहेत, हे पाहण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक घटनास्थळी दाखल झाले. काही इतिहास अभ्यासकांनी याठिकाणी प्राचीन वास्तूचा संदर्भ असल्याचा अंदाज व्यक्त केला असून, पुरातत्त्व विभागाने तातडीने उत्खनन करावे, अशी मागणी होत आहे. या घटनेची माहिती पुणे येथील पुरातत्त्व विभागाला देण्यात आली असून त्यांनी प्राथमिक स्वरूपात या घटनेची दखल घेतली आहे. लवकरच पुरातत्त्व विभागाचे अधिकारी सांगोला येथे भेट देऊन स्थळ पाहणी करणार असल्याची माहिती मिळत आहे. नागरिकांतर्फे देखील उत्खननाच्या मागणीसाठी प्रयत्न सुरू आहेत. इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर यांनी सांगितले की, सांगोला गावाच्या मध्यवर्ती भागात भुईकोट किल्ला होता. त्याची दुहेरी तटबंदी होती. सद्यस्थितीत दिसणारे अवशेष या तटबंदीचेच असावेत असे प्रथमदर्शनी दिसून येते. पुरातत्त्व विभागाने पाणी उपसून सखोल उत्खनन केल्यास हे अवशेष कोणत्या वास्तूचे आहेत ते स्पष्ट होईल. सांगोला नगरपरिषदेच्या वतीने व्यापारी संकुलाचे काम सुरू आहे. दरम्यान खोदकामात अशा प्रकारे प्राचीन बांधकाम सापडल्याने स्थानिक प्रशासनाने तातडीने या घटनेची दखल घेतली आहे. नगरपरिषद मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असून पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठांकडे अहवाल सादर करण्यात आला आहे.



### शासकीय ध्वजारोहण समारंभाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ ऑगस्ट-**
भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७८ व्या वर्धापनानिमित्त तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे शुक्रवार दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.०५ वाजता ध्वजारोहणाचा शासकीय समारंभ होणार आहे. उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहणाचा समारंभ होणार असून, या समारंभास मान्यवर नागरीक, स्वातंत्र्य सैनिक तसेच शासकीय-निमशासकीय कर्मचा-यांनी उपस्थित रहावे असे, आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

## गुरुशिष्य एकरूप झाले


श्री रामदास स्वामींचे पट्ट शिष्य कल्याण स्वामी यांच्या बद्दलची माहिती या लेखात देत आहे. सातारा शहराजवळ सज्जनगड आहे. हा गड श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी श्री रामदास स्वामीच्या वास्तव्यासाठी त तपश्चर्या करण्यासाठी बहाल केलेला होता.

रामदास स्वामींचे शिष्य कल्याण स्वामीचे वास्तव्य सुरुवातीच्या काळात सज्जनगडावर होते. ते रामदास स्वामींची मनोभावी सेवा करत, असत सज्जनगडाच्या पायथ्याशी असलेल्या नदीतून भला मोठा हंडा भरून सज्जनगडावर रामदास स्वामींसाठी पाणी नेत असत. सामान्य व्यक्तीस तो रिकामा हंडा उचलणे कठीण आहे पावरून कल्याण स्वामींच्या बलदंड शरीराची कल्पना यावी.

सज्जनगडावरून रामदास स्वामी बरोबर कल्याण स्वामी धाराशिव जिल्ह्यातील परंडा या गावी आले तेथे एक मठ स्थापन केला. परांड्यास भुईकोट किल्ला आहे. त्यावेळी तेथे मोगलांचे राज्य होते. रामदास स्वामींनी कल्याण स्वामीना परांडयाच्या मठात वास्तव करण्याची व सज्जनगडावर न येण्याची आज्ञा केली आणि रामदास स्वामी एकटेच सज्जनगडावर परत गेले. परांड्यास राहून मोगलांच्या हालचाली व किल्ल्यातील बातम्या मिळवून रामदास स्वामींना पोहोचविण्याचे कार्य कल्याण स्वामी करत असत. राम दास स्वामी ती माहिती छत्रपती शिवाजी महाराजांकडे पोहोचवीत असत कल्याण स्वामी बऱ्याच वेळा ध्यानधारणा करण्यासाठी श्रम हरिणी सीना नदीकाठी जात असत. तेथेच डोमगाव नावाचे खेडेगाव आहे. त्या ठिकाणी कल्याण स्वामींचा मठ आहे. तो श्री छत्रपती शाहू महाराजांच्या पत्नी श्रीमंत सकवार बाईनी बांधला आहे. त्या मठाचे बांधकाम मजबूत व वैशिष्ट्यपूर्ण आहे. भूकंपाच्या वेळी सभा मंडपाच्या फरशा खालीवर झाल्या



पण मुख्य इमारत पूर्ण शाबूत राहिली. त्या वेळच्या वास्तुशास्त्राची ही कमाल आहे. मुख्य मंदिरात कल्याण स्वामींची समाधी आहे. त्या समाधीच्या पाठीमागे श्रीराम पंचायतन आहे. मंदिराचे विद्यमान मठपती नित्यनेमाने पूजा करतात. नैवेद्य प्रसाद अर्पण करून आरती इत्यादी छोडोशोपचार पूजा होते. त्या मंदिरासमोरच दास मारुतीचे टुमदार मंदिर आहे. मुख्य मंदिराच्या पिछाडीस एक मारुतीची मूर्ती आहे. त्या मारुतीच्या मूर्तीने बळीला पाताळात ढकलण्यासाठी त्याच्या मस्तकावर पाय ठेवलेला आहे. या मंदिरात राम नवमी, दास नवमी इत्यादी उत्सव मोठ्या प्रमाणात होतात आणि भक्तांना महाप्रसाद दिला जातो. उत्सवास परिसरातील गावातून भक्तमंडळी बहुसंख्येने हजर राहतात. उत्सव काळात मोठ्या प्रमाणात बाजार भरतो. या



मठात कल्याण स्वामींच्या सुंदर हस्ताक्षरातील दासबोधाची प्रत उपलब्ध आहे. एक दोन ठिकाणी रामदास स्वामीनी त्यांच्या हस्ताक्षरात दुरुस्त्या केलेल्या आहेत त्यामुळे त्यांचेही हस्ताक्षर पहावयास मिळते. कालांतराने समर्थ रामदास स्वामींचे सज्जनगडावर देहावसान झाले. त्यांच्या अस्थी गडावरील वृंदावनात ठेवल्या व कल्याण स्वामींना समर्थ राम दासांच्या निधनाची बातमी कळविली. अस्थी विसर्जनास केव्हा जायचे असे विचारण्यात आले तेव्हा कल्याण स्वामींनी दिवस कळवितो असे सांगून त्यांना दिवस कळविला. त्या दिवसाआधी कल्याण स्वामींनी प्राण त्याग केला व गुरु शिष्यांच्या अस्थी एकत्रच गंगेत विसर्जित केल्या गेल्या. कल्याण स्वामींच्या मठपती पैकी शोभा विजयकुमार जहागीरदार यांनी प्रयत्नपूर्वक माहिती व जरूर ते फोटो पाठविले त्याबद्दल तिचे मनःपूर्वक आभार.

**- सुधाकर सर्वोत्तम देशमुख,**
सोलापूर । ९८२२०४३९४९.